मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

म. सा. पत्रिका

वर्ष २५

१९५३-५४

अं. १०५-१०६-१०७-१०८

अनुक्रमणिका

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य-पत्रिका

वर्ष २७ वें, अंक १०८] [जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९५४

१०८

अनुक्रमणिका

संपादक
विष्णु भिकाजी कोलते
संपादक-मंडळ

के. ना. वाटवे — शं. के. कानेटकर
सरोजिनी बावर — म. ना. अदवंत

या व गेल्या अंकांतील लेखक

श्री. गो. म. कुलकर्णी : एम्. ए., विजापूर; म. सा. पत्रिका अंक १०४ पहा.

राजा बढे : नागपूर, हल्ली वास्तव्य मुंबई; प्रसिद्ध कवि व चित्रपटसंगीतलेखक. काव्य-संग्रह : माझिया माहेरा जा; गोडगोड गाणीं.

श्री. मा. गो. काटकर : सोलापूर; उदयोन्मुख कवि.

श्री. भा. वि. उर्फ मामा वरेरकर : सुप्रसिद्ध नाटककार, कादंबरीकार व लघुकथा लेखक.

सौ. उषा पोतदार : एम्. ए., पुणें; म. सा. पत्रिका अंक १०६ पहा.

डॉ. शं. गो. तुळपुळे : एम्. ए., पीएच्. डी. पुणें, म. सा. पत्रिका अंक १०२ पहा.

श्री. वि. ज. सहस्रबुद्धे : मिरज; म. सा. पत्रिका अंक १०३ पहा.

श्री. शं. के. कानेटकर : (कवि गिरीश) एम्. ए., सांगली; म. सा. पत्रिका अंक १०३ पहा.

श्री. ना. के. बेहेरे : एम् ए. बी. टी. नागपूर म. सा. पत्रिका अंक १०६ पहा.

कु. सरोजिनी बाबर : एम्. ए., पीएच्. डी. म. सा. पत्रिका अंक १०२ पहा.

श्री. म. ना. अद्वंत : एम्. ए., जळगांव (पूर्व खानदेश). म. सा. पत्रिका अंक १०२ पहा.

श्री. दा. न. शिखरे : पुणें; म. सा. पत्रिका अंक १०६ पहा.

श्री. न. का. घारपुरे : एम्. ए. पीएच्. डी; पुणें. जर्मन भाषेचे प्राध्यापक; फर्ग्युसन कॉलेज पुणें 'समग्र किर्लोस्कर 'चे एक संपादक.

श्री. गुणाकर देशपांडे : एम्. एस्सी. नागपूर विद्यापीठांत भूगर्भशास्त्रांत संशोधन चालू; उदयोन्मुख कवि. सुषमा, युगवाणी इ. मासिकांत कवितालेखन.

श्री. म. म. देशपांडे : नागपूर, सरकारी नोकरी. उदयोन्मुख कवि. सत्यकथा, युगवाणी इ. मासिकांतून कविता प्रसिद्ध होत असतात.

श्री. प्रताप : दुधोंडी (व्हा. किर्लोस्कर-वाडी) उदयोन्मुख कवि. स्फुट कवितालेखन.

श्री. मा. गो. देशमुख : एम्. ए., पीएच्. डी. नागपूर. म. सा. पत्रिका अंक १०४ पहा.

श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध : एम्. ए., नागपूर. प्रसिद्ध नवकवि कवितासंग्रह : नवी मळवाट, कादंबरी : क्षिप्रा.

श्री. सुरेश डोळके : एम्. ए, म. सा. पत्रिका अंक १०२ पहा.

श्री. मा. वि. किबे : सरदार किबे, इंदूर. महाराष्ट्र. साहित्य परिषदेचे भूतपूर्व अध्यक्ष. स्फुट लेखन व संशोधन.

श्री. वा. रा. कांत : नागपूर नभोवाणी, नागपूर; प्रसिद्ध कवि. काव्यरचना : पहांटतारा, फटकार, रुद्रवीणा.

श्री. अरविंद मंगरूळकर : एम्. ए., पुणें म. सा. पत्रिका अंक १०६ पहा.

श्री. मा. का. देशपांडे : एम् ए., पुणें इंग्रजीचे प्राध्यापक. कथा, कादंबरी व टीकात्मक विपुल लेखन.

टिळकरस्ता, पुणें २.
दि. १–५–५४

महाराष्ट्र–साहित्य–परिषद, पुणें २

नियामक मंडळाची सभा

स. न. वि. वि.

नियामक मंडळाची सभा रविवार दि. १३ जून १९५४ रोजीं दुपारीं ३ वाजतां मा. प. सा. मंदिरांत भरेल. आपण उपस्थित व्हावें ही विनंती.

कामें.

१. दुखवटा ठराव.
२. मागील सभेचें इतिवृत्त वाचून संमत करणें.
३. १९५३–५४ सालचें कार्यकारी मंडळानें पाठविलेलें इतिवृत्त व जमाखर्च यांचा विचार.
४. १९५४–५५ सालचें कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या अंदाजपत्रकाचा विचार.
५. घटना दुरुस्ती. *
६. शुद्धलेखन समितीची मुदतवाढ.
७. वाङ्मयेतिहास निवेदन.
८. पत्रव्यवहार.
९. अध्यक्षांच्या अनुमतीने आपल्या वेळीं येणारीं कामें.

वा. दा. गोखले	वि. द. घाटे
गं. भा. निरंतर	अध्यक्ष
श्री. शं. नवरे	श्री. म. मांटे
चिटणीस	कार्याध्यक्ष

* १. घ. नि ११ मधील प्रादेशिक विभागाची नांवें बदलणें
२. घ. नि १२–पुढील वाक्य जोडणे–'व बारा महिने पूर्ण झालेल्या सभासदांना मिळणारे सर्व अधिकार त्यांना अध्यक्षपदीं येतांच प्राप्त होतील.'

[मागें पहा.]

वार्षिक साधारण सभा

दि. १-५-५४

वार्षिक साधारण सभा रविवार दि. १३ जून १९५४ रोजीं दुपारीं ५ वाजतां मा. प. सा. मंदिरांत भरणार आहे. आपण उपस्थित व्हावें ही विनंती.

कामें

१. दुखवटा ठराव.

२. मागील वा. सा. सभा व विशेष साधारण सभा यांचे वृत्तांत वाचून संमत करणें.

३. नियामक मंडळाने सादर केलेले ५३-५४ चें इतिवृत्त व जमाखर्च संमत करणें.

४. नियामक मंडळाने सादर केलेलें ५४-५५ अंदाजपत्रक संमत करणें.

५. घटना दुरुस्ती. (मागील पानावरील टीप पहा.)

६. शुद्धलेखन समितीची मुदतवाढ.

७. वाङ्मयेतिहास निवेदन.

८. पत्रव्यवहार.

९. अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळीं येणारीं कामें.

घा. दा. गोखले	वि. द. घाटे
ग. भा. निरंतर	अध्यक्ष
श्री. शं. नवरे	श्री. म. माटे
चिटणीस	कार्याध्यक्ष

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य-पत्रिका

वर्ष २७ वें, अंक १०८] [जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९५४

१०८

दिवेलागण—

वारा कसा शांत होता, पानसुद्धा हलत नव्हतें
दिवेलागण झाली होती, सारिकडे कुंद होतें !
घरांतील अंधाराचे डोळे लुकलुक् करीत होते
हळूहळू आकाशींही ग्रह तारे दिसत होते
गुरें घरीं आलीं होतीं, धूळ अता शमली होती
बांधलेली गाय वत्सा केविलवाणी बघत होती
काम धाम करून बाया आता घरीं आल्या होत्या
हुश्श ! करून अंगणांतच लेकरांना पाजीत होत्या
चुलींमध्ये धूर नव्हता, घड्यांतही नव्हतें पाणी
मनीं कांही बेत नव्हते, घरीं नव्हते घरधनी
वाटा पुसटल्या होत्या, झावळ झावळ दिसत होतें
तरी डोळे सख्यासाठी सारीकडे हिंडत होते
दिवसभर कष्टूनहिसुद्धा काम त्यांचें सरत नव्हतें
मनें घरीं गेलीं होतीं, पाय मात्र थिजत होते
पोटासाठी बांधलेले बंध अजुन सुटत नव्हते
पिंजऱ्यांतच भावनेचे अश्रू गळून सुकत होते
गात्र गात्र शिणलेलें कांही कांही सुचत नव्हतें
दिवेलागण झाली होती सारिकडे कुंद होतें !

—गुणाकर देशपांडे.

घेअी मला आंत —

[जाति–किङ्किणी; राग–पुरिया]

दों बाजुं घन रान चहुंबाजुं अन्धार !
खडकाळ मार्गास ना अन्त, ना पार !
क्षितिजीं कलागार मज जायचें तेथ
मैलावरी दीप—जीवास आधार !
—टाकीं पुढे पाय, मागे दिवा जाय
पुढतींच हें काय ? मम साअुली मात्र !
किति लाम्बची लाम्ब काळी असुर खूण
हो वाढती आणि करि भयद कान्तार !
मनिची निराशाहि का येअि बाहेर ?
स्नेहाळ आशेस चिरडून करि ठार !
या घोर अन्धारिं, ये नेत्रिं अन्धारि
पुढला विझे दीप, भङ्गे कलागार... !
घोटाळुनी हाय ! पडलों क्षणीं खालि;
—घेअी मला आंत–ठोठावतों दार...!!

—निशिकान्त करकरे.

दिलासा—

कितीतरी दिवसांनी
ऊन पडलें प्रसन्न
हसूं लागल्या सावल्या
होत्या उदास विष्षण्ण !
चार दिवस सारखी
होती पावसाची झड
पंख घेऊन पोटाशीं
होती स्तब्ध धडपड !
निळें नितळ आकाश
तुझें सये, नवेंपण
किती छळलें झाडीला —
वाऱ्या पावसाने पण !
गळणारें माझें घर
आहे टाकीत उसासा
ओसरींत येऊनियां
ऊन देता हें दिलासा !

— म. म. देशपांडे.

— धरली पाउलवाट

धरली पाउलवाट
आज मी धरली पाउलवाट ! ध्रु.
रान मोकळें, हवा मोकळी
वरी नभाची नील पोकळी
यांच्यासाठी हपापलेलें मन माझें मोकाट !
कुणीहि यावें, पद-चर व्हावें
स्वयंगतीने पुढे सरावें.
हिला मुळीं नच साहे वाहन जाणारें कैफांत !
नाहीतर !— हमरस्त्यावरती
विज्ञानाचीं चक्रें फिरतीं
कशी कुणाची करतिल 'भाजी' नकळें आवेगांत!
धांवपळीच्या मार्गांमाजीं
'गाझी' मानव करुनी 'हांजी' !
मागे सरतो, डोळे मिटतो चुकवाया फुंफाट !
परन्तु असली चुळबुळ, धडपड
अिथे न चाले कसली गडबड
राव, रंक चालती सुखाने अपुल्याल्या नादांत !
या नादाची गोड खुमारी
घडिभर याची मदिय अंतरीं
म्हणुनि पाअुलें वळलीं अिकडे-प्रशांतशा रानांत !

— प्रताप.

अनुक्रमणिका

वाङ्मयसमीक्षेची परिभाषा : माधव गोपाळ देशमुख

' वाङ्मयसमीक्षा ' ही मराठीला पाश्चात्त्य वाङ्मयाने दिलेली एक बहुमोल देणगी आहे. भारतालाहि एक ललामभूत म्हणून ठरलेलें साहित्यशास्त्र आहे. पण साहित्यशास्त्राची गणना ' पद्धति ' ग्रंथांत होतें: म्हणजे भाषेला जसें व्याकरण, पद्याला जसा छंद तसें वाङ्मयाला ' साहित्य ' होय. साहित्यशास्त्रांत वाङ्मयसमीक्षेचीं तत्त्वें मात्र चर्चिलीं जातात. त्यांत वाङ्मयसमीक्षेचा समावेश होत नाहीं.

वाङ्मय ही एका दृष्टीने जीवनावरील समीक्षा समजली जाते. ही जशी गंभीर तशीच ललितहि असते. वाङ्मयसमीक्षा म्हणजे या जीवनावरील समीक्षेची समीक्षा होय व वाङ्मया-सारखीच ही देखील गंभीर व ललित दोन्ही प्रकारची असते. याचा अर्थ असा की, वाङ्मयसमीक्षक जेव्हा एखाद्या गंभीर वा ललित वाङ्मय कृतीची समीक्षा करतो तेव्हा तिचें तात्त्विक विश्लेषण करतो व त्याबरोबरच स्वतःची कलात्मक भूमिका संश्लेषण वा संकलन पद्धतीने विशद करतो. अर्थात् वाङ्मयसमीक्षा म्हणजे ग्रंथाचें निरीक्षण करून व वर्गीकरणाद्वारें एखादा निष्कर्ष सादर करून सिद्धान्त प्रस्थापित करणारा शास्त्रप्रकार नव्हे. साहित्यशास्त्राने आधीच प्रस्थापित झालेलीं तत्त्वे, मूल्यें किंवा निकष तो विशिष्ट कृतीला लावून दाखवितो. पण असें करतांना त्याचें काम केवळ ग्रंथविषयाचा परिचय करून देऊन कांहीं गृहीत वाङ्मयनिकष लावून गुणदोष विवेचन करणें, एवढेंच नसतें; तर खुद्द वाङ्मयकार जसा आपलीं जीवनविषयक मूल्यें आपल्या कृतींत व्यक्त करतो त्याचप्रमाणे वाङ्मयसमीक्षक देखील कांही प्रमाणांत कां होईना, आपण मनाशीं निश्चित केलेलीं वाङ्मयमूल्यें गृहीत धरून व प्रसंगीं तुलनात्मक रीतीने स्पष्ट करून त्या कृतीचें इतरांच्याप्रमाणे स्वतःच्याहि दृष्टींतून समालोचन करतो. अर्थात् वाङ्मयकाराप्रमाणे समीक्षाकारहि स्वयंप्रज्ञ असल्यामुळे त्याचेंहि व्यक्तित्व वाङ्मयसमीक्षेंत थोड्याबहुत प्रमाणांत अभिव्यक्त झाल्यावाचून राहत नाही. यस्य नास्ति स्वयंप्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् !— हें वचन दोघांनाहि सारखेंच लागू पडते.

थोडक्यांत असें की ' वाङ्मयसमीक्षा ' हा वाङ्मयाच्या चरित्र, निबंध, लघुनिबंध, गुजगोष्ट, कथा, कादंबरी, नाटक, काव्य इत्यादि गंभीर–ललित प्रकारांप्रमाणे एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे व त्याचा समावेश, वाङ्मयीन मूल्यें–निकष–तत्त्वें यांची मांडणी करणाऱ्या, साहित्याच्या शास्त्रांत होत नसून तो वाङ्मयाचाच एक विभाग आहे. सध्याच्या अनेक ललित वाङ्मयप्रकारांप्रमाणे पाश्चात्त्यांच्या संनिकर्षामुळे आपण स्वीकारलेलें तें एक ऋण आहे. तें परत करण्याची अपेक्षा नसल्यामुळे त्याला ' एक बहुमोल देणगी ' असें म्हटलें, एवढेंच.

मराठींत गेल्या साठसत्तर वर्षांपासून वाङ्मयसमीक्षेची जी वाढ होत आहे तींत वापरलें जाणारें साहित्य हें जसें संस्कृत साहित्यशास्त्रांतील किंवा थोडेसें मराठीच्या साहित्यशास्त्रांतील त्याप्रमाणे पुष्कळसें पाश्चात्यांचेंहि आहे. विशेषेंकरून पाश्चात्त्य वळणाच्या वाङ्मयप्रकारांची समीक्षा करतांना संस्कृतांतील साहित्यतत्त्वें किती अपर्याप्त भासतात हें प्रत्येक समीक्षकाला जाणवतें व तो साहजिकपणें आपल्या वाङ्मयसमीक्षेंत पाश्चात्त्य--विशेषेंकरून इंग्रजी—वाङ्मय-समीक्षेंतील साहित्य व तद्वाचक परिभाषा वापरत असतो. जीवनमूल्यें बदललीं की वाङ्मयमूल्यें बदलतात. वाङ्मयाचे प्रकार बदलले की त्यांच्या समीक्षेंतील परिभाषाहि बदललीच पाहिजे.

अनुक्रमणिका

जीवनाच्या इतर क्षेत्रांप्रमाणे वाङ्मयाच्या व त्याच्या समीक्षेच्या क्षेत्रांतहि हें परिवर्तन अतिशय सूक्ष्म रीतीने, मंदगतीने व अबोधपूर्व पद्धतीने होत आलें आहे व तें भाषाशास्त्राच्या नियमांस धरूनच आहे. इतके दिवस एखाद्या समीक्षकाला एखादी नवी इंग्रजी संज्ञा वा शब्द प्रथमच मराठींत वापरावयाचा झाला तर तो बहुधा संज्ञेसमोर वा शब्दासमोर वाटोळ्या कंसांत इंग्रजी मूळ शब्दहि देत असे. कांही वेळा भाषाभिमानामुळे तो मूळ इंग्रजी शब्द इंग्रजींत न लिहितां त्याचा उच्चार दत्तोवामन पद्धतीप्रमाणे मराठींत देऊं लागला. हीहि गोष्ट तो भाषाभिमानामुळेच करीत आला, इंग्रजी स्पेलिंग् कच्चें असल्यामुळे नव्हे ! पण अलीकडे इंग्रजी शब्दांचे प्रतिशब्दच केवळ वापरले जाऊं लागले आहेत. एखाद्याने विशिष्ट संकेतासाठी एखादा इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द तयार करून वाङ्मयसमीक्षेंत वापरावा व तो रूढ झाला असें समजून पुढिलांनी त्याचा सर्रास स्वीकार करावा हा प्रकार जोंपर्यंत लिहिणारा व वाचणारा यांच्यांतील भावसंक्रमणाला बाधा येत नाही तोंपर्यंत कांही वावगा नाही. पण कांही चोखंदळ वाचक व लेखक सर्वच शब्द निमूटपणें स्वीकारीत नाहीत. कारण त्यांचें मूळ इंग्रजी शब्दांचें ज्ञान त्यांना तसें करूं देत नाही. कांही शब्द तर इतक्या वेगळ्या संकेताने रूढ होतात की, भाषाशुद्धीच्या धुरंधर अभिमान्यांनी त्यांची चर्चा करूनहि ते वापरांतून जातां जात नाहीत. मराठींतल्या ललितवाङ्मयप्रकारांचीं कांही नांवें जरी पाहिलीं तरी 'नॉव्हेल'साठी नावलऐवजी कादंबरी, 'शॉर्ट स्टोरी' साठी गोष्ट, कहाणीऐवजी लघुकथा, जींत कथनाचाच अभाव तिला नवकथा, 'एसे' करितां गुजगोष्ट, ललित लेख, किंवा लघुनिबंध व 'न्यू रायटिंग' साठी नवकाव्य हे शब्द कसे रूढ होऊन बसले यांचा ताजा इतिहास मोठा उद्बोधक आहे. जे शब्द भाषेंत एकदा या ना त्या कारणासाठी रूढ होऊन गेले त्याबद्दल बोलणेंच व्यर्थ. कारण 'कादंबरी' हें आता सर्व अर्थांनी सामान्य नाम झालें आहे. लघुनिबंधांत निबंधन नाही, नवकथेंत कथेचाच अभाव असतो व नवकाव्यांत काव्याचा रसच काय पण गंधहि आढळत नाही असें प्रतिपादन करणारे समीक्षकहि त्या शब्दांवर मोठासा आक्षेप घेत नाहीत. कारण त्या त्या संकेतासाठी ते ते शब्द पक्के झाले आहेत व आता ते वाचल्यानंतर दुसरा कोणताहि संकेत मनांत येत नाही.

वाङ्मयसमीक्षेंत येणाऱ्या शब्दांबद्दल भाषाशुद्धीच्या दृष्टीने आक्षेप घेतां येतो ते शब्द हे नव्हेत. पाश्चिमात्य, पौर्वात्य, उर्वरित, उपर्निदिष्ट, अद्यावत्, नेत्रदीपक, सृजनशील असे अनेक व्याकरणदुष्ट शब्द भाषेंत रूढ आहेत. परंतु ज्यांना ज्यांना त्यांची व्याकरणदुष्टता जाणवली आहे ते ते लोक हेच शब्द पाश्चात्त्य, पौरस्त्य, उरलेलें, उपरिनिर्दिष्ट, अद्ययावत्, डोळे दिपविणारे, सर्जनशील अशा शुद्ध स्वरूपांत लिहून भाषाशुद्धीचें पालन करतात.

वाङ्मयसमीक्षेंतील परिभाषा व्याकरणशुद्ध असावी हें कांही फारसें विवाद्य ठरणार नाही. पण मुख्य प्रश्न व्याकरणशुद्धतेचा नसून कांहीं विशिष्ट इंग्रजी शब्दांतील सर्वमान्य संकेत व्यक्त करण्यासाठी मराठींत जे प्रतिशब्द वापरले जात आहेत त्यांच्या युक्तायुक्ततेचा आहे. Novel, Short Story, Essay, New Writing (Modernism) हे प्रकारच मुळी इंग्रजी वळणांतून आले म्हणून त्यांची नांवें एकदा निश्चित झालीं तीं झालीं. पण वाङ्मयसमीक्षेंतील पुनः पुनः वापराव्या लागणाऱ्या कांही इंग्रजी शब्दांना मराठींत जे वेगवेगळे शब्द रूढ आहेत त्यांची सुसंगत व्यवस्था लावणें व कांही इंग्रजी शब्दांतील संकेताच्या दृष्टीने, रूढ असलेल्या अनेक शब्दांपैकी निश्चितार्थ व्यक्त करण्याच्या दृष्टीने त्यांतल्या त्यांत समर्पक व चपखल कोणता

हें ठरवून इंग्रजी–मराठी शब्दांतील अर्थसमीकरण पक्कें करणें आज अगत्याचें झालें आहे. असें करतांना केवळ व्युत्पत्ति वा व्याकरण यांकडे लक्ष देऊन भागणार नाही. वैय्याकरण हे प्रयोग-शरण असल्यामुळे व आधी प्रयोग व नंतर परिभाषाकोष हा शास्त्रक्रम असल्यामुळे व्यकरण वा कोष यांना दुय्यम स्थान दिलें पाहिजे. किंबहुना एकाद्या इंग्रजी शब्दसाठी नवा प्रतिशब्द शोधून काढण्याची वा नव्याने निर्माण करण्याची जबाबदारी सामान्य वाचकांवर किंवा डॉ. रघुवीरांसारख्या एखाद्या भाषापंडितावरहि नाही.

वाङ्मयसमीक्षेच्या पाश्चात्त्यप्रभव देणगीचा विनियोग करण्याचें कर्तव्य समीक्षकाचें आहे. वाङ्मयसमीक्षणाचा प्रदेश वाङ्मयाचा आहे. वाङ्मयकाराचें मनोगत समीक्षकाला जें कळलें आहे तेंच वाचकाला कोणत्या शब्दांनी व्यक्त केलें म्हणजे कळूं शकेल याचा नक्की अंदाज खुद्द समीक्षकाला जसा करतां येईल तसा दुसऱ्याला येणार नाही. अर्थवाहकतेच्या दृष्टीने वाङ्मय-समीक्षेच्या क्षेत्रांत वापरल्या जाणाऱ्या मुख्य मुख्य शब्दांची व्याप्ति निश्चित करणें आज किती अगत्याचें झालें आहे हें कांही उदाहरणांनी स्पष्ट होईल.

वाङ्मय आणि साहित्य हे दोन शब्द प्रथम विचारासाठी घ्या. या दोहोंची व्युत्पत्ति त्यांचे संस्कृतांतील व प्राचीन मराठींतील मूळ अर्थ, क्रमशः होत गेलेला अर्थसंकोच वा अर्थ-विस्तार सुपरिचित आहे. प्रश्न त्या शब्दांच्या अर्थेतिहासाचा नसून आज त्यांना कांही परस्पर अव्याप्त संकेत रूढ झाला किंवा होऊं शकेल काय, याचा आहे. शिवाय इंग्रजींतील literature या शब्दाला मराठींत समानार्थक शब्द कोणता ? — हाहि विचार महत्त्वाचा आहे. Literature या शब्दाचे इंग्रजींतच दोन वेगवेगळे अर्थ आहेत. एक, अक्षरनिविष्ट असा कोणताहि विचार वा माहिती आणि दुसरा, काळ आणि रुचि यांच्या चाळणींतून टिकून राहिलेलें गंभीर वा ललित लेखन. इंग्रजींतील या दोन्ही अर्थांचा निर्वाह करण्यास वाङ्मय हा एकच शब्द पर्याप्त आहे. ‘ वाचो विकारः वाङ्मयम् ’ या प्राचीनतम निर्वचनापासून तों ‘इह हि वाङ्मयं उभयथा काव्यं च शास्त्रं च’ या राजशेखराच्या उक्तीपर्यंत व तदनंतर आजवर, वाङ्मयाच्या व्याप्तीबद्दल विशेष मतभिन्नता नाही. Literature हा शब्द इंग्रजींत तितका व्यापक व लवचिक आहे तितकाच वाङ्मय हा शब्द मराठींतहि वापरण्यासाठी व्युत्पत्ति वा रूढि यांचा विरोध नाही. विशिष्ट प्रकारच्या वाङ्मयाचा निर्देश करितांना त्यापूर्वी गंभीर वा ललित अशीं विशेषणें वापरलीं की काम अडत नाही. त्यांतल्या त्यांत ज्ञानेश्वरांपासून तों मोरोपंतांपर्यंतच्या रसप्रधान व अभिजात अशा प्राचीन वाङ्मयाला ‘ सारस्वत ’ ही विशेष संज्ञा (उदा० महाराष्ट्र सारस्वत सारस्वत–समीक्षा या प्रसिद्ध ग्रंथनामांत) उपयोजिलेलीहि आहे.

चरित्र, निबंध व शास्त्र यांनाहि चरित्रवाङ्मय, निबंध–वाङ्मय व शास्त्रीय वाङ्मय अशा संज्ञा रूढ आहेत. काव्य, नाटक, कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध इत्यादि वाङ्मय-प्रकारांचा संकलित उल्लेख ‘ ललित–वाङ्मय ’ या संज्ञेने केला जातो (आचार्य अत्रे यांचें याच नांवाचें पुस्तक प्रचलित आहेच). ‘ साहित्य ’ या शब्दाची स्थिति मात्र अगदी वेगळी आहे. ‘ शब्दार्थौ सहितौ काव्यम्’ (सह+इत+य) ही त्याची काव्य (ललित वाङ्मय) पर व्याख्या संस्कृतांतच मागे पडून अकराव्या शतकापासून त्याला साहित्यशास्त्रवाचक अर्थ आला व मराठींत तर त्याहूनहि अधिक अर्थविस्तार होऊन गुण, अलंकार रीति इ० काव्य-शोभेचे धर्म असा प्रसाधनवाचक व नंतर लक्षणेने सामग्रीवाचक अर्थ आला हेंहि प्रसिद्धच आहे.

मराठी संतकवींना अनुसरून वि. का. राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत ' साहित्य ही सारस्वताची पद्धति होय ' हें मत मांडलें. पण बहुधा इतर भाषांच्या संपर्कानें मराठींत साहित्य शब्द अशा काटेकोर अर्थानें वापरला जात नसून तो सामान्यत: ' वाङ्मय ' शब्दाला समानार्थक म्हणून रूढ आहे. किंबहुना केवळ शब्दार्थांचा सहभाव ही व्युत्पत्ति अपूर्ण समजून ' हितेन सहितम् तस्य भावः ' अशी नवीच व्युत्पत्ति त्याला जोडून ' साहित्य ' म्हणजे ' लोकहित साधणारें वाङ्मय ' असाहि अभिनव संकेत त्याला लावणारे कांहीं विद्वान् आढळतात. व्युत्पत्ति कांहीहि असो, आज literature या शब्दाच्या सर्व छटा ' वाङ्मय ' या एकाच शब्दाने व्यक्त होत असतां ' साहित्य ' शब्दाचा केवळ वाङ्मय वा हित-कारक विचार एवढ्या अर्थानें किंवा वाङ्मयाच्या व्यापक अर्थानें वापर न करतां त्याला वाङ्मयाची पद्धति, तत्त्व किंवा वाङ्मयसमीक्षेचा वा समालोचनाचा निकष अर्थात् वाङ्मय-मूल्य असा समर्पक अर्थ द्यावा. वाङ्मयाशीं साहित्याची गल्लत करूं नये. ' वाङ्मय ' म्हणजे इंग्रजींतील literature व ' साहित्य ' म्हणजे Any method or principle of Literary Criticism या मर्यादा एकदा निश्चित झाल्या म्हणजे अशी गल्लत होणारहि नाहीं.

आज एवढा काटेकोरपणा कोणी दाखवीत नाहीं. परंतु साहित्य-परिषद्, साहित्य संघ, साहित्यशास्त्र या शब्दांत साहित्य म्हणजे साक्षात् वाङ्मय हा अर्थ अभिप्रेत नसून वाङ्मयाची पद्धति, चर्चा, विचार हाच संकेत विवक्षित असतो हें आवर्जून सांगणें नको. बंगाली साहित्य, हिंदी साहित्य, मराठी साहित्य या ठिकाणीं मात्र तो शब्द वाङ्मयवाचक ठरतो; असे प्रयोग टाळावे. मामा वरेरकरांसारखे कांहीं विचारवंत भाषणाला वाङ्मय व लेखनाला साहित्य म्हणावें असा एक नवाच भेद सुचवितात तोहि येथे विचारांत घेतला नाहीं. वाङ्मय आणि साहित्य या शब्दांची परस्पर व्याप्ति ठरविण्याचा प्रयत्न राजवाड्यां-सारख्या भाषाप्रभूनें करून ठेवला असतांना निदान वाङ्मयसमीक्षेची चर्चा करणारांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करूं नये. पण अनुभव वेगळा येतो. " साहित्य- निर्मिति व समीक्षा " हें श्री. दि. के. बेडेकरांचें १९५४ चें ताजें पुस्तक पाहा. ' साहित्यसमीक्षेचें स्वरूप ' या प्रास्ताविक लेखांत सुरवातीचे शब्द ' वाङ्मयीन कलाकृतीची समीक्षा......' असे आहेत. दुसऱ्याच परिच्छेदांत एकदा ' वाङ्मय-समीक्षेचें शास्त्र ' व चारच ओळीं टाकून लगेच ' साहित्य-समीक्षेच्या शास्त्राचा विचार केला पाहिजे ' असें म्हटलें आहे. अर्थात् श्री० बेडेकरांना वाङ्मय आणि साहित्य यांमधील मूलभूत भेदाची म्ह०कृति-पद्धति-संबंधाची जाणीव नाहीं हें उघड आहे. ती असती तर त्यांनीं संस्कृत साहित्यशास्त्र, मराठीचें साहित्यशास्त्र असे प्रस्तावनेंत उल्लेख करून प्रास्ताविक लेखाचें नांव ' साहित्यसमीक्षेचें स्वरूप ' असें न देतां ' वाङ्मय-समीक्षेचें स्वरूप ' असें अन्वर्थक नांव दिलें असतें. वाङ्मयाची समीक्षा करण्यासाठी उपयुक्त असलेल्या निकषांना, मूल्यांना, तत्त्वांना अर्थात् पद्धतीला साहित्य हें अभिधान असून त्यांचें जमा झालेलें व व्यवस्थित केलेलें ज्ञान म्हणजे साहित्यशास्त्र होय. वाङ्मय निर्माण करणारा तो वाङ्मयकार आहे त्यांत वाङ्मयसमीक्षा हा एक प्रकार असल्या-मुळे वाङ्मयसमीक्षक हाहि वाङ्मयनिर्माताच होय. ' साहित्यिक ' हा एक अपप्रयोग निर्माण झाला असला तरी तो वाङ्मयसमीक्षेच्या क्षेत्रांत सहसा येऊं नये.

Literary Criticism ला वाङ्मयसमीक्षा किंवा वाङ्मयसमालोचन हे शब्द सर्वांत चांगले. परंतु वाङ्मय-समीक्षेच्या विशेष छटा वर्णन करणारे आलोचना - टीका - मीमांसा - चिकित्सा हेहि शब्द चोखंदळपणा ठेवून भिन्नार्थसूचकतेने वापरतां येतात, हें उघड आहे.

प्रा. द. के. केळकर यांच्या पुस्तकाचें नांव 'काव्यालोचना' ऐवजी 'काव्यालोचनालोचन' असें हवें होतें ही श्री. रड्डीशास्त्री यांची सूचना न विसरतां, वाङ्मयवाचक व साहित्यवाचक शब्दांची अन्योन्यनिरपेक्ष व्याप्ति निश्चित व्हावी. हा वाङ्मयसमीक्षेच्या परिभाषेचा पाया मानला पाहिजे.

वाङ्मयसमीक्षेचीं जीं अनेक अंगें आहेत त्यांपैकीं वर्तमानपत्री जुजवी ग्रंथसमीक्षेला ग्रंथपरीक्षण (Book Review) म्हणावें; कारण त्यांत गुणदोषविवेचनाला प्राधान्य असतें. त्याविषयी पत्रकर्त्यांच्या मतास महत्त्व असल्यामुळे तेथे अभिप्राय (opinion) हाहि शब्द रूढ आहेच. Valuation, judgment साठी मूल्यांकन, मूल्यमापन असे शब्द अलीकडे सर्वसामान्य झाले आहेत.

Criticism साठी 'समीक्षा' शब्द योग्य; कारण त्यांत सर्वांगीण दृष्टिक्षेपाचा (सम् + ईक्ष्) बोध अनुस्यूत आहे. प्राचीन संस्कृतपद्धतीच्या केवळ अर्थनिर्णयात्मक समीक्षेलाच टीका (gloss) हा शब्द वापरल्यास दोहोंमधील भेद केवळ नांवावरूनच विशद होईल. 'संशोधन' हा Research करिता उचित शब्द रूढ झाला आहे. परंतु अलीकडे हिंदींतून त्याचा amendment या अर्थी प्रयोग होतो व तो मध्यप्रदेशाच्या राजकीय क्षेत्रांत मराठींतहि येऊं पाहत आहे, त्याचा कसोशीने त्याग केला पाहिजे. मराठींत संशोधन म्हणजे research;; शोध म्हणजे search; पाहणी म्हणजे survey; चौकशी = inquiry, investigation; व amendment=दुरुस्ती; संशोधन नव्हे; अनुसंधान म्हणजे लक्ष्य aiming at; research नव्हे!

वाङ्मयसमीक्षेत गंभीर वाङ्मयासाठी ideology व ललित वाङ्मयासाठी imagery या इंग्रजी संकेतासाठी विचारविज्ञान व प्रतिमासृष्टि हे शब्द वापरतात. (idea+logy = विचार +विज्ञान) आणि image = प्रतिमा हीं समीकरणें आता बदलूं नयेत. श्री० दि. के. बेडेकरांनी इंग्रजींतील Form, Symbol, Significant, Meaningful या संकेतासाठी 'अर्थरूप' हा मराठी प्रतिशब्द सुचविला आहे, तसेंच पॅटर्नसाठी 'रसभावविकल्प' या भरतमुनिवचनावरून 'विकल्पन' शब्दाचा पुरस्कार केला आहे. हे शब्द यापुढे वाङ्मयसमीक्षेत कसोशीने वापरावे—रूढ करावे. कारण त्या अर्थाचे दुसरे चांगले प्रतिशब्द नाहींत.

प्रतिमा व मूर्ति हे दोन शब्द image साठी रूढ आहेत. मूर्तीकरण हा शब्द मूर्त= =concrete या दृष्टीने वेगळा समजून वाङ्मयसमीक्षेतील image साठी प्रतिमा हा शब्द ग्राह्य मानल्यास प्रतिमा व प्रतिमा निर्माण करणारी शक्ति प्रतिभा यांचें साहचर्य अर्थसूचक ठरते.

प्रज्ञा आणि प्रतिभा (genius and creative genius) यांतील मूलभूत फरक दृष्टीआड करून निर्माणक्षम प्रतिभा किंवा सर्जनशील प्रतिभा अशी पुनरुक्ति करूं नये. प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी 'मराठी कादंबरीचें पहिलें शतक' या ग्रंथांत असा प्रयोग केला असून श्री. ह. रा. महाजनी यांनी त्यावर आक्षेप घेतला आहे. 'मौज' मधील 'आम्ही कोण' कवितेचें पुनर्मूल्यन करितांना 'आम्ही' म्हणजे केवळ 'कवि' नाही, तर सर्व प्रतिभावंत हें पटते. पण प्रतिभावंतांत शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ यांचाहि समावेश होतो की काय, याबद्दल तर्कतीर्थ जोशी यांचे विचार लक्ष्यांत घेऊनहि, मोठी शंका वाटते. ही चर्चा चालूच राहिली तरी ती वाङ्मय समीक्षेच्या परिभाषेत शब्दार्थ निश्चित करण्यापूर्वी फार गुंतागुतीची होते. एकदा अर्थव्याप्ति ठरली की निश्चितपणा येतो, हें अगदी खरें.

याबाबत एकच उदाहरण घेऊन हा विचार तूर्त थांबवूं. Subjective आणि Objective या शब्दांतील संकेत निदान वाङ्मयसमीक्षेंत तरी पाश्चात्त्यांकडून आले. त्यासाठी सध्या 'आत्मनिष्ठ' व 'वस्तुनिष्ठ' हे शब्द रूढ झाले आहेत. त्यांचे आधींचे कोषार्थ व रूढार्थ अगदी भिन्न आहेत. उदा० आत्मनिष्ठ म्हणजे One who constantly seeks for spiritual knowledge अर्थात् subjective नाहीं ! आत्मनिष्ठ ऐवजी आत्मपर घालूनहि अर्थबोध नीटसा होत नाहीं. याखेरीज दुसरे प्रतिशब्द वापरलेले नसते तर नवे शब्द पाडून दाखविण्याचें धाडस केलें नसतें. परंतु काका कालेलकर यांनी "जीवनांतील आनंद" या पुस्तकांत (पृ. १७३ व २६५)

Subjective = आत्मनेपदी
Objective = परस्मैपदी

अशी व्याकरणांतील परिभाषा नव्या संकेतानें वापरली आहे ती आत्मनिष्ठ–वस्तुनिष्ठ सारखी श्रुतिदुष्ट व अनर्थावह नाही. शिवाय, मराठी व्याकरणाला तिचा विरोध येणार नाही. तिचा वाङ्मयसमीक्षकांनी योग्य वाटल्यास स्वीकार करावा, अयोग्य वाटल्यास चर्चा करावी. सध्याच्या वैचारिक उत्थानाच्या संक्रमणकाळांत परिभाषा उत्क्रान्त होत आहे. तिच्या विकासाला वेळीच हातभार न लावला तर शास्त्रापेक्षा बलवान् असलेली रूढि मोडण्यासाठीच पुढिलांना व्यर्थ खटाटोप करावा लागेल, अशी महत्त्वाची सूचना करून वाङ्मयसमीक्षेच्या परिभाषेवरील हा स्फुट लेख पुरा करतों.

ये कविते !

ये कविते ! ये कविते !
नाचत ये गात गात
वाट किती पाहूं मी—
वेध घेत अंतरांत !
फुललेलें मन माझें
मी अधीर स्वागतास
शब्दांचे, भावांचे
दाखव मज नवविलास !
दाखव मज विश्व नवें
क्षितिज नवें, नवतारे
नवजीवन सिंचित ये
दर्शन दे मज हंसरें !
विसावुं दे जीवित मम
एक तुझ्या संगतींत
विसावुं दे तनमन हें
गीत नवें गात गात
—या जीवन–संगरांत
जळतांना, लढतांना
साथ सदा देवो मज
एक तुझी स्वर–वीणा.
वीणेच्या नादावर
स्फुरत फुलो मम वाणी
दशदिशांत नादावी
गंधफुलांचीं गाणीं.
कविते ! तव सावलींत
विसर पडो दुःखांचा
लागो मज अन्वयार्थ
विश्वाच्या कोड्याचा !

—सूर्यकान्त खाण्डेकर.

केशवसुतांचें व्यक्तिमत्व आणि त्यांची निराशा : शरच्चंद्र मुक्तिबोध.

— १ —

केशवसुतांच्या काव्यावर आजवर अनेकांनी लिहिलें आहे; व त्यांच्या काव्याचा निरनिराळ्या दृष्टीने विचारहि करण्यांत आला आहे. अगदी अलिकडे प्रा. भवानीशंकर पंडित यांनी केशवसुतांच्या काव्यांतील निराशेकडे रसिकांचें लक्ष्य वेधलें असून त्यांची निराशा वैफल्याच्या भावनेंतून निर्माण झाली होती असें ते सुचवूं इच्छितात. केशवसुतांचा जोमदार आशावाद व द्रष्टेपणा यांशीं विसंगत अशी ही वृत्ती आहे हेंहि त्यांना सुचवायचें असावें. मागे एकदा श्री. माडखोलकरांनीहि केशवसुतांवर स्त्रैणपणाचा आरोप केल्याचें वाचकांना स्मरत असेलच. या व अशा प्रकारच्या टीका-लेखांनी वाचकांच्या विचारास चालना मिळत असली तरी गोंधळ वाढण्याचा संभवहि अधिक असतो. मला वाटतें केशवसुतांचें काव्य समग्रतेने समजून घेण्यासाठी त्यांच्या कवितेच्या एकेका अंगाचा वेगवेगळा विचार न करतां काव्यांत प्रकट होणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्वाच्या मूलवृत्तीचा विचार झाला पाहिजे. केशवसुतांच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून घेतल्यास त्यांच्या कवितेचें मर्म आपणांस अधिक सुस्पष्टपणें कळूं शकेल.

युरोपीय विज्ञानवाद महाराष्ट्रांत इंग्रजांनी आणला; आणि त्या काळच्या ब्राह्मण समाजाला इंग्रजी शिक्षण देऊन स्वतःच्या भारतीय समाजाकडे या शास्त्रीय विवेकवादाच्या दृष्टीने पहावयास त्यांनी शिकविलें. व्यक्ति–स्वातंत्र्याच्या तत्वाची बैठक इहलोकनिष्ठा ही होती. मानवी प्रयत्नांच्या अपार शक्तीवर आधारलेलें हें व्यक्ति–स्वातंत्र्याचें तत्वज्ञान विवेकवादाच्या मदतीने समजून घेतांच या नव्या सुशिक्षित समाजाचे डोळे खाडकन उघडले; या दैववादी, परलोकनिष्ठ, रूढिग्रस्त, जातिभेदावर आधारलेल्या भारतीय समाजाची अंतर्घटनाच पूर्णपणें बदलून टाकली पाहिजे अशी त्यांची दृढ समजूत झाली. जुन्या आणि नव्याचा प्रचंड संघर्ष अशा रीतीने सुरू झाला. घोर रूढिनिष्ठ अशा समाजाला डिवचलें असल्यामुळे हा लढा अतिशय निकराच्या स्वरूपाचा झाला. व्यक्ति आणि समाजांत, व्यक्ति आणि कुटुंबांत, पिता आणि पुत्रांत, स्त्री आणि पुरुषांत असा हा लढा सर्वत्र व सर्व क्षेत्रांत होता. सुमारें शंभर वर्षे हा लढा सतत आणि अत्युग्र स्वरूपांत चालत राहिला.

ही सुशिक्षित मंडळी ब्राह्मणच असल्यामुळे त्यांना हा लढा घरीं आणि दारीं दोन्ही ठिकाणीं करावा लागला. हिंदू–ब्राह्मण कुटुंबांतील स्त्रीची दशा ही दासीहूनहि निकृष्ट दर्जाची असल्याचें त्यांना आढळून आलें; आणि स्त्रीदास्य–विमोचन हें त्यांचें पहिलें कर्तव्य ठरलें. तसेंच जातिभेद हा माणुसकीला काळिमा फासणारा आहे हें कळून चुकल्यामुळे तोहि नष्ट करणें हें त्यांना आपलें आद्य कर्तव्य वाटलें. समाजाच्या रूढींवर घणाचे घाव करून त्याला नुसतें जागवून काय उपयोगाचें? त्याला नवें ज्ञानहि दिलें पाहिजे व त्याच्या आधारावर त्याला स्वतःचें जीवन बदलविण्यास शिकविलें पाहिजे. परंतु तसें करण्यास परतंत्र भारतांत वाव मिळणें अशक्य होतें. म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलें पाहिजे ही प्रबळ इच्छाहि तत्कालीन सुधारकांच्या मनांत वास करूं लागली. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य मिळविणें हें आपलें परम कर्तव्य होय या नव्या जाणिवेने भारलेल्या नवशिक्षित वर्गाने जीव-

नाच्या प्रत्येक क्षेत्रांत मोठ्या हिरीरीने स्वमतप्रतिपादनार्थ संघर्ष करण्यास आरंभ केला. सर्वारंभीं सामाजिक सुधारणांकडे या वर्गाचें लक्ष्य वेधलें जाणें साहजिकच होतें. म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापासून विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापर्यंत रूढिग्रस्त भारताचे सरंजामी संबंध तटातट तोडून टाकण्यासाठी मोठ्या अटीतटीच्या लढाया देण्यांत आल्या. आणि कमींतकमी मराठी ब्राह्मण समाज या संघर्षामध्ये पूर्णपणें घुसळून निघाला. त्या युगाच्या मानव-कल्याणासंबंधी सर्वोच मूल्यांनीं अनेक लोक भारले गेले; म्हणून महाराष्ट्राने त्या काळांत एकाहून एक वरचढ नररत्नें निर्माण केलीं. केशवसुत हे त्यांपैकीच एक होते. केशवसुतांनी नवचैतन्याने सळसळणाऱ्या अशा महाराष्ट्रांत जन्म घेतला होता.

या उलट, दुसऱ्याहि प्रकारची मडामोड मराठी समाजांत होत होती.

ती म्हणजे पांढरपेशा वर्ग दुभंगत होता. सर्वस्वाचा त्याग करून समाजहितार्थ झटावें असें ज्या प्रकारें अनेकांना वाटत होतें त्याचप्रमाणे शिकून चांगलीशी नोकरी मिळवून सुस्थिर आयुष्य घालवावें असेंहि शेकडा नव्वद टक्के लोकांना वाटत असे. इंग्रजी शिक्षणाने समाज-क्रांती करणें जसें शक्य होतें तसेंच तें शिक्षण विकून उत्तम तऱ्हेने चरितार्थ चालविणेंहि शक्य होतें. तसें व्हावें अशी इंग्रजांचीहि इच्छा होतीच. तशीच आर्थिक परिस्थितीहि उदयाला येत होती. या नव्याने सुस्थिर होऊं पाहणाऱ्या मध्यमवर्गाची स्वतःचीं अशीं मूल्यें तयार होत होतीं. व्यवहारांत हुषार, चारचौघांत वजन पाडणारा, शिकून वरचा सामाजिक दर्जा मिळविणारा तरुण साहजिकच आदर्श समजला जात होता. निव्वळ मानवी सद्‌गुणांना एकंदर व्यवहारांत गौणत्व येणें साहाजिक होतें. अतिशय दारिद्र्यांत राहून आईबाप, मुलगा पुढे कमावता होऊन दारिद्र्य दूर करील या एका आशेवर मुलांना शिकवूं लागले. मुलें भराभर शिकून नोकऱ्या पटकावूं लागलीं व चारचौघांच्या कौतुकास पात्र ठरूं लागलीं. वरिष्ठांशीं नमून व इमानदारीने वागूं लागलीं; इंग्रजधार्जिणी मनोवृत्ति आत्मसात करूं लागलीं; म्हणूनच तीं एकंदर समाजकारणाकडे मोठ्या उदासीनतेने पाहूं लागलीं. शहाणा—व्यवहारवाद बाळगणारा मध्यम वर्ग जसजसा स्थिर होऊं लागला तसतशी त्यांच्यांत आणि समाजसुधारकांच्या झुंजार तुकडींत फारकत पडूं लागली ! या मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने हे सुशिक्षित क्रांतिकारी वेडेपीर ठरले असल्यास नवल नाही.

नव्या सुधारकांची ही नवी तुकडी आणि शहाणा मध्यम वर्ग यांच्यांत मोठीच तफावत पडली असली पाहिजे. सुधारकांनी इंग्रजांकडून विवेकवाद घेतला, नवीं व्यक्तिमुक्तीचीं मूल्यें घेतलीं, तर शहाण्या मध्यम वर्गाने त्याच विचारसरणींतून भोगवाद घेतला; व इंग्रजधार्जिणे-पणा स्वीकारला. नवसुधारकाने नवज्ञानाच्या प्रकाशांत स्वतःचें जीवन बघून त्याला बदलण्या-साठी हिरीरीने, मनस्वीपणाने विचारांत आणि आचारांत बदल घडविण्यास सुरुवात केली, तर नोकरपेशी मध्यमवर्गाने अलिप्तपणाची, तडजोडीची, सुवर्णमध्याची वृत्ति स्वीकारली व मवाळ-पणाला ' युक्तायुक्त–विवेकाचें ' स्थान देऊन गौरविलें. अशा रीतीने इंग्रजी शिकून तयार झालेल्या मध्यमवर्गाला दोन फाटे फुटले. त्यांचे मार्ग परस्परविरुद्ध झाले.

आणि हे नवशिक्षित सुधारक मध्यमवर्गाचेच असल्यामुळे त्यांचें अस्तित्व त्या समाजाला डोळ्यांतील खड्यासारखें बोचत असे. नवध्येयाने भारलेल्या त्यागी तरुणांच्या कुटुंबांतील आणि समाजांतील लढा वर विस्ताराने सांगितलेल्या दोन मूल्यांचा, दोन वृत्तींचा, दोन दृष्टिकोणांचा लढा ठरत असे. प्रत्येक नवसुधारकाला त्या लढ्याला तोंड द्यावें लागलें.

केशवसुत हे अशा तरुणांपैकीच एक होते. त्यांचा एकंदर कौटुंबिक आणि सामाजिक लढा वरील दोन मूल्यांचा लढाच ठरत होता. तो लढा ते फारच सच्चेपणाने, बाणेदारपणाने लढले असल्यामुळे अतिशय प्रिय अशा आप्तजनांचाहि त्यांना विरोध सहन करावा लागला; व त्याची खंतहि त्यांना अतिशय लागून राहिली. परंतु ध्येयदृष्ट्या ' दु:खाचा पेला ' अगदी अवश्यंभावी असल्याचें त्यांनी तितक्याच निर्भय वृत्तीने ठरवून टाकल्यामुळे तो ' डोळे मिटुनी ' प्यायाचें कर्तव्यहि त्यांनी तितक्याच निर्भय वृत्तीने ठरवून टाकलें होतें. ज्यांच्यावर जिवापाड प्रेम होतें त्यांचाच अपेक्षाभंग करण्याचें कृत्य त्यांना करावें लागल्यामुळे त्यांची व्याकुळ विव्हलता जागोजाग व्यक्त होते; व त्यांच्या ध्येयमार्गावरील अशीं निरनिराळीं द्वंद्वें यामुळे त्यांच्या काव्यांतून उत्तम तऱ्हेने प्रकट होतात.

कर्ते सुधारक आणि केशवसुत यांच्यामध्येहि एक भेद होता. या भेदानेच केशवसुतांची मनोवृत्ति निश्चित केली. कर्त्या सुधारकांचें कार्य नजरेंत भरणारें होतें; सर्वांना जाणवणारें असें व्यावहारिक होतें. त्यांना अनुयायी लाभत, व त्यांचा मध्यमवर्गावर दबदबा असे, त्यांचें कार्य चटकन दिसणारें, तात्कालिक परिणाम करणारें असें. म्हणून समाजांत त्यांना मान्यता असे. त्यांच्या मागे उभ्या असलेल्या शक्तीमुळे, त्यांचा दरारा वाटत असे. परंतु केशवसुतांचें हेंहि कार्य नव्हतें. तें नजरेंत भरण्यासारखें नव्हतें. त्या कार्याने अनुयायाचा पाठिंबा मिळणें फारसें शक्य नव्हतें. त्या कार्याचा परिणाम ताबडतोब दृष्टिगोचर होण्यासारखा नव्हता. त्यामुळे त्यांच्या ध्येयाला व कार्याला व्यवहारी लोकांच्या दृष्टीने किंमत शून्य होती. आपल्या ध्येयमार्गाचे केशवसुत एकटेच वाटसरू होते. नव मूल्यांच्या ध्येयाकडे त्यांनाहि चालायचें व चालवायचें होतें; आणि त्याबद्दल त्यांना संपूर्ण उपेक्षाच सहन करावयाची होती.

केशवसुतांचें ध्येय होतें काव्य करणें, नवें काव्य करणें, संपूर्ण समाजाला पुढे नेईल असा नव संदेश देणारें काव्य करणें, साध्या माणसाच्या तीव्र अनुभूतींना उत्कटतेने वाचा फोडील असें काव्य करणें. आणि त्या दृष्टीने समाजाच्या गर्भांतून फुटूं पाहणाऱ्या चैतन्य—लोळाशीं त्यांना एकजीव व्हावयाचें होतें. हेंच त्यांचें ध्येय असल्यामुळे आणि या ध्येयाच्या महानतेची त्यांना पूर्ण कल्पना असल्यामुळे वाट्याला येणारी सर्व उपेक्षा व उपहास सहन करावयाची त्यांची पूर्ण तयारी होती. म्हणूनच ते मध्यमवर्गीय समाजांत राहूनहि एकटेच होते—भ्रमिष्ट होते.

कल्लोळांच्या क्षोभें गर्जत आहे
त्या सागरतीरीं उभा गडे मी आहें !

केशवसुतांच्या कवितेंत ' गर्जणाऱ्या सागराच्या तीरीं ते उभे आहेत ' ही जाणीव जशी दिसून येते, तशीच त्यांचा एकाकीपणाहि मनाला खोलवर जाणवतो. त्यांच्या विषण्ण काव्यांत त्यांचा संपूर्ण एकाकीपणा प्रकट झाला आहे. ते दिवाळींत गिरणातीरावर एकटेच जाऊन बसतात; काळोख्या रजनींत हृदयीं खंती बाळगून ते विमनस्कपणें एकटेच रस्त्यावरून हिंडत असतात; मध्यरात्रीच्या एकांतांत घुबडाची सोबत त्यांना आवडते. कारण ' वाटे मनुजांचा कंटाळा; दु:ख करित बैसणें आवडे, जेथें राहे अंधार ' अशी त्यांची मानसिक दशा असते. आणि पुष्पाची सुकुमारता पाहून

सौकुमार्य तव अजुनी राहे
हंसतचि आहे हास्य तुझें हें
परि मम भाळीं ढग अश्रूंचा—हाय इंवरलाहे !

अशी त्यांची स्थिती झालेली आहे. आणि या आत्यंतिक निराश कवितांमधून कल्लोळांच्या क्षोभांनी गर्जणाऱ्या सागरतीरावर कवि एकटाच उभा आहे असें दिसून येतें !

आणि खरोखरच केशवसुत एकाकी होते. ते ज्या समाजांत राहत होते तो ' औचित्याचा फोल विवेक बाळगणारा ' शहाणा–व्यवहारवादी समाज होता. केशवसुतांनी त्या समाजाकडून कसलीहि अपेक्षा केलेली नव्हती. कुटुंबांतील सर्व मंडळी भराभर वरच्या पदावर पोचत असूनहि केशवसुतांनी तिकडे दुर्लक्ष केलें. समाजांत वसून स्वतःचा एक फोटोहि त्यांनी कधीच काढून घेतला नाही; कारण त्या सर्वांच्या दृष्टीने केशवसुत कुचकामाचे, पैसा न कमावणारे, स्वाभिमानाला मुळीच मुरड न घालणारे, नेहमीच स्वतःच्या एका विशिष्ट पातळीवर राहणारे व त्यांच्या प्रत्येक दोषांकडे अतिशय चिकित्सक दृष्टीने पाहणारे असे असावेत. त्यामुळे त्यांनी त्यांची गणना भ्रमिष्टांत केली असणें साहजिकच होतें. आणि अशा स्वाभिमानाला दुखविणाऱ्या आतेष्टांच्या समाजापासून दहा हात दूर राहणें केशवसुतांना क्रमप्राप्तच होतें. आणि येथे राहणेंहि कवीला जड वाटावें अशी त्यांची मनास्थिति नेहमीं होत असल्यास नवल काय ?

मलाही या पृथ्वीवरिल गमतें गे जड जिणें
इथे या दुःखांतें सतत मनुजाला दडपणें
इथे न्याय–स्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो
नरालागीं येथें नरच चरणांहीं तुडवितो !!

आणि अशा वेळीं—

आजवेरी बहु मनोभंग झाले
बहुत आशांचे प्राण निघुन गेले
तया शोचाया निर्जनांत जावें
एकतारी छेडीत मीं बसावें

अशी निर्जनवासाची कधी कधी इच्छा होत असणें साहजिकच आहे. आणि याबाबत कवीने थोडीशी स्वतःवर टीकाहि करून घेतली आहे.

अस्मदीय हृदयीं ठरलें
कीं जग हें दुःखें भरलें
म्हणुनी सुंदरतेला ही
कुठें अम्हा दिसतीं पाहीं

केशवसुतांचा हा एकाकीपणा, ही निराशा त्यांनी जाणूनबुजून, डोळे उघडे ठेवून पत्करली होती. त्यांचा संघर्ष सदोदित जिवंत होता हें सिद्ध करणारा हा एकाकीपणा होता. सच्चा माणूस भांडवलशाही समाजरचनेंत एकाकीच राहतो. आणि भारतांत भांडवलशाही स्वातंत्र्याचें निशाण घेऊन अवतरली नव्हती तर गुलामगिरीचा गळफांस हातांत घेऊन आली होती· गुलामींत आनंद मानणारांना केशवसुतांचा ध्येयवाद उपहास करण्यालायक वाटला असणें स्वाभाविक आहे. आणि उद्यांचें दिव्य स्वप्न हृदयांत वागविणारा कलावंत अशा समाजांत एकाकी न राहिला तरच नवल !

तेव्हा केशवसुतांचा एकाकीपणा हा त्यांच्या ध्येयावादांतून उद्भवणारा सुस्पष्ट परिणाम होय.

केशवसुतांच्या एकाकीपणाच्या अनुषंगाने त्यांच्या कविविषयक कल्पनेकडे वळणें आवश्यक आहे. केशवसुतांच्या दृष्टीने वस्तूंना कवीच्या स्पर्शाने सौंदर्य प्राप्त होतें; सर्व मूल्यें जिवंत ठेवणारा कवीच, तो नसेल तर जिगें कवडीमोलावर विकेल, सर्व साधारणांना जें व्यर्थ वाटतें त्यांतूनच कवि अर्थ शोधून काढील, शब्दशक्तीची तरफ घेऊन जग उलथून देऊन बंड करणारा कवीच; कोणत्याहि महान ध्येयाला प्रभावी करणारा व पुढील पिढ्यांना युगाच्या स्फूर्तीचा साक्षी राहूं शकणारा कवीच, आणि 'भविष्यवाद' वर्तविणारा देखील कवीच. केशवसुतांचा कवित्वाचा आदर्श एवढा उत्तुंग होता आणि तो स्वत:च्या काव्यांतून साकार करण्यासाठी त्यांनी अक्षरश: जिवाचें रान केलें. त्या काळच्या उत्तुंग सामाजिक ध्येयांप्रमाणे हेंहि महान ध्येयच होतें आणि या ध्येयाप्रीत्यर्थ वाट्याला येणारी निराशा व अपेक्षाभंग हाहि त्याच दर्जाचा समजला पाहिजे. कारण त्यांमधून असेंच उत्कट महान व्यक्तिमत्व प्रकट होतें.

कवितेची आराधना करतांना केशवसुतांना कधीकधी अगदीच हताश एकाकी वाटत असल्यास नवल नाहीं. आपल्या हातून कविता-निर्मिती होऊं शकेल की नाही याबाबत त्यांना कधी कधी फारच संशय वाटे. ते म्हणत—

हीन दीन झालों फंदी मी तुझिया नादीं
त्यामुळे परी न मनाला घालितों कधिंहि विषादीं
बूज तुवां या दासाची केली गे नाही अजुनी
दु:ख हेंच वाटे, म्हणुनी गातसे अशीं गाऱ्हाणीं

केशवसुतांची अपेक्षा होती ती हीच!

केशवसुतांचे वैय्यक्तिक गाढ मित्रत्वाचे संबंध केवळ याच ध्येयवादाच्या आधारावर होऊं शकत असत. हें ज्यांना अमान्य असे अशा उपहास करणाऱ्यांशीं सूज्ञपणें वागणें केवळ अशक्य होतें. त्यांचा लहान भावावर मोठा लोभ; पण त्याच्याकडून त्यांची अपेक्षा पहा.—

'बापू! गड्या ध्वज उभा धरशील काय?
तूं देशकारण करूं झटशील काय?
बापू! जनांत दिवटी धरशील काय?
स्वातंत्र्य-देव मनसा भजशील काय?

मित्राच्या खोलीवर गेले तेव्हा खोलीला कुलूप होतें. तो नसल्याचें पाहून त्यांना फार दु:ख वाटलें; व त्यांची परस्पर मैत्री डोळ्यांसमोर साक्षात् उभी झाली. ही मैत्री कशा प्रकारची होती? ते दोन ध्येयासाठी तळमळणारे जुळे आत्मे होते! त्यांनी एकत्र बसून अत्यंत उत्कटतेने ध्येयें पाहिलीं होतीं. तीच त्यांच्या मैत्रीचा दुवा. तें सारें सारें त्यांच्या डोळ्यासमोर उभें झालें. ते म्हणतात—

देशाविषयीं गोष्टी बोलत येथे
बसलों विसरुनि कितीकदा निद्रेतें
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हा
अश्रूंमध्ये अश्रु गळाले तेव्हा.
तेव्हा आम्हीं म्हटलें ही दास्याची
रजनी केव्हा विरून जाइल साची
स्वतंत्रतेची पहाट ती येईल
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील?

आणि ——

कोठें असशिल आतां मित्रा माझे ?
करीत असशिल काय काय तीं कामें
देशासाठी शरीर झिजवायाला
स्फूर्ती आणित असशिल का कोणाला ?

ही त्यांची मित्राकडून अपेक्षा होती.

आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो !
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळे हो !

अहोरात्र अशा तळमळीने वागणाऱ्या कवीच्या वैयक्तिक व्यावहारिक आकांक्षा असतील असें सिद्ध करण्याला कोठेहि पुरावा सापडत नाही. त्यांनी व्यवहारी जगाची पर्वाच कधी केली नाही—

छंद फंद उच्छृंखळ अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या
काठोकाठ भरूं द्या पेला फेस भराभर उसळूं द्या !

अशीच त्यांची अत्यंत निधडी वृत्ती होती. त्यांची निराशा म्हणजे ध्येयमार्गावर चालतांना होणारी निराशा ! 'मला कीर्ति मिळाली नाही, मला संपत्ति मिळाली नाही, मला मान मिळाला नाही' म्हणून रडणारी ती निराशा नव्हती. आपली दुर्दशा होणार हें काय त्यांना माहीत नव्हतें ? पण या दुर्दशेमधूनच काव्यौघ निघतील अशी त्यांना खात्री होती. त्यांनी स्पष्टच म्हटलें आहे—

वाणीचे कवि–दुर्दशांमधुनिया ते ओघ यावे जसे

कवीने दुर्दशेचें व्रत अंगिकारलेंच पाहिजे. दुःखाचा पेला प्यालाच पाहिजे. कारण बुडाशीं अतिशय मौल्यवान अनुभवाचा गाळ असतो ना ? तो काव्यांत अमृताचें स्वरूप धारण करतो. केशवसुतांच्या काव्यांत ही डोळस वृत्ती अगदी सर्वत्र दिसते. म्हणूनच ते —

पूजितसें मी कवणाला ? तर मी पूजी अपुल्याला

असें अहंकाराने म्हणूं शकतात आणि प्रीतीसमोर —

पुष्पीं या प्रीति असे
ती ' मी ' पण हाणितसे
परविषयीं तन्मयता प्रेरिते उरीं
ने दृष्टि अंतरीं

असा अत्यंत नम्र व सखोल अनुभव लिहूं शकतात. आणि वरील दोन्ही उताऱ्यामध्ये तफावत नसून त्यांच्या मागे एक एकजिनसी व्यक्तित्व उभें आहे हें मार्मिकांना सांगणें नलगे.

अशा या अत्यंत नम्र परंतु माणुसकीचा दृढ अहंकार बाळगणाऱ्या कवीच्या निराशेमधून ' तुतारी ' 'शूर शिपाई' 'काठोकाठ भरूं द्या पेला' 'नैऋत्येकडील वारा' 'म्हातारी' 'गोफण' ह्या व ह्यांसारख्या अनेक अजरामर कविता निर्माण होऊं शकत होत्या. भविष्याचाहि वेध घेणारी तशी प्रतिभा महाराष्ट्रांत अजून जन्माला यावयाची आहे. नवें काव्य केल्यामुळे रूढिपूजकांकडून होणारा उपहास, व्यवहारीपणाला दूर लोटल्यामुळे होणारी निंदा व स्वतःच्या या वृत्तीमुळे मातापितरें व स्वकीयांना होणाऱ्या दुःखाबद्दल वाटणारी हळहळ व समाजाकडून उपेक्षा अशा तिहेरी आक्रमणांतून अगदी निःशब्दपणें परंतु अत्यंत बाणेदारपणें मार्ग काढीत वाटचाल करून मराठी भाषेला अमोल काव्य देणाऱ्या या कवीची खरी प्रकृति समजून त्या दृष्टीनेच त्यांच्या ' भिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं ' या व अशासारख्या ओळींचा अर्थ लावला पाहिजे. तरच कवीला न्याय होऊं शकेल; त्याची निराशाहि अत्यंत स्फूर्तिप्रद होऊं शकेल.

या लेखांकांत केशवसुतांच्या निराशेपुरताच त्यांच्या व्यक्तित्वाचा विचार करणें शक्य झालें आहे. त्यांच्या कवितेच्या निरनिराळ्या पैलूंचा विचार करून अनेक नवीन तथ्यें हातीं लागण्याचा संभव आहे. परंतु तो विचार पुढील एखाद्या लेखावर ढकलणेंच भाग आहे. त्यांच्या निराशेबाबत एवढें आणखी म्हणतां येईल की अत्यंत निराश अनुभवामधूनहि केशवसुतांची—

तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी

ही अनुभूति जन्म पावत असे.

अेकला चालला

पुढेच फेकीत विदीर्ण पाउुला
ध्येयाच्या कुशींत अेकला चालला
अेकला चालला हाडाचा सापळा
अुद्याच्या शांतीचा साकार पुतळा
अेकटी लंगोटी अंगांत फाटकी
पायांत रांगते वहाण तुटकी
अुरांत घेऊन दीनांचा अुमाळा
अेकला चालला हाडाचा सापळा
अुद्याच्या शांतीचा साकार पुतळा
वाणींत घेऊन खिस्ताचा आवेश
कृतीने पेरीत गांधीचा आदेश
हातांत प्रीतीचा अंकुर कोवळा
अेकला चालला हाडाचा सापळा
अुद्याच्या शांतीचा साकार पुतळा
आत्म्याची आकांक्षा रेखीत स्मितांत
भुकेची यातना घेअून अुरांत
जीवनमूल्यांस द्यावया अुजळा
अेकला चालला हाडाचा सापळा
अुद्याच्या शांतीचा साकार पूतळा
विकल व्यथेची अैकत चाहूल
जोमाने टाकीत पुढेच पाअूल
महान क्रांतीचा पिकवीत मळा
अेकला चालला हाडाचा सापळा
अुद्याच्या शांतीचा साकार पुतळा

बाबा मोहोड

मुकुंदराजांचा स्थलनिर्णय (लेखांक ३ रा) :

सुरेश म. डोळके

प्रास्ताविक

गेल्या दोन लेखांकांत ' वैण्येगंगेचा तीरीं। मणोहर अंबानगरी। तेथ प्रगटले श्रीहरी। जगदीश्वरु॥' या ओळींतील प्रत्येक पदाचा विचार करून मुकुंदराजांनी उल्लेखिलेलें ' तीर ' हें मराठवाड्यांतील बाणगंगेचें नसून नागपूर-भंडाऱ्याची सीमारेषा असलेल्या ' वेनगंगेचें ' होय व ' मणोहर अंबानगरी ' ही आंबेजोगाई नसून अंभोर होय असें दाखविलें आहे व त्या ओवीच्या अनुषंगाने इतरहि पुराव्याचा विचार करून मुकुंदराजांचे आजेगुरु ' हरिनाथ ' व गुरु ' रघुनाथ ' ऊर्फ ' रामचंद्र बोबडे ' यांचा स्थलनिर्णय केला आहे. या शेवटच्या लेखांकांत मुकुंदराजांनी ' विवेकसिंधू ' हा ग्रंथ कुठे लिहिला असावा व त्यांनी समाधि कुठे घेतली असावी याचा विचार करूं.

मुकुंदराजांचें पूर्वचरित—

मुकुंदराजांच्या चरित्राबद्दल ' विवेकसिंधू ' वरून कांहीच माहिती मिळत नाही. गेल्या लेखांकांत (म. सा. पत्रिका अंक १०६) एक पत्र, एक कागद व दोन अभंग जे मीं उद्धृत केले आहेत त्यांवरून हरिनाथांची भेट होण्यापूर्वी मुकुंदराजांचें स्थळ कोणतें होतें व त्यांचा व्यवसाय कोणता होता याची थोडीफार कल्पना येते. ती अशी— ' मुकुंदराजांचें पूर्वीचें नांव मुकुंदभट्ट असें होतें. तो वाराणशीला ज्योतिषी होता. एकदा हरिनाथ रघुनाथांसह काशीला गेले असतां त्यांनी रघुनाथाला माधुकरीसाठी पाठविलें. रघुनाथ माधुकरी मागण्यासाठीं मुकुंदभट्टाच्या इथे गेला. मुकुंदज्योतिषाने त्या दिवशीं रघुनाथाचें मरण सांगितलें. पण हरिनाथांनी तें चुकविलें. दुसऱ्या दिवशीं रघुनाथाला मुकुंदभट्टाच्याच इथे माधुकरीसाठी पाठविलें. रघुनाथाला जिवंत पाहून मुकुंदभट्टाला आश्चर्य वाटलें. त्याने पुन्हा गणित केलें आणि रघुनाथाचें मरण आता टळलें असें सांगितलें. रघुनाथाचें मरण ज्या महापुरुषाने चुकविलें त्याच्या भेटीसाठी तो निघाला आणि रघुनाथ व हरिनाथ यांच्या मागोमाग तो ' वैण्येगंगेचा तीरांवरील ' अंबाणगरी ' येथे आला. हरिनाथांनी तिथे रघुनाथांकरवी त्याला गुरूपदेश दिला आणि त्याला ' मुकुंदराज ' किंवा ' मुकुंदराज योगी ' असें नांव दिलें... '

रामु गुणाचा सागरु। की महिमेचा मेरु
ब्रह्मविद्या देता उदारु। तोची येकु॥ (वि. सिं. अ. १८, १०७)
रघुणाथाचा गुणी। समान नाही त्रीभुवणि
म्हणौणी तोचि येकु योगि जणीं। वंदिजे रामचंद्र। (१८-१०९)

याप्रमाणें ओव्यांत मुकुंदराजांनी आपल्या गुरूचें स्तवन केलें आहे.

' भक्तिरहस्यां ' तील काव्यमय वर्णन—

विदर्भाकडील एका कवीने लिहिलेल्या 'संतचरित्र' ऊर्फ 'धर्मपुरी महात्म्य' या नांवाच्या काव्याच्या हस्तलिखित पोथींत मला मुकुंदराज व हरिनाथ यांच्याबद्दलची थोडी माहिती

आढळली. ' धर्मपुरीमहात्म्या ' वरूनच केशव जयराम नांवाच्या कर्त्याने शके १७७९ मध्ये ' भक्तिरहस्य ' हा ग्रंथ लिहिला. त्यांत हरिनाथ, रघुनाथ व मुकुंदराज यांच्यासंबंधी बरीच ' काव्यमय ' माहिती आढळते. ती पुढीलप्रमाणे:—

माधोकरी मागावयासी । रामचंद्र गेला नित्यक्रमेसी
मुकुंदभट महाजोतिषी । काशीवासी महाज्ञानी ॥ २५ ॥
तयाचिया वाडियांत । आला असे अकस्मात ।
भवती भिक्षांदेही असें वदत । समय उचित भोजनाचा ॥ २६ ॥
बलीहरण टाकावयासी । बाहेर आले महाजोतिषी ।
सन्मुख देखता द्विजासी । काय त्यासी अनुवादले ॥ २७ ॥
तुझें आयुष्य आजी सरलें । पांच याम असे उरले
जरी ब्रह्मदेव आले । तरी चुकलें नव जाय ॥ २८ ॥

रघुनाथांनी हें आपल्या गुरूला सांगितलें. हरिनाथांनी त्याचा मृत्यु चुकविला. आणि—

मनीं तोषोनि श्रीगुरुराय । निज शिष्यासी म्हणे जाय ।
जेथे मुकुंदभट आहे । मागोनि पाहे भिक्षा तया ॥ ५२ ॥
मुनीने वंदोनी श्रीगुरुचरण । स्नान-संध्यादी कर्म सारुन
तत्काळ प्रवेशला सदन । मुकुंदभटाचें तेधवा ॥ ५३ ॥
भटजी पाहताचि ते वेळेला । कालचा द्विज हा ओळखीला
मग तयातें पुसूं लागला । आश्चर्य मला वाटतसे ॥ ५४ ॥
म्हणे आजपर्यंत पाहे । मम वाक्य मिथ्या नोहे ।
द्विजा सांग रे लवलाहे । चुकला हें तूं मृत्यु कैसा ॥ ५५ ॥
म्हणे तुजसवे कोण समर्थ । चुकवीलासे अनर्थ
येरू म्हणे श्रीगुरूनाथ । जन्म मृत्यु चुकवीतो ॥ ५८ ॥
श्रवणीं भरता वर्तमान । म्हणे आतां कायसा शीण ।
जावोनि घ्यावे संतदर्शन । सार्थक पूर्ण करावें ॥ ५९ ॥

पण रघुनाथांनी सुरुवातीला आपल्या गुरूचें नांव मुकुंदभट्टाला सांगितलें नाही. मुकुंद-ज्योतिषाने आपली सर्व संपत्ति ब्राह्मणांना दान केली व जेव्हा सर्वसंगपरित्याग केला, तेव्हा कुठे रघुनाथांनी हरीनाथांचें नांव त्याला सांगितलें.

ऐसे रामचंद्रें पाहता । श्रुत केलें श्रीगुरुनाथा
स्वामी परिसोनी वृत्तांता । म्हणे आता राहू नये ॥ ६४ ॥
ऐसे हरिहरें जाणोन । मनोवेग मार्गें करून ।
एकाएकीच केलें प्रयाण । मुनिशी मिळोन जाती दोघे ॥ ६६ ॥
स्वस्थानाशी स्वामी आले । दिवसांतरे तेही पावले ।
साष्टांगें चरण वंदिले । मग विनविलें मुकुंदें ॥ ६७ ॥

अशा रीतीने मुकुंदभट्टाची हरिनाथांशीं भेट झाली......

‘ काव्यवाणी ’ चा ‘ ऐतिहासिकता ’—

मुकुंदराजांच्या पूर्वचरित्राविषयीची ही ‘ काव्यवाणी ’ कितपत ‘ ऐतिहासिक ’ मानावी हा प्रश्न आहे. पण ती माहिती पत्र, कागद आणि अभंग यांच्यांतील माहितीशीं जुळती आहे यांत शंका नाही. ‘ भक्तिरहस्य ’ हा ग्रंथ पौराणिक स्वरूपाचा ठरविला व त्यामुळे त्यांतील माहिती ऐतिहासिक दृष्टीने त्याज्य ठरविली, तरी त्याच्याहि पूर्वीच्या पत्र, कागद आणि अभंग यांच्यांतील माहितीला त्यामुळे बाध येऊं शकत नाही. मुकुंदभट्टाची रघुनाथांशीं व हरिनाथांशीं भेट कशी झाली याचा सलग दुवा वरील काव्यग्रंथांत मिळतो व तो इतर पुराव्यांना उपोद्बलक आहे म्हणूनच त्यांतील ओव्या मीं वर उध्दृत केल्या. भावे[१], भिडे[२], पांगारकर[३], किंवा आजगावकर[४] यांनी मुकुंदराजांविषयी लिहितांना त्यांच्या पूर्वचरित्राबद्दल कांहीहि लिहिलें नाही. स्वतः मुकुंदराज तर या बाबतींत मुग्धच आहेत. म्हणून, मुकुंराजांच्या पूर्वचरित्रा-विषयींची वरील माहिती ग्राह्य मानावयाला हरकत राहूं नये.

‘ विवेकसिंधू ’चें रचनास्थल—

‘ विवेकसिंधू ’ या ग्रंथांची निर्मिति कुठे झाली ?

नृशिंव्हाचा बल्लाळु । तयाचा पुत्र जैतपाळु
तेणे करविला गदारोळु[५] । ग्रंथरचणेचा ॥ (वि. सिं. ७–१५२)

या ओवीवरून जैतपाळाच्या राज्यांत मुकुंदराजांनी ‘ विवेकसिंधू ’ हा ग्रंथ लिहिला अशीच कुणाचीहि कल्पना होईल.

भगीरथाचेनि दैवयोगे । विश्व सुष्णात होणे गंगे ।
तैसे जैतपाळाचेणि प्रसंगे । जग सुखी होये ॥ (७–१५३)
म्या आपुली वाणी । पवित्र केली इही वचणी
प्रीति पावो पिनाकपाणी । म्हणे मुनि मुकुंदराज ॥ (७,१५४)

या ओव्यांवरून जैतपाळाच्या राज्यांत मुकुंदराजांनी ‘ विवेकसिंधू ’ निर्माण केला असावा असें सर्व नव्याजुन्या संशोधकांचें मत होणें स्वाभाविक आहे.

पण ‘ विवेकसिंधू ’ व इतर उपलब्ध पुरावा यांवरून ‘ विवेकसिंधू ’ ची रचना जैतपाळाच्या राज्यांत झाली नसून अंभोरें येथेच झाली असावी असें मला वाटतें.

‘जैतपाळाने ग्रंथरचनेचा गदारोळु करविला’ याचा अर्थ जैतपाळाने मुळांतच ‘ग्रंथरचना करविली’ असा होत नसून ‘ ग्रंथरचनेचा उद्घोष करविला ’ असा होतो. पुढच्याच ओवींत मुकुंदराजांनी दिलेला दृष्टान्तहि हेंच दर्शवितो. भगीरथाच्या दैवयोगाने विश्व ज्याप्रमाणे गंगेमुळे ‘ सुष्णात ’ झालें त्याप्रमाणे जैतपाळाच्या प्रसंगाने जग सुखी झालें. भगीरथाने गंगा निर्माण

१—महाराष्ट्र-सारस्वत (आ. २ री. पृ.) १८–२६.

२—मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास. पृ. ७९–८१.

३—मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड १ ला) पृ. ३८९–३९५.

४—महाराष्ट्र कवि चरित्र पृ. १–१२.

५. ‘ गदारोळु ’ याऐवजी ‘ रोळु ’ असाहि पाठ आढळतो.

केली असें नाहीं तर त्याने ती इथे आणली व त्यामुळे विश्व 'सुण्णात' झालें. त्याचप्रमाणे जैतपाळाने 'विवेकसिंधू' हा ग्रंथ 'लिहविला' असें नसून पूर्वीच निर्माण झालेल्या ग्रंथाचा उद्घोष करविला; व त्यामुळे—म्हणजे जैतपाळाच्या निमित्ताने (प्रसंगाने) 'विवेकसिंधू' हा ग्रंथ मुकुंदराजांनी 'सांगितला' म्हणून—जग सुखी झालें...

'प्रसंगें' या शब्दांत दुसराहि एक अर्थ अनुस्यूत आहे. हा प्रसंग कोणता? हरिवरदाकार कृष्णदयार्णवांनी मुकुंदराजांची जी आरती केली आहे, तिच्यांत—

जैतपाळ भूपतीने । केला दर्शना कोंड ।
अपरोक्ष बोध वाहे । त्यासी घातिलें कोड ॥

असें म्हटलें आहे. या 'कोडां' तून 'वेदवेदांतबीज' मुकुंदराजाने

दर्शनें सोडविलीं । भूप चिन्मात्र केला ।
वेदांत सांख्ययोगे । सांप्रदाय शिक्षीला ॥

या घटनेवरून मुकुंदराजांनी मुळांत उल्लेखिलेला जैतपाळाचा 'प्रसंग' कोणता याची कल्पना येऊं शकेल. श्रीकृष्णांनी अर्जुनाला उपदेश करण्याच्या निमित्ताने समरांगणावर ज्याप्रमाणे भगवद्गीता निर्माण केली, त्याप्रमाणे मुकुंदराजांनी जैतपाळाचा उद्धार करण्याच्या निमित्ताने तिथल्या तिथे 'विवेकसिंधु' हा ग्रंथ निर्माण केला नाही, तर पूर्वीच लिहिलेल्या त्या ग्रंथांतील तत्त्वज्ञान सांगून 'दर्शनें सोडविलीं' व 'भूप चिन्मात्र केला.'

म्या आपुली वाणी । पवित्र केली इहीं वचणी ।'

या ओवींत मुकुंदराजांनी 'वाणी' हाच शब्द वापरला आहे. 'या वचनांनी मी आपली वाणी पवित्र केली' म्हणजे 'पूर्वीच सिद्ध असलेल्या वचनांनी...' असा अर्थ होतो.

इतर पुरावा—

गेल्या लेखांत पत्र, कागद व अभंग यांचा जो पुरावा मीं दिला त्यावरूनहि मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू' आंभोऱ्यालाच लिहिला असें दिसतें. 'भक्तिरहस्य' या ग्रंथांतहि यासंबंधी उल्लेख आहे—

जयजयकारें करून । उत्साह करीती संतजन ।
नंतर मुकुंदस्वामीन । ग्रंथ पूर्ण आरंभिला ॥ ७७ ॥
बैसोनिया समाधीपाशीं । वाचतीं केलिया वोवीसी ।
हुंकार शब्द निघता तिसी । मग ग्रंथासी लाविती ॥ ७८ ॥
अष्टादशाध्यायपर्यंत । येच रीती केला ग्रंथ ।
विवेकसिंधूचा गुह्यार्थ । जाणती संत अनुभवी ॥ ७९ ॥

कळमेश्वर येथील मठांत उपलब्ध झालेल्या मोडी कागदांतहि "...पुढे हरिनाथ यानी व रघुनाथ यानी शके ११०८ मध्ये समाधी घेतली व नंतर शके १११० मध्ये विवेकसिंधु शारंगधर राजा अंबनगरीस असतांना तयार झाला व पुढे जयंतपाळ राजाचा उधार करून विवेकसिंधूचा बोध केला" असें स्पष्ट म्हटलें आहे.

अंतरंग पुरावा—

अंतरंग पुराव्याच्या दृष्टीने पाहिलें तर पुढील ओव्या ' विवेकसिंधू ' च्या रचना स्थलावर प्रकाश पाडूं शकतील—

शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
राजा शारंगधरू । राज्य करी ॥
ऐसा समयो सर्वोत्तमु । तेथ मुकुंद द्विजोत्तमु ।
विवेकसिंधु मनोरमु । निर्मिता जाला[६] ॥ (वि. सिं. उत्तरार्ध, अ. ११.)

यावरून शारंगधर राजा राज्य करीत असताना त्याच्या राज्यांत (तेथ) मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू' ग्रंथ निर्माण केला हें स्पष्ट दिसतें. हा शारंगधर राजा कुठला ? उपलब्ध इतिहासांत त्याचा उल्लेख आढळत नाही. मुकुंदराजांनी शारंगधराच्या राज्यांत ' विवेकसिंधू ' लिहिला व जैतपाळाच्या ' प्रसंगा ' ने त्याचा 'गदारोळ' केला हें मात्र यावरून सहज ओळखतां येईल.

शारंगधर राजा कुठला ?—

ज्या शारंगधराच्या राज्यांत मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु' लिहिला, त्याच्या स्थळकालासंबंधी अभ्यासकांसमोर मोठें गूढ आहे. इतिहासांत शारंगधराचा उल्लेख नाही. 'शारंगधर राजा अंबनगरीस असतांना विवेकसिंधु तयार झाला' असें कळमेश्वर येथील मठांत उपलब्ध झालेल्या कागदांत म्हटलें आहे. यावरून शारंगधर हा अंबनगरीचा किंवा आंभोऱ्याचा राजा असावा असा तर्क मनांत उभा राहतो. चांदा येथील गोंड राजांची इ. स. ८७० पासून तों १७५१ पर्यंतची वंशावळ मिळते पण तिच्यांत शारंधराचें नांव नाही. यावरून तो चांद्याचा राजा नसावा. तो आंभोऱ्याचाच राजा असावा किंवा चांद्याच्या गोंड राजांचा मांडलिक असावा. अंभोरा येथे कोलासुराच्या उंच पहाडावर ज्या प्राचीन किल्ल्याचे अवशेष आढळतात (त्यासंबंधीची माहिती म. सा. पत्रिका अंक १०५ मधील माझ्या लेखांत पहावी) तो पहाडी किल्ला हें शारंगधराचें निवासस्थान असावें. अंभोरा ही मुकुंदराजांच्या काळीं मोठी वैभवसंपन्न नगरी असावी हें मीं त्या लेखांत दाखविलेंच आहे.

६. या ' विवेकसिंधू 'तल्या ओव्यांबद्दल खूपच मतभेद आहेत. या ओव्या के. भावे आपल्या 'महाराष्ट्र-सारस्वतां'त उध्दृत करतात. त्यांना 'विवेकसिंधू'च्या दोन पोथ्यांत या ओव्या आढळल्या होत्या. (म. सा. पृ. २५, आ. २ री). कै. भिडे (म. भा. व वा. इतिहास, पृ. ७९ आ. १ ली) व कै. पांगारकर (म. वा. इ. खंड १ ला पृ. ३९१, आ १ ली) यांनीहि त्या उध्दृत केल्या आहेत. प्रा. कृ. पां. कुलकर्णी (मराठी भाषा उद्गम व विकास) व डॉ शं. गो. तुळपुळे (यादव कालीन मराठी भाषा, पृ. ४; म. सा. पत्रिका, वर्ष २३ अंक ३, पृ. १९; महाराष्ट्र-सारस्वत-पुरवणी पृ. ८४४) हेहि त्यांचा सर्रास उपयोग करितात. श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'विवेकसिंधू'ची भाषाशास्त्रीय आवृत्ति काढण्याच्या इराद्याने विवेकसिंधूचीं ४० हस्तलिखितें जमविलीं आहेत. त्यांनाहि कांही प्रतींत या ओव्या आढळल्याचें त्यांनी मला सांगितलें. मला माझ्याजवळ असलेल्या दोन हस्तलिखित 'विवेकसिंधू'त या ओव्या आढळल्या, व आणखी तीन प्रतींत मीं या ओव्या पाहिल्या. भावे, पांगारकर व तुळपुळे यांचें या ओव्यांच्या बाबतींत असें म्हणणें आहे की शके १११० मध्यें कीलक-संवत्सर येतो, साधारण संवत्सर येत नाही. साधारण संवत्सर शके १११२ मध्ये येतो व त्यामुळे या ओव्यांतील शक-संवत्सरांचा मेळ बसत नाहीं. बाकी, या ओव्यांवरून, मुकुंदराजांनी शारंगधराच्या राज्यांत 'विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिला हे सर्व संशोधक मान्य करतात.

आंभोरा येथे मुकुंदराजांनी मराठी ग्रंथ लिहिला. त्या आधी त्या प्रांतांत मराठी ही बोलभाषा म्हणून अस्तित्वांत असावी. कोणत्याहि भाषेला ग्रांथिक स्वरूप प्राप्त होण्याआधी ती लोकांच्या बोलण्यांत असावी लागते. म्हणून, शके ११९० च्या आधी मराठी ही बोलभाषा म्हणून प्रचलित होती की काय याचाहि विचार येथे आवश्यक आहे. चांद्याच्या राजांची जी वंशावळ मला सापडली[७], तिच्यांत इ. स. ८७० पासून इ. स. १७५१ पर्यंत म्हणजे चांदा येथे मराठ्यांची राजवट सुरू होईपर्यंत जे राजे होऊन गेले, त्या प्रत्येकाचें नांव त्याच्या राजवटीच्या कालखंडासहित दिलेलें आहे. त्यांपैकी आठवा राजा रामसिंग (इ. स. ११४२ ते १२०७) याने मराठी भाषा राज्यांत सुरू केली, असा स्पष्ट उल्लेख आहे. वरील वंशावळ कितपत विश्वसनीय मानावी हा प्रश्नच आहे. पण, इतर राजांचीं नुसतीं नांवें दिलीं असतांना याच राजापुढे 'यानें मराठी भाषा राज्यांत सुरू केली' असा निर्देश कां असावा, असाहि प्रश्न मग विचारतां येईल. असो. चांदा प्रांतांत मराठी भाषा बोली म्हणून कधी प्रचलित झाली हें मराठीच्या पूर्वपीठिकेच्या व विवेकसिंधूच्या रचनास्थलाच्या दृष्टीने महत्वाचें आहे. निश्चित साल दिलें असल्यामुळे तर त्याचें महत्व विशेषच वाटतें.

इ. स. ११४२ पासून चांद्याला राज्य करणाऱ्या हिंदू राजाने मराठीचा बोलभाषा म्हणून आपल्या राज्यांत स्वीकार करावा, त्या बोलभाषेला राजमान्यता द्यावी, त्याच चांद्याच्या रामचंद्र ऊर्फ रघुनाथ बोबडे नांवाच्या एका ब्राह्मणाने त्याच सुमारास अंभोरा येथील हरिनाथांचें शिष्यत्व स्वीकारावें व त्याच्याच शिष्याने इ. स. ११८८ मध्ये—म्हणजे चांदा प्रांतांत मराठीला बोलभाषा म्हणून राजमान्यता मिळाल्यावर सुमारें ४० वर्षांनी 'विवेकसिंधु' हा मराठींतला आद्यग्रंथ चांद्यापासून ५० मैलांवर असलेल्या 'वैनगंगेच्या तीरावरील मनोहर अंबानगरीला' लिहावा हें औचित्यपूर्ण नाही का ? —

अंभोऱ्याला आजहि आढळणाऱ्या पहाडी किल्ल्याच्या प्राचीन अवशेषांवरून एकेकाळीं ती फार मोठी व वैभवसंपन्न नगरी असावी हें ज्याप्रमाणे दिसून येतें, त्याचप्रमाणे मुकुंदराजांनी ज्याच्या राज्यांत विवेकसिंधु लिहिला तो शारंगधर राजाहि अंबनगरीला असावा व पहाडावरचा भग्नावशेष किल्ला हें त्याचें निवासस्थान असावें असा तर्क मनांत उभा राहतो. मुकुंदराज 'राजा' म्हणून शारंगधराचा उल्लेख करितात. यावरून तो स्वतंत्र राजा असावा असेंच प्रथमदर्शनीं वाटतें. पण त्या काळीं अंभोऱ्याच्या परगणा [प्रगणे आंभोरा असा उल्लेख जुन्या कागदपत्रांत अजूनहि आढळतो] हा चांद्याच्या राज्यांत समाविष्ट होत असावा व त्या परगण्याचा शारंगधर हा राजा असावा. त्याला मग चांद्याच्या राजांचा मांडलिक म्हणा की चांद्याच्या राज्यांत समाविष्ट होणाऱ्या आंभोऱ्याच्या परगण्याचा स्वतंत्र वहिवाटदार म्हणा.

जैतपाळ कुठला ?—

ज्या जैतपाळाच्या 'प्रसंगानें' मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु' सांगितला, त्या जैतपाळासंबंधीहि, शारंगधराप्रमाणेच, अभ्यासकांसमोर फार मोठें कोडें आहे. मुकुंदराज शारंगधराचा 'राजा' म्हणून जसा स्पष्ट उल्लेख करतात, तसा जैतपाळाचा करीत नाहीत तथापि, जैतपाळ हा राजा असावा असेंच जुन्यानव्या सर्व संशोधकांनी लिहून ठेवलें आहे. आणि यांतूनच जयत्पाळ हा द्वारसमुद्र येथील वीरबल्लाळ राजाचा पुत्र होता, तो जाधव कुळांतील राजा होतो,

---

७ मूल येथे श्री. खटी यांचा हस्तलिखित संग्रह चाळीत असतांना ही वंशावळ मिळाली.

८. के. जनार्दन बाळाजी मोडक

९. के. वामन दाजी ओक (काव्यसंग्रह)

मुकुंदराजांनी उल्लेखिलेला बल्लाळ हा भिल्लम होय व जैतपाळ हा जैत्रपाळ होयं, किंवा तो देवगिरीच्या यादववंशांतील राजा होय असे निरनिराळे तर्क निष्पन्न झाले व त्यांची निष्कृतीहि झाली. डॉ. य. खु. देशपांडे यांना मेघचंद्रकृत यक्षदेवआम्नायांत 'जयंतपाळा' संबंधी कांही नवीन माहिती मिळाली व ती त्यांनी प्रसिद्धहि केली.[11]

जैतपाळ हा राजा होता याला विवेकसिंधूत पुरावा नाही. इतिहासांतहि आधार मिळत नाही. परंपरागत समजुतीप्रमाणे मात्र तो राजा होता. कृष्णदयार्णवांनी मुकुंदराजावरच्या आपल्या आरतींतहि 'जैतपाळ भूपतीने। केला दर्शना कोंड' असा जैतपाळाचा उल्लेख केला आहे. मुकुंदराजांनी शारंगधराचा ज्याप्रमाणे 'राजा' असा उल्लेख केला, त्याप्रमाणे जैतपाळाचा ज्या अर्थी केला नाही, त्याअर्थी तो राजा नसावा अशी एक शंका मनांत चमकून जाते. पण परंपरेचा व इतर पुराव्याचा कौल पाहतां तो राजा असावा असें मानण्याशिवाय गत्यंतर नाही. मग तो स्वतंत्र राजा असो की मांडलिक राजा असो.

मुकुंदराजांची समाधि बैतूलजवळील खेडला येथील किल्ल्यांत आहे. यावरून जैतपाळ हा खेडल्याचा राजा असावा असें साहजिकच वाटतें. खेडला येथील गोंड–रजपूत राजवंश इतिहासांत नमूद आहे.[12] इ. स. १३९८ मध्ये खेडला येथे राज्य करीत असलेला नरसिंग-राय हा मोठा वैभवसंपन्न राजा होता असें फरिश्त्याने आपल्या इतिहासांत लिहून ठेवलें आहे.

खेडला येथील गोंड–रजपूत वंशांतला नरसिंगराय हा पहिला राजा. त्याच्याहि आधी सुमारें २०० वर्षें खेडल्याला रजपूत–वंशीय राजांचें राज्य होतें. जैतपाळ हा रजपूत राज-वंशांतला शेवटचा राजा. खेडला येथील किल्ल्यांत जैतपाळ व त्याची राणी या दोघांच्याहि समाधि अजून आहेत, व त्याला जैतपाळाचा किल्ला याच नांवाने अजूनहि संबोधतात.

पांचव्या शतकांत विदर्भांत व बैतूल जिल्ह्यांत वाकाटकांचें राज्य होतें. त्यानंतर तेथे राष्ट्र-कूटाचें राज्य आलें. राष्ट्रकूट राजांनी दिलेलीं कांही ताम्रपत्रें मुलताई व तिवरखेड (मुलताई-पासून १० मैल) येथील कांही लोकांजवळ मिळालीं. तीं इ. स. ६३१ व ७०९ मध्ये दिलेलीं आहेत. त्यांत दुर्गराज, गोविंदराज, स्वामिकराज व नन्नराज अशी राष्ट्रकूट राजांची वंशावळ आढळते. इ. स. ९५० पर्यंत या राठोडांचें (राष्ट्रकूट) राज्य दक्षिणेंत होतें. त्यांच्याच एका वंशजाने एलोरा लेण्यांतील कैलासमंदिर खोदविलें. जैतपाळ हा त्यांचाच वंशज व खेडला येथील शेवटला रजपूत (राठोड) राजा असावा. अकराव्या शतकाच्या शेवटीं राष्ट्रकूटांचें राज्य पूर्णपणें बुडालें यांवरूनहि जैतपाळ हा राष्ट्रकूट राजांचा शेवटला वंशज असावा असें वाटतें.

मुकुंदराजांची समाधि—

मुकुंदराजांची समाधि कुठे आहे, यासंबंधीहि विद्वानांत मतभेद आहे. डॉ. तुळपुळे यांनी मुकुंदराजांची समाधि आंबेजोगाईला असल्याचा पक्ष उचलून धरला आहे.[13] 'याची समाधि जोगाईच्या आंब्याजवळ आहे.' असें कै. जनार्दन बाळाजी मोडक, कै. वामन दाजी

१०. कै. डॉ. भाऊ दाजी

११. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें त्रैमासिक. वर्ष १२, अंक २.

१२—History of tha Central Provinces and Berar By J. N. Sil

१३—म. सा. पत्रिका. वर्ष १३, अंक ३ रा; महाराष्ट्र-सारस्वत–पुरवणी

ओक[१४] इत्यादि विद्वानांचें मत होतें. वैनगंगेच्या तीरीं असलेली 'मनोहर अंबानगरी' हें प्रामुख्याने हरिनाथाच्या तपश्चर्येचें व समाधीचें स्थल होय. मुकुंदराजांनी 'विवेकसिंधूत' तसें स्पष्ट लिहून ठेवलें आहे. अंभोऱ्याला मुकुंदराजांची समाधि नाही. जैतपाळाचा उद्धार केल्यानंतर मुकुंदराजांनी समाधि घेतली. जैतपाळ हा खेडल्याचा राजा असेल तर त्याचा उद्धार केल्यानंतर मुकुंदराज आंबेजोगाईला जाऊन समाधि कशाला घेतील? त्यापेक्षा त्यांनी सरळ आपल्या गुरूच्या व आजेगुरूच्या समाधिजवळ जाऊन तेथेच समाधि घेतली असती. आंबेजोगाइशीं त्यांचा जर संबंधच आला नाही तर तिथे जाऊन समाधिस्थ होण्याचें ह्यांना काय प्रयोजन होतें? शिवाय, आंबेजोगाइला मुकुंदराजांची जी समाधि दाखविण्यांत येते तिच्यासंबंधी हैद्राबाद येथील मराठीचे प्राध्यापक र. म. भुसारी यांनी चौकशी केली असतां ती शेदीडशे वर्षांहून जुनी नाही असें त्यांना समजलें.[१५]

जैतपाळाचा जाहीरनामा—

जैतपाळाला ब्रह्मसाक्षात्काराचा उमाळा आला व आपल्याला ब्रह्मदर्शन घडवावें असा त्याने जाहीरनामा काढला. त्याच्या राज्यांत येणाऱ्या प्रत्येक साधुसंताला तो हाच प्रश्न विचारी व त्या प्रश्नाचें उत्तर देण्यास असमर्थ ठरलेल्या साधुसंतांची तो तुरुंगांत रवानगी करी. मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू' ग्रंथ आधीच लिहिला होता. त्यांतील तत्वज्ञान जैतपाळाला सांगून त्याला आपण ब्रह्मदर्शन घडवूं असा मुकुंदराजांना आत्मविश्वास वाटला. ते अंभोऱ्याहून खेडल्याला जावयास निघाले. तुरुंगांत रवानगी केलेल्या साधुसंताकरवीं जैतपाळ तलाव खोदण्याचें व चक्की ओढण्याचें काम करून घेई. खेडला येथील किल्ल्याच्या परिसरांत जात्याच्या जुन्या तऱ्हेच्या मोठमोठ्या पाऊ अजूनहि ठेवलेल्या दृष्टीस पडतात. त्यांची माहिती तेथील गांवकऱ्यांना विचारली असतां ते हीच आख्यायिका सांगतात. जात्याच्या पाऊ मीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत

जैतपाळाने जो तलाव खोदविला, त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असतां असा तलाव खेडल्यापासून सहा मैलांवर असलेला दृष्टीस पडतो. तलाव विस्तीर्ण असून त्याच्या कांठावर 'भोपाली' नांवाचें खेडें आहे. खेडला हें गांव त्याकाळीं फार मोठें असल्यामुळे (कारण एवढा मोठा किल्ला लहान गावीं असणें शक्य नाही) त्याच्या वेशीवर (म्हणजे सध्याच्या भोपाळीला) हे तलाव खोदण्याचें काम चालू असावें.

मुकुंदराज तेथे गेले. त्यांनी जैतपाळाला घोड्यावर बसविलें; व हातांतील वेताच्या छडीने त्याला व घोड्याला मारतांच जैतपाळाची समाधि लागली. त्याला ब्रह्मदर्शन झालें. नागपूर येथील गणोबाच्या वाडींतील मुकुंदराजांच्या परंपरेंतील मठांत मुकुंदराजांनी ज्या छडीने जैतपाळाला ब्रह्म दाखविलें, ती वेताची छडी अजूनहि पूजेकरिता ठेवलेली दाखवितात. अशा रीतीने मुकुंदराजांनी

जयत्पाळासी उद्धरिलें। भिक्षुक अवघे मुक्त केले।
संत परोपकारी भले। महात्म्य वर्णिलें नव जाये॥ भक्तिरहस्य.

किंवा, कृष्णदयार्णवांनी वर्णन केल्याप्रमाणे

दर्शनें सोडविलीं। भूप चिन्मात्र केला।
वेदांत सांख्ययोगे। सांप्रदाय शिक्षीला॥

१४—काव्यसंग्रह

१५—साहित्य आणि संशोधन–प्रा. भुसारी; पृ. ११ ...

जयंतपाळ व घोडा या दोघांचीहि समाधि—

खेडला येथील किल्ल्याच्या वरच्या मजल्यावर जैतपाळाची समाधि आहे. किल्ल्याचा परीघ सुमारें दोन मैल असून परिघाभोवती चारहि बाजूंनी खोल खंदक आहे. किल्ल्याच्या परिघांत एक उंच टेकडी असून त्या टेकडीवर सुंदर राजमहालाची रचना आजहि दृष्टीस पडते. या महालासमोरच जैतपाळाची समाधि आहे.

टेकडीच्या पायथ्याशीं, किल्ल्याच्या खालच्या मजल्यावर, तटबंदीच्या आंत, मुकुंदराजांची समाधि असून तेथे आंभोरा येथील हरिनाथांच्या समाधीप्रमाणेच शिवरात्रीला मोठी यात्रा भरत असते. मुकुंदराजांच्या समाधीजवळच मुकुंदराजांनी ज्या घोड्यावर बसवून जैतपाळाला ब्रह्म दाखविलें, त्या घोड्याचीहि समाधि आहे. समाधीच्यावर महादेवाची पिंड आहे. इ. स. १९०७ सालीं समाधीजवळ श्री. गैबीदास ऊर्फ पंडितजी यांनी सभामंडप आणि धर्मशाळा बांधली आहे.

मज स्वासोस्वासाचा श्रमु । तेथे कायसा ग्रंथाचा उद्यमु
परि फळला मनोधर्मु । सदैवाचा ।। (वि. सिं. ७-१५१)

या ' विवेकसिंधू ' तल्या ओवींवरून ' विवेकसिंधु ' निर्मितीच्या काळीं मुकुंदराज 'स्वासोस्वासाचा श्रम' लागण्याइतके म्हातारे होते असें दिसतें, ' विवेकसिंधू ' पूर्ण झाल्यावर जैतपाळाचा उद्धार करण्याकरिता मुकुंदराज त्याच्याकडे गेले. व त्यानिमित्ताने पूर्वीच लिहून ठेवलेलें * तत्वज्ञान जगाला ' सांगून ' त्यांनी जग सुखी केलें. जैतपाळाचा उद्धार केल्यानंतर त्यांनी तेथेच समाधि घेतली. जैतपाळ व मुकुंदराज या दोघांचीं नांवें ज्याप्रमाणे एकमेकांशीं निगडित झालीं आहेत, त्याचप्रमाणे या दोघांचीं समाधिस्थळेंहि एकमेकांशीं निगडित झालीं आहेत. जैतपाळाची समाधि, घोड्याची समाधि मुकुंदराजांची समाधि, तलाव, जात्यांच्या पाऊ इत्यादि सर्व खुणा खेडल्याच्या किल्ल्यांत असल्यामुळे मुकुंदराजांनी खेडल्यालाच समाधि घेतली असें माझें मत झालें आहे.

याला उपोद्‍बलक असें दुसरेंहि एक ठिकाण आंभोरें व खेडला यांच्या मधोमध दाखवितां येईल. आंभोऱ्यापासून ७५ मैलांवर खेडल्याच्या दिशेने नरखेड म्हणून एक गाव आहे. आंभोऱ्याहून खेडल्याला जातांना (तत्कालीन प्रवास बहुशः पायींच केल्या जात असे.) मुकुंदराज त्याठिकाणीं विश्रांतीकरिता थांबले होते, अशी तेथील लोकांची समजूत आहे. त्यांच्या विश्रांतिस्थळावर एक देऊळ उभारण्याचें काम सध्या तेथे चालू आहे. यावरूनहि मुकुंदराजांनी खेडला येथेच समाधि घेतली असली पाहिजे असें मला निश्चितपणें वाटतें.

---

* मुकुंदराजांनी ' विवेकसिंधू ' हा ग्रंथ जैतपाळाची भेट होण्यापूर्वीच ' लिहिला ' होता असें मी वर दाखविलें आहे, त्याचें आणखी थोडें स्पष्टीकरण असें—मुकुंदराज विवेकसिंधू लिहीत असतांनाच जैतपाळाचा जाहीरनामा त्यांच्या कानावर आला. लिहावयाला घेतलेला ग्रंथ त्यांनी पूर्ण केला. व मग ते जैतपाळाच्या उद्धाराकरिता खेडल्याला गेले. आपल्या ग्रंथांतील तत्वज्ञानाने आपण जैतपाळाला ब्रह्म दाखवूं शकूं असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता व त्या आत्मविश्वासानेच त्यांनी नुकताच लिहून पूर्ण केलेल्या विवेकसिंधूंतील तत्त्वज्ञान **सांगून** ' जयंतपाळाचेनी प्रसंगें ' जग सुखी केलें.

मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ? :

१ कालखंड कसे असावे ?

पु. य. देशपांडे

मराठी भाषा बोलणारे लोक सुमारें तीन कोटी आहेत. आपल्या राष्ट्रीय घटना-कायद्यांत हिंदीला जसा अधिकृत राष्ट्रभाषेचा मान देण्यांत आला आहे तसाच त्यांत इतर तेरा भाषांना प्रादेशिक राज्यभाषांचा मान देण्याबाबतचा संकल्प नमूद करण्यांत आला आहे या प्रादेशिक भाषांत अर्थात् मराठीलाहि मान्यता मिळाली आहे. हिंदीसहित ज्या १४ भाषांनी व या भाषांतील वाङ्मयांनी भारतीय संस्कृतीच्या सुंदर व भव्य महावस्त्राची वीण गुंफली आहे, तींत मराठी भाषेच्या रंगरसपूर्ण धाग्यादोऱ्यांनी महत्त्वाची भर टाकली आहे. अशा आपल्या या मराठी भाषेचा व वाङ्मयाचा साकल्यात्मक व सर्वमान्य इतिहास अद्याप लिहिला जाऊं नये, ही खेदाची गोष्ट आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेने जरा उशिरां का होईना, पण हा इतिहास लिहिण्याची योजना गंभीरपणें हातीं घेतली आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. ही जबाबदारी अंगावर घेण्याचें धैर्य दाखविल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेस सर्व मराठीप्रेमी जनता अंतःकरणपूर्वक धन्यवाद देईल.

मराठी भाषा व वाङ्मय यांचा इतिहास लिहिण्याचें काम सोपें नाही. अनेक भाषा व अनेक प्रकारचें वाङ्मय यांचा गाढ व्यासंग, वाङ्मयाच्या पार्श्वभूमीची भरपूर व अचूक ऐतिहासिक माहिती, शास्त्रीय व रसग्रहणात्मक दृष्टि आणि निर्दोष व परिणामकारक मांडणी, इत्यादि गुणांची कोणत्याहि उत्तम वाङ्मयेतिहासाला आवश्यकता असते. महाराष्ट्र साहित्य परिषदेने, संकल्पिलेल्या योजनेंत, अनेक विद्वानांचें व साहित्यिकांचें सहकार्य घेण्याचें ठरविलें आहे. अनेकांचें हें सहकार्य एका विशाल दृष्टीच्या एकसूत्रीपणांत गोवलें जाणें अत्यावश्यक आहे. या सर्व गोष्टींची यथायोग्य दखल मराठी वाङ्मयाचा इतिहास तयार करतांना महाराष्ट्र साहित्य परिषद घेईल, अशी आपण आशा करूं या.

मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा, या विषयाशीं संबद्ध असलेल्या एका महत्त्वाच्या अंगाबाबतच मी आज आपले विचार त्रोटकपणें सांगणार आहें. हें अंग म्हणजे या वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे असावेत ?

इतिहास म्हणजे कालक्रमानुसार घटनांची मांडणी, अशी इतिहासाची स्थूल व्याख्या करण्यांत येते. पण ही व्याख्या वाङ्मयेतिहासाला जशीच्या तशी लावणें बरोबर होणार नाही. वाङ्मयाचा उगम व विकास यांचा वाचकांच्या मनावर उत्तम ठसा उमटविणें, हाच वाङ्मयेतिहासाचा मुख्य हेतु असतो, अथवा असला पाहिजे. आणि उगम व विकास हे शब्द उच्चारतांच कांही विशिष्ट गोष्टी त्यांत अपरिहार्यपणें अनुस्यूत होतात. विकास हा चैतन्यालाच असतो, जडाला नसतो. एका विशिष्ट प्रकारच्या बीजापासून कोमल पत्रांचें रोप उदयास येतें व त्याचेंच पुढे पुष्प-फलवान् वृक्षांत रूपांतर घडून येतें. सजीव बीजाचा हा विकास आहे. मनुष्यहि लहानाचा मोठा होतो; ज्ञान, इच्छा व कृति ह्या त्याच्या अंगभूत गुणांचा कमीअधिक प्रमाणांत विकास घडून येतो; आणि कधी कधी या विकासाचाच एक परिपाक म्हणून त्याच्या

हातून वाङ्मय लिहिलें जातें. वाङ्मय हें मूलत: व्यक्तित्वविकासनिष्ठच असतें, असें दिसून येईल.

प्रदीर्घ कालखंडाच्या अंतराळांत असंख्य व्यक्ति जन्मास येतात, लहानाच्या मोठ्या होतात व नंतर कालवश होतात. पण आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्वाच्या खुणा इतिहासावर कोरून ठेवणाऱ्या व्यक्ति नेहमीच अल्पसंख्य असतात. वाङ्मयाच्या क्षेत्रांत असें वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व प्रकट करणाऱ्या व्यक्ती तर त्यांहून विरळा असतात. वाङ्मयेतिहास म्हणजे या अशा विरळा व्यक्तींच्या प्रतिभाशाली कलाभिव्यक्तींचाच विकास होय.

वाङ्मयाचा इतिहास म्हणजे 'प्रतिभाशाली कलाभिव्यक्तींचा विकास' हें सूत्र नीट ध्यानांत ठेवून लिहिलेला इतिहास होय. जें जें लिहिलें जातें तें तें वाङ्मय अथवा साहित्य नव्हे. वाङ्मय अथवा साहित्य या पदवीला पात्र होण्यासाठी व्यक्तिनिर्मित लेखनांत कांही विशेष गुण असावे लागतात. या गुणांना 'प्रातिभ' अथवा कलात्मक गुण अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. या दृष्टीने पाहूं जातां, वाङ्मयाचा इतिहास म्हणजे कलात्मक गुणांच्या विकासाचा इतिहास ठरतो. या विकासाला कांही विशिष्ट व सार्थ टप्पे असतात, असें चिकित्सकांना दिसून आलें आहे. अशा एकेका टप्प्याचा उद्‌गम-विकास-ऱ्हासाचा जो काल तोच वाङ्मयेतिहासाचा एकेक असा स्वाभाविक कालखंड ठरूं शकतो.

या विवेचनावरून मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडण्यासाठी कोणतें सूत्र हातीं घेणें आवश्यक आहे, हें दिसून येईल. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, धर्मकारण, इत्यादि कारणांचा इतिहास लिहितांना त्या त्या कारणाच्या विकासाशीं अविच्छिन्नपणें निगडित असलेल्या सूत्रानुसारच त्या त्या कारणाच्या इतिहासाचे कालखंड पाडावे लागतील. वाङ्मयेतिहास लिहितांना, राजकीय, आर्थिक, सामाजिक वा धार्मिक इतिहासांना अभिप्रेत असलेल्या कालखंडांचें अनुकरण करणें, हें अर्थशून्य ठरेल, असें मला वाटतें. याचा अर्थ असा नव्हे की व्यक्तिनिष्ठ अशा कलाभिव्यक्तीवर राजकारण, अर्थकारण, समाजकारण, वा धर्मकारण यांचा कांहीच प्रभाव पडत नाही. मनुष्य समाजांत जन्मास येतो व समाजांतच लहानाचा मोठा होतो; आणि लहानाचा मोठा होत असतांना सामाजिक संस्कारांच्या अवगुंठनांतच त्याचें व्यक्तित्व आकारास येत असतें. पण हें जरी खरें असलें तरी व्यक्तित्वविकासनिष्ठ अशी जी कलात्मक वाङ्मयनिर्मिति तिचें क्षेत्र निराळें व वैशिष्ट्यपूर्ण असें आहे, याविषयी आता जाणकारांत तरी फारसा मतभेद राहिलेला नाही असें मला वाटतें. आणि म्हणून वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मयाच्या विकासप्रक्रियेशीं सजीवपणें संलग्न असलेल्या सूत्रानुसारच हे कालखंड पाडणें अपरिहार्य आहे.

वाङ्मयाचा विकास म्हणजे कलात्मक अभिव्यक्तीला चालना देणाऱ्या प्रेरणांचा, प्रवृत्तींचा व प्रकारांचा विकास होय. या विकासाचें क्रमशः साकल्यात्मक दिग्दर्शन म्हणजेच वाङ्मयेतिहास होय. या वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मयाच्या प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासक्रमाचें सूत्र वाङ्मयेतिहासकारांना कदापिहि विसरतां येणार नाही. कारण वाङ्मयेतिहासाला अभिप्रेत असलेला कालक्रम म्हणजे वाङ्मयाचा विकासक्रमच होय. या दृष्टीने विचार करतां मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे पडतात, या प्रश्नाचा आता विचार करूं.

वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना आणखी एका गोष्टीचा विचार करणें आवश्यक आहे. काल म्हणजे काय, याचा जेव्हा मनुष्य विचार करूं लागतो तेव्हा त्याला काल हा भूत,

वर्तमान व भविष्य अशा त्रिविध स्वरूपाचा भासतो. कलावंत हाहि मनुष्यच असल्यामुळे त्यालाहि काल हा असा त्रिविध रूपात्मकच भासतो. त्याची कलानिर्मितिदेखील यात्र काल-कल्पनेवर आधारलेली असते. चक्रधर अथवा ज्ञानदेव यांनी जेव्हा आपलें वाङ्मय निर्माण केलें तेव्हा त्यांच्यासमोर त्यांच्या पूर्वी होऊन गेलेला भूतकाल होता, ते ज्या कालांत वावरत होते तो वर्तमानकाल होता आणि त्यांच्या प्रतिभेला भासणारा आगामी म्हणजे भविष्यकालहि होता. वाङ्मयाचा इतिहास लिहूं इच्छिणाऱ्यांच्या समोरदेखील हा त्रिविध काल उभा असतोच. मराठी वाङ्मयाचा आज इतिहास लिहावयाचा म्हणजे गेल्या सुमारें हजार वर्षांतील मराठी वाङ्मय जसें नजरेसमोर उभें करावें लागेल तसेंच वर्तमानकालीन वाङ्मयहि नजरेसमोर आणावें लागेल; आणि भूतकालीन व वर्तमानकालीन वाङ्मयाच्या विकासक्रमाचे धागेदोरे जसे शोधावे लागतील तसेच या वाङ्मयाच्या भविष्यकालीन विकासाच्या दिशांचाहि वेध घ्यावा लागेल.

सारांश, वाङ्मयेतिहास म्हणजे केवळ भूतकालीन वाङ्मयाचा इतिहास नव्हे. मनुष्य ज्या दृष्टीने कालाकडे पाहतो त्या त्रिकालात्मक दृष्टीनेच वाङ्मयेतिहासकारालाहि वाङ्मयाकडे पाहावें लागेल व वाङ्मयेतिहास लिहावा लागेल. वाङ्मयेतिहासाला अभिप्रेत असलेलें कालसंधान हें असें त्रिकालात्मक कालसंधान आहे, ही गोष्ट वाङ्मयेतिहासकाराला नजरेआड करतां येणार नाही. किंबहुना, हें त्रिकालात्मक कालसंधान दुर्लक्षून वाङ्मयेतिहास जे लिहूं पाहतील त्यांना वाङ्मयाच्या सजीव विकासक्रमाचा बोध होणेंच शक्य होणार नाही. आणि त्यांचा वाङ्मयेतिहास हा सजीव कालानुसंधानी न होतां तो यांत्रिक कालानुसंधानी होईल; म्हणजेच निर्जीव व अर्थशून्य होईल.

वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मय म्हणजे राजकारण नव्हे, अर्थकारण नव्हे, धर्मकारण नव्हे व समाजकारणहि नव्हे, ही गोष्ट सर्वप्रथम ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे. वाङ्मयकारण हें स्वतंत्र कारण आहे, ही गोष्ट स्पष्टपणें नजरेसमोर ठेवली पाहिजे. ज्यांना वाङ्मय म्हणजे राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण यांच्या केवळ प्रतिध्वनी-सारखें वाटतें, त्यांना वाङ्मय म्हणजे काय हेंच कळलेलें नसल्यामुळे वाङ्मयेतिहास लिहिण्यास ते सर्वथैव अपात्रच समजले पाहिजेत.

वाङ्मय हा मानवी प्रतिभेचा एक स्वतंत्र विलास आहे, याचें स्पष्ट दर्शन ज्यांना झालें आहे त्यांनाच वाङ्मयेतिहास लिहिण्याचा अधिकार प्राप्त होऊं शकेल. इतरांनी, मग ते इतर बाबतींत कितीहि अधिकारी पुरुष असले, तरी त्यांनी वाङ्मयेतिहासाच्या वाटेला जाऊं नये हेंच बरें.

मानवी प्रतिभेचा एक स्वतंत्र विलास, या दृष्टीने वाङ्मयाच्या स्वरूपाचें यथार्थ दर्शन ज्यांना झालेलें आहे, त्यांना वाङ्मयेतिहास म्हणजे वाङ्मयनिर्मितीला कारणीभूत होणाऱ्या प्रेरणा व प्रवृत्ति आणि तज्जन्य प्रकार यांचाच इतिहास होय, याचें सहज आकलन होईल. आणि हें आकलन होतांच वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना कोणतें सूत्र हातीं घ्यावें हेंहि त्यांच्या सहज ध्यानांत येईल. हें सूत्र म्हणजे वाङ्मयाच्या प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासाचें सूत्र होय.

गेल्या सुमारें हजार वर्षांत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयाचें साकल्याने विहंगमाव-लोकन करतां असें दिसून येतें की, मराठी वाङ्मयाचा आरंभ धर्मभावनेने प्रेरित झालेला असून या वाङ्मयाची परिणति आता मानवी व्यक्तित्वाचीं विविध व गूढ रूपें आविष्कृत करण्यांत वळून आली आहे. निर्बंधमय धर्मावगुंठित अशा समूहभावनेकडून अधिकाधिक स्वतंत्र

व विकसित व्यक्तित्वाकडे-असें मराठी वाङ्मयाच्या विकासाचें सूत्र चिकित्सक व रसिक दृष्टीला स्पष्टपणें दिसून येतें. आणि कालाकडे पाहण्याचें जें त्रिकालात्मक अनुसंधान आहे तदनुसार या विकासक्रमाची भविष्यकालीन दिशा म्हणजे अधिकाधिक स्वतंत्र व विकसित व्यक्तित्वाचे अधिकाधिक सूक्ष्म, तरल व अर्थपूर्ण आविष्कार, हीच संभवूं शकते.

मराठी वाङ्मयेतिहासाचें म्हणजे वाङ्मयीन प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासाचें हें सूत्र हातीं घेतल्यास या वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे पाडावेत याचा एक यथार्थ व निश्चित निकष आपल्यास उपलब्ध होतो. मराठी वाङ्मयाचा आजतागायतचा इतिहास हा सुमारें एक हजार वर्षांचा इतिहास आहे. या एक हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीचे यांत्रिक, निर्जीव व अर्थशून्य खंड अनेक प्रकारें पाडतां येतील. दहा खंडांत हा इतिहास संकलित करण्याचें ठरल्यास शंभर, शंभर वर्षांचा एक एक कालखंड असे गणिती हिशेबाने दहा काल-खंड सहज पाडतां येतील. पण हे केवळ कालखंड होतील. ते मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड होणार नाहीत. या इतिहासाचे अर्थपूर्ण कालखंड पाडावयाचे झाल्यास ते वाङ्मयविकासाचें सूत्र हातीं घेऊनच पाडले पाहिजेत. आणि हा हजार वर्षांचा इतिहास, एका टोकाला निर्बंधमय धर्मावगुंठित समूहभावना व दुसऱ्या टोकाला अधिकाधिक स्वतंत्र व विकसित व्यक्तित्वाचा आविष्कार, अशा दोन टोकांत सामावलेला असल्यामुळे निर्बंधमय व धर्मावगुंठित अशा समूह-भावनेच्या प्रभावाचा काल अथवा प्राचीन काल, हा पहिला कालखंड; या समूहभावनेच्या ऱ्हासाचा व कांही नव्या वाङ्मयीन प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या उदयाचा काल, हा दुसरा कालखंड; आणि सुस्पष्ट अशा स्वतंत्र व अधिकाधिक विकसित व्यक्तित्वाच्या आविष्काराचा आधुनिक काल, हा तिसरा कालखंड, अशा तीन स्थूल कालखंडांत मराठी वाङ्मयाचा इतिहास अर्थपूर्ण रीतीने विभागतां येईल. या तीन स्थूल कालखंडांच्या अधिक तपशीलवार विवेचनासाठी उपखंडहि पाडावे लागतील, हें उघड आहे.

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ? श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

प्रस्तुत विषय फार गंभीर आहे. क्लिष्ट म्हटलें तरी सुद्धा चालेल. कारण तो विषय सर्व-थैव शास्त्रीय आहे. विषयाचें नांव ' मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ' हें आहे; व या प्रश्नाचें उत्तर मला व्यक्ति, प्रवृत्ति आणि वाङ्मयप्रकार यांचें इतिहासांतील सापेक्ष महत्त्व विशद करून द्यावयाचें आहे. हा विषय खरोखरीच अतिशय गुंतागुंतीचा आणि बिकट आहे. त्यांत मतभेदहि अगदी तीव्र व्हावेत असे अनेक विवाद्य मुद्दे निघण्यासारखे आहेत. म्हणून, माझी अशी विनंती आहे की मी जें ह्या विषयाचें ओझरतें विवेचन करणार आहे, तें आपण गोड करून घ्यावें.

प्रथम मला वाङ्मय आणि त्याचा इतिहास यांच्या संबंधीची माझी स्वतःची कल्पना स्पष्ट करणें अवश्य वाटतें. वाङ्मय म्हणजे खरोखरी अशेष शब्दजात; म्हणजे असें की, मनुष्य जें जें बोलतो किंवा लिहितो तें तें सर्व वाङ्मय. मला वाटतें " पुरुषस्य वाग्रसः " असें जें विधान उपनिषदांत केलेलें आहे, तें अनेक दृष्टींनी अत्यंत मार्मिक आहे. वाणी हा पुरुषांचा रस आहे. या विधानाचा अर्थ काय असावा ? सृष्टींतील सर्व जीवांपेक्षा मनुष्याची श्रेष्ठता दर्शविणारें अनन्य असें जर कोणतें एकमेव लक्षण असेल, तर तें वाणी हेंच होय. सृष्टींतील इतर जीव कमीअधिक प्रमाणांत बुद्धिमान किंवा शक्तिशाली असतील, पण त्यांच्या ठिकाणीं वाणी

नसल्यामुळे ते आपल्या कर्तृत्वाचा ठसा कालावर उमटवूं शकले नाहीत, व जीवनाचें अखंड सातत्य युगायुगांतून दर्शविणारी संस्कृति निर्माण करूं शकले नाहीत. उलट, मनुष्याच्या ठिकाणीं वाणीचें सामर्थ्य असल्यामुळे भूत, वर्तमान आणि भविष्य या काळाच्या तिन्ही रूपांना आकळणारें असें आपलें सांस्कृतिक जीवन तो उत्पन्न करूं शकला.

अर्थात् वाङ्मय म्हणजे मानवी मनाचा आरसा, मानवी मनोविकासाचें मूर्तिमंत प्रतिबिंब होय. मनुष्य जें जें बोलतो आणि लिहितो तें तें सर्व वाङ्मय होय, ही गोष्ट जर लक्ष्यांत घेतली, तर त्यांतून सहजच असें प्रमेय निघतें की, मनुष्याच्या मुखांतून म्हणा वा लेखणींतून म्हणा जो जो म्हणून टिकण्यासारखा प्रभावी उद्गार निघाला, तो तो वाङ्मयांत चिरंतन होऊन राहिला. आणि हा उद्गार म्हणजे त्याच्या त्या त्या वेळच्या मानसिक किंवा बौद्धिक प्रक्रियेचा आविष्कार होय. आपण ज्यांना लोकगीतें किंवा लोककथा म्हणतों तें पिढ्यान् पिढ्या लोकांच्या तोंडीं खेळत आलेलें वाङ्मय घ्या किंवा आधुनिक तंत्रपद्धतीने लिहिलेलें एखादें नाटक किंवा कादंबरी घ्या, या दोहोंतहि आपल्याला मानवी मनाच्या प्रक्रियेचा आणि विकासाचा कांही ना कांही चिरंतन अवशेष दृष्टीस पडेल.

अर्थात् वाङ्मय म्हणजे मानवी मनाच्या आंदोलनाचा आलेख; मानवी बुद्धीच्या विकासाचें प्रतिबिंब. म्हणून, वाङ्मयाचा इतिहास लिहितांना जे कालखंड पाडावयाचे ते त्यांतील प्रवृत्तींचें परिवर्तन लक्ष्यांत घेऊनच पाडावे लागतील. तें परिवर्तन पुरोगामी असेल किंवा प्रतिगामीहि असेल; त्यांत प्रगतीचा अखंड ओघ दिसेलच असेंहि नाही. तरीसुद्धा तीं परिवर्तनें हीं अखेर विकासालाच कारण होतात, हें ध्यानांत घेऊन त्या दृष्टीने वाङ्मयाच्या इतिहासाचे खंड कल्पावे लागतील, असें मला वाटतें.

आणखीहि एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत घ्यावयाला हवी. ती ही की, वाङ्मयाचा इतिहास लिहितांना व्यक्ति आणि समाज यांची परस्पर-सापेक्षता सतत डोळ्यांपुढे ठेवली पाहिजे. कारण वाङ्मयाचा निर्माता हा एकाच वेळीं अंतर्मुख आणि लोकाभिमुखहि असतो. आपल्या वैयक्तिक भावनांचें आणि अनुभूतींचें साधारणीकरण आणि समाजीकरण करण्यांत त्याची सर्व कला सामावलेली असते; व म्हणून वाङ्मयांत व्यक्तिइतकेंच महत्व समाजाच्याहि प्रवृत्तींना द्यावें लागतें. किंबहुना, वाङ्मय हें जितकें व्यक्तिनिष्ठ तितकेंच समाजनिष्ठहि, हें जर ध्यानांत घेतलें नाही, तर वाङ्मयाच्या इतिहासांत व्यक्तींच्या वैशिष्ट्याचें स्तोम माजविलें जाईल; व त्या वैशिष्ट्याला कारण होणाऱ्या आणि वळण लावणाऱ्या सामाजिक प्रवृत्तींना गौण स्थान मिळेल.

आपण पुष्कळदा असें पाहतों की, वाङ्मयाच्या इतिहासांतील कालखंड हे राजांच्या नांवाने पाडलेले असतात. इंग्रजी वाङ्मयांतील कालखंड हे तर एलिझाबेथ आणि व्हिक्टोरिया यांच्यासारख्या राण्यांच्या नांवाने पाडलेले आढळतात. मला वाटतें, यासारखा दुसरा अपलाप नाही. शेक्स्पीअर आणि टेनिसन यांच्यासारखे कवि त्या राण्यांच्या कारकीर्दींत होऊन गेले एवढ्याच एका कारणामुळे खरोखरी त्या राण्यांची कारकीर्द वाङ्मयांत युगप्रवर्तक ठरली. युगनिर्माते कवि शेक्स्पीअर आणि टेनिसन, पण युग नामांकित झालें तें मात्र त्या राण्यांच्या नांवाने ! सुदैवाने भारतीय वाङ्मयांत मात्र असा कोणत्याच प्रकारचा अपलाप दृष्टीस पडत नाही. वाङ्मय स्वतः उत्पन्न करणारे आणि त्याला आश्रय देणारे असे अनेक राजे या भरतखंडांतहि होऊन गेले; आख्यायिकांनी गौरविलेल्या विक्रमादित्यापासून तों आधुनिक इतिहासांत अविस्मरणीय ठरलेल्या श्री. सयाजीराव महाराज गायकवाडांपर्यंत अनेक सम्राटांनी आणि

राजांनी भारतीय वाङ्मय आपल्या रसिक औदार्याने समृद्ध केलें; पण त्यांचीं नांवें जरी कौतुकानें उच्चारलीं जात असलीं, तरी तीं युगनिदर्शक ठरलीं नाहीत.

याचें कारण काय? कारण हें की भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी वाङ्मय हें संपूर्णतया स्व-तंत्र असें मानवी प्रतिभेचें ऐश्वर्य मानलें आहे. 'नियतिकृत-नियमरहित' आणि 'अनन्य परतंत्र' असें जें त्याचें वर्णन मम्मटानें केलेलें आहे, तें याच अर्थानें. म्हणून भारतीय साहित्यांत साहित्य निर्माण करणारी व्यक्ति आणि तिच्या प्रतिभेवर संस्कार करणाऱ्या तत्कालीन सामाजिक प्रवृत्ति या दोनच फक्त महत्वाच्या मानल्या जातात.

वाङ्मयाचा निर्माता हा एकाच वेळीं अंतर्मुख आणि लोकाभिमुखहि असतो, हें तत्व लक्ष्यांत घेतलें असतां, निर्मात्याचें व्यक्तित्व आणि समाजाच्या प्रवृत्तींची त्याच्यावर घडणारी प्रतिक्रिया या दोहोंच्या अनुषंगानें वाङ्मयाचा विचार केला पाहिजे, हें ओघालाच येतें.

आपण जुन्या मराठी वाङ्मयाचा विचार या दृष्टीनें करून पाहूं या. जुन्या मराठी वाङ्मयांतील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे युगप्रवर्तक असे अत्यंत प्रभावशाली कवि समजले जातात. यांपैकीं तुकाराम सोडल्यास बाकीच्या तिघा कवींनी तत्वज्ञानात्मक अशी गंभीर प्रबंधरचना आणि कांहीं आख्यान-रचनाहि केलेली आहे; व हीं त्यांचीं तात्विक भाष्यें आणि पौराणिक आख्यानें ह्यांच्या मनाची लोकाभिमुख वृत्ति स्पष्ट दर्शवितात. पण त्याबरोबरच या कवींनीं जी अत्यंत आत्मपर अशी त्रुटित स्फुट कविता लिहिली आहे, जे हजारों अभंग आणि जीं पदें लिहिलीं आहेत, त्यांत त्यांची विलक्षण अंतर्मुखता प्रगट झालेली दृष्टीस पडते. तुकाराम हा या अंतर्मुख कवींचा खरोखरी मुकुटमणि; पण त्याच्या अंतर्मुखतेंतहि कमालीची लोकाभिमुखता, व्यक्तिनिष्ठेंतहि कमालीची समाजनिष्ठा प्रत्ययाला येते. याचाच अर्थ असा कीं, या कवींचें व्यक्तित्व हें तत्कालीन समाजाच्या प्रवृत्तींशीं समरस झालेलें होतें. त्यांनी कविता जितकी आत्मसाधनेसाठीं लिहिली तितकीच लोकसाधनेसाठीहि लिहिली. आपण ज्ञानेश्वरांपासून तों रामदासापर्यंत सर्व मराठी वाङ्मय हें आध्यात्मिक आणि धार्मिक आहे असें समजतों. पण तें तितकेंच वैयक्तिक आणि सामाजिकहि होतें हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. व्यक्तींची प्रतिभा आणि समाजाच्या प्रवृत्ति यांच्या संमीलनांतून आणि समन्वयांतून तें निर्माण झालेलें होतें.

या वाङ्मयाला असलेली महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाची पार्श्वभूमि जर आपण लक्ष्यांत घेतली तर हें विधान अधिक स्पष्ट होईल. यादव साम्राज्याच्या अत्यंत उत्कर्षाच्या काळांत भक्तिज्ञानयुक्त वैराग्याचा महिमा प्रतिपादन करणारा ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ श्री ज्ञानेश्वरांनी लिहिला. यादव साम्राज्याच्या विनाशाची जणु ती पूर्वसूचनाच होती! त्यानंतरचे मोठे कवि श्री एकनाथ यांनी भागवत आणि रामायण ह्या दोन संस्कृत ग्रंथांवर सुबोध रसाळ मराठी आख्यानें लिहून तत्कालीन समाजाची धर्मभावना सर्व दृष्टींनी जागृत ठेविली; व अनेक सामाजिक रूपकें लिहून समाजांतील वैगुण्येंहि चव्हाट्यावर आणलीं. त्यानंतरचे दोन बव्हंशीं समकालीन कवि तुकाराम आणि रामदास. या दोघांपैकीं श्री तुकारामानें लिहिलेलें वाङ्मय एका परीनें सर्वथैव आत्मपर असें आहे—पण त्यांतहि तत्कालीन समाजाचें दैन्य दंभ वगैरे गोष्टी चित्रित केलेल्या आहेत. रामदासांचा दासबोध जरी बाजूला ठेवला तरी त्यांची सारी स्फुट कविता म्हणजे त्यांच्या स्वतःच्या आणि तत्कालीन समाजाच्याहि निरनिराळ्या मनोवृत्तींचे आविष्कार आणि आविर्भावच होत.

पण यानंतर स्वराज्याच्या दीडशे वर्षांच्या कालांत जी कविता निर्माण झाली, तिचा वेष जरी पूर्ण धार्मिकच होता, तरी वामनपंडितापासून तों अमृतरायापर्यंत या कालांतील कवींनी जें वाङ्मय लिहिलें, ते बव्हंशीं आख्यानरूप म्हणजेच समाजाचें रंजन करण्यासाठींच लिहिलेलें होतें. आज आपल्याला लघुकथा आणि कादंबऱ्या यांच्याविषयीं जी रुचि वाटते, तीच रुचि तत्कालीन समाजाला वामन, श्रीधर, महीपती, मोरोपंत इत्यादि कवींच्या लहानमोठ्या आख्यान–काव्यांविषयीं वाटत असावी, हें उघड आहे. याचाच अर्थ असा की, स्वराज्यांतील सुखावलेल्या समाजाच्या रंजनार्थ या कवींनी अध्यात्म बाजूला ठेवलें आणि आख्यानें हातीं घेतलीं. ' ग्यानबा तुकारामांच्या ' संस्कारांत मुरलेली त्यांची प्रतिभा ही धर्मप्रवण होती यांत शंकाच नाही. पण ती तिची धर्मप्रवणता आध्यात्मिक भाष्यांच्या किंवा आत्मपर कवितांच्या रूपापेक्षांहि विविध आख्यानांच्या रूपानें प्रकर्षानें प्रगट झाली याचाच अर्थ असा कीं, कविमन हें समाजमनाचें सहप्रवासी झालें; समाजमनाचें प्रतिबिंब आणि प्रातिनिधिक झालें. लावण्या आणि पोवाडे हें लोकवाङ्मय याच काळांत उत्पन्न झालें. हें लोकवाङ्मय एका टोकाला राजदरबार आणि दुसऱ्या टोकाला गावचव्हाठा यांचें रंजन करीत होतें, तर आख्यानकार कवि हा राजदरबार आणि गावचव्हाठा यांच्या मध्यावर मध्यमवर्गाच्या माजघरांत उभा होता. शाहिरानें आपल्या डफतुणतुण्यावरील कवनानें राजेमहाराजे आणि जमावखुंड यांना डोलविलें; तर कवीनें आपल्या टाळ-मृदंगावरील आख्यानांनीं माजघरांत आणि मंदिरांत बसलेल्या सभाजनांना रिझविलें. कवीचें व्यक्तित्व आणि समाजाच्या प्रवृत्ति यांचा असा समरस मेळ पडलेला आपल्याला जुन्या मराठी वाङ्मयांत सर्वत्र दिसतो.

याहिपेक्षा समाजाच्या प्रवृत्तीची छाप कवीच्या व्यक्तित्वावर किती जबरदस्त पडते याचें एक अगदी अनन्य असें उदाहरण मराठी वाङ्मयांत आपल्याला पहावयाला मिळतें. राम-कृष्ण हे अखिल भारतानें वंदनीय मानलेले अवतारी पुरुष. ह्यामुळे रामलीला आणि कृष्णलीला हे अखिल भारतांतील कवींचे आणि बहुजनसमाजाचे आवडते कीर्तन-भजनाचे विषय. पण महाराष्ट्रांत केवळ रामलीला आणि कृष्णलीला गाऊनच कवि संतुष्ट झाले नाहीत आणि लोकहि तृप्त झाले नाहीत, तर त्या लीलांच्या वर्णनाबरोबरच श्री ज्ञानेश्वरांपासून तों मोरोपंतापर्यंत सर्व प्रमुख मराठी कवींनी भगवद्गीतेवर भाष्यें लिहिण्यांत आपल्या वाणीचें परम सार्थक मानलें. भगवद्गीतेवर जितकीं छंदोमय भाष्यें मराठी भाषेंत आहेत तितकीं तीं बहुधा दुसऱ्या कोणत्याहि भारतीय लोकभाषेंत आढळणार नाहीत. याचें कारण काय ? याचें कारण माझ्या समजुतीनें महाराष्ट्राची जीवनाकडे पाहण्याची बुद्धिप्रधान चिकित्सक दृष्टी. या त्याच्या चिकित्सक दृष्टीनें स्वराज्यांतील अत्यंत वैभवाच्या काळांतहि त्याचें अध्यात्मचिंतन थांबलें नाही. कविमन आणि समाजमन, व्यक्ति आणि समाजप्रवृत्ति, यांचा अनुबंध येथे आपल्याला स्पष्ट पहावयाला मिळतो.

पाश्चात्य वाङ्मयाचे दोन अग्रगण्य इतिहासकार टेन आणि ब्रँडीस यांनी कविमन हें समाजमनाचें सहप्रवासी असतें व दोन्ही मनें परस्परांवर परिणाम करीत जनतेची वैचारिक प्रगति घडवून आणतात हें प्रमेय पायाभूत धरून पाश्चात्य वाङ्मयाचा इतिहास लिहिला आहे. वाङ्मयांतील निरनिराळे प्रवाह आणि प्रकार हे त्यांनी तत्कालीन समाज–जीवनाचे प्रसव आणि प्रतिनिधी मानलेले आहेत. पण वाङ्मयाचा निर्माता हा जसा भूतकालाचा वारस आणि वर्तमान-कालाचा प्रतिनिधी असतो तसाच तो केव्हा केव्हा भविष्यकालाचा द्रष्टाहि असतो. किंबहुना भूत, वर्तमान आणि भविष्य या कालाच्या तिन्ही अवस्थांचा अनुबंध जो पहातो आणि त्यांचें

दर्शन आपल्या वाङ्मयांत जो घडवितो, तोच खरा महाकवि. त्याचें मन हें समाजमनाशीं समरस झालेलें तर असतेंच, पण त्या मनाला न कळणाऱ्या आणि न आकळणाऱ्या भावी घटनांचीं स्वप्नेंहि तें पाहूं शकतें. अशा लेखकालाच आपल्या साहित्यशास्त्रज्ञांनी क्रांतदर्शी म्हटलें आहे.

सारांश, वाङ्मयाच्या इतिहासांत व्यक्ति आणि प्रवृत्ति यांचें महत्त्व हें माझ्या मताने सारखेंच आहे. त्यांच्या समन्वयानेच त्या त्या काळांतील वाङ्मयप्रकार हे उत्पन्न होत असतात.

२ अखिल भारतीय पार्श्वभूमि आणि भारतीय भाषांशीं संबंध श्री. ना. बनहट्टी

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने मराठी वाङ्मयाचा इतिहास मोठ्या प्रमाणावर लिहून प्रसिद्ध करण्याची योजना जाहीर केल्यापासून गेल्या वर्षादोनवर्षांत या विषयासंबंधाने पुष्कळ चर्चा आणि वाद झाला आहे. साहित्याच्या क्षेत्रांत विचार करणारी जेवढी मंडळी आहेत त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी या वादांत भाग घेऊन उलटसुलट विचार प्रदर्शित केले आहेत. वादाचा धुरोळा एकदा उठला म्हणजे कित्येक महत्त्वाच्या गोष्टीसुद्धा दिसेनाशा होतात. या इतिहासाचे खंड किती असावेत आणि ते कुठे कुठे पाडण्यांत यावेत या प्रश्नावरच वादाचें रण माजलें. इतर कित्येक महत्त्वाचे मुद्दे या संबंधांत उपस्थित होतात त्यांच्याकडे जावें तसें लक्ष्य गेलेलें दिसत नाही.

इतिहास म्हणजे सनावळी नव्हे किंवा घटनांची जंत्री देखील नव्हे. कल्हणाने आपल्या राजतरंगिणींत म्हटलें आहे त्याप्रमाणे 'इतिहास' ही कविप्रजापतीची एक रम्य कलाकृति असायला पाहिजे; इतिहासांत मागे होऊन गेलेल्या काळाचें जणू काय जिवंत व सचेतन असें दर्शन आपणांस घडलें पाहिजे. मनुष्याच्या आणि समाजाच्या हालचाली व घडामोडी, त्यांच्या वृत्ती आणि प्रवृत्ती, त्यांचा परस्पर सहकार आणि संघर्ष यांचें वेधक चित्र इतिहासाने आपल्या डोळ्यासमोर उभें केलें पाहिजे.

मनुष्य हा एकटा एकलकोंडा प्राणी नाही. तो समाज करून राहणारा आहे. एकाच्या वागण्याचा इतर अनेकांवर परिणाम होत असतो आणि अनेकांच्या वृत्तिप्रवृत्तींचा एका व्यक्तीवर उलट परिणाम होत असतो. ही क्रियाप्रतिक्रिया एकसारखी चालू असते. एका व्यक्तीच्या जीवनावर भोवतालच्या अनेक व्यक्तींचा आणि समाजाचा जो परिणाम होत असतो त्यानेच त्या व्यक्तीचें चरित्र बनत असतें. हें जसें व्यक्तीला लागू आहे तसेंच तें समाजालाहि लागू आहे कोणताहि समाज एकटा एकाकी कधीहि असत नाही. एका समाजांतील प्रवृत्ति, घडामोडी आणि खळबळी यांचा परिणाम भोवतालच्या इतर समाजांच्यावर झाल्याखेरीज कधीहि राहात नाही. या परिणामांचें स्वरूप वर्णन करणें, त्यांचे धागेदोरे तपासणें आणि त्यांची कारणमीमांसा करणें हें इतिहासकाराचें काम आहे. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रांत ज्या चळवळी—खळबळी झाल्या त्यांपैकी कित्येकांचे धागेदोरे बंगालशीं निगडित झालेले आढळतील. कर्नाटकांतील घटनांचा व प्रवृत्तींचा निकट संबंध महाराष्ट्रांतील घटनांशीं जुळत असलेला आढळेल. महाराष्ट्राच्या इतिहासकाराचें हें काम आहे की, त्याने केवळ मराठी जनतेच्या हालचालींची माहिती देऊनच न थांबतां त्या हालचाली अथवा खळबळी कोणत्या प्रेरणांनी उद्भवल्या होत्या, त्या प्रेरणांच्यामध्ये हिंदुस्थानांतील इतर प्रांतांचा कितपत भाग होता याचें साधार विवरण करायला हवें. असें होईल तरच त्या इतिहासाला जिवंतपणा व भरदारपणा येईल.

प्रत्येक व्यक्तीचा ज्याप्रमाणे इतर व्यक्तींशीं संबंध असतो त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ति एका मोठ्या समुदायाचा अंश असते हें लक्ष्यांत ठेवणेंदेखील महत्त्वाचें आहे. कुटुंबांतील एकेक व्यक्ति इतर व्यक्तींशीं कांही नात्याने जोडलेली असते. तसेंच प्रत्येक व्यक्ति हा कुटुंबाचा एक अंश म्हणून देखील वागत असते. त्या कुटुंबाची जात, सांपत्तिक स्थिति, सामाजिक दर्जा वगैरेंचा परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. 'जें पिंडीं तें ब्रह्मांडीं!' एका व्यक्तीला जें लागू तें समाजालाहि तसेंच लागू पडतें. आपण हिंदुस्थानांतील सर्व समाज एकमेकांचे भाऊ-भाऊ आहोंत, तसेंच त्याबरोबर त्या विशाल भारत देशाचे घटक आहोंत, अंश आहोंत. महाराष्ट्राचा इतिहास एकंदर हिंदुस्थानच्या इतिहासांतून तोडून अलग काढून वर्णिल्यास तो खरा इतिहासच होणार नाही. एकंदर हिंदुस्थानांत मुसलमानांची सत्ता कशी पसरली, त्यांनी राजकीय व धार्मिक आक्रमण केव्हा केव्हा कुठे कुठे केलें, या सर्व गोष्टींची नीट कल्पना करून दिल्याशिवाय मराठ्यांचें स्वराज्य कोणत्या परिस्थितींत कसें निर्माण झालें याचा नीट खुलासा करणें कधी तरी शक्य होईल काय?

तेव्हा संपूर्णाचा अंश आणि समकक्षीयांचा साथीदार या दोन्ही नात्यांनी व्यक्तींचें व समाजाचें विवेचन केल्याशिवाय त्या व्यक्तीचा वा समाजाचा इतिहास लिहिला गेल्यास तो खराखुरा सोपपत्तिक इतिहास होणें शक्य नाही. हा सिद्धांत निर्विवाद होय.

हा सिद्धान्त सर्वसाधारण राजकीय इतिहासाला जितका लागू आहे तितकाच तो वाङ्मयाच्या इतिहासालाहि लागू पडतो. वाङ्मय ही मनुष्याच्या अनेक कृतींच्या पैकीच एक कृति आहे. इतरांच्याशीं असलेल्या संबंधांचा परिणाम मनुष्याच्या सर्वच जीवनावर, त्याच्या सर्वच कृतीवर होतो. अर्थात् तो वाङ्मय-कृतीवर देखील होणारच. महाराष्ट्रांतील व्यक्तींच्या मनावर इतर प्रांतांतील हालचाली, खळबळी, चळवळी यांचा परिणाम झालेला असणारच; मराठी लेखकांच्या मनावर इतर भाषांतील वाङ्मयाचे बरेवाईट ठळक अथवा अंधुक ठसे उमटलेले असणारच. त्यांमुळे मराठी लेखकांच्या वृत्ति, भावना आणि प्रेरणा यांच्यांत कांही तरी पालट झाला असणें अपरिहार्य आहे. तेव्हा मराठी वाङ्मयाचा इतिहास या सर्व परिणामांचा विचार करून तदनुसार वाङ्मयप्रवाहांचें आणि वाङ्मयांतील प्रवृत्तींचें स्वरूप निर्धारण करणारा असा झाला पाहिजे. अमक्या काळांत अमुक अमुक ग्रंथकार झाले, त्यांनी अमुक अमुक ग्रंथ लिहिले आणि त्या ग्रंथांत अमुक अमुक विषय होते असें कालक्रमानुसार सांगितलें की झाला वाङ्मयाचा इतिहास तयार असें मानून मुळीच चालणार नाही. किंबहुना वाङ्मयांतील प्रेरणांची आणि प्रवाहांची नुसती महाराष्ट्रांतील परिस्थितीच्या अनुरोधाने मीमांसा करूनहि भागणार नाही. यापेक्षा आपली दृष्टि अधिक व्यापक अधिक दूरदर्शी बनविली पाहिजे.

मराठी वाङ्मयाचा विचार करतांना आपण अगदीच बाहेर नजर फेकीत नाहीं असें नाही. आपण बाहेर पाहतों, पण बहुधा एकाच खिडकींतून एकाच दिशेकडे पाहतों. त्यामुळे आपलें विवेचन एकांगी होतें. इंग्रजी अंमल आपल्या देशांत सुमारें दीडशें वर्षांपूर्वी सुरू झाला. इंग्रजांचें वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास इंग्रजांच्या सामाजिक चालीरीती यांचा पगडा ते राज्यकर्ते म्हणून साहजिकच आमच्याकडील सुशिक्षितांच्या मनावर बसला. लेखकांनी वाङ्मय-निर्मितीस सुरुवात केली ती इंग्रजी वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास व समाजस्थिति

यांपासून प्रेरणा घेऊनच केली. निबंध, कादंबरी, नाटक, कविता इत्यादि वाङ्मयाचे अभिनव प्रकार सुरू झाले ते इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यावरूनच सुरू झाले. साहजिकच वाङ्मयाचें ऐतिहासिक दृष्टीने समालोचन करण्याचा जेव्हा जेव्हा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा मराठी लेखकांनी इंग्रजींतून घेतलेल्या प्रेरणा व संस्कार यांचा शोध घेतला जातो आणि इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यांच्या तुलनेने मराठी वाङ्मयाचें मूल्यमापन केलें जातें.

पण हें सर्व स्वाभाविक असलें तरी सर्वांशीं योग्य आहे असें मात्र नाही. झापड घातल्याप्रमाणे आपण केवळ एकाच दिशेकडे म्हणजे पश्चिमेकडे पाहात आलों. त्यामुळे संकुचित पणा व एकांगीपणा यांचे मात्र आपण धनी झालों. इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी इतिहास यांचे आपणावर झालेले परिणाम फार खोल व बलवत्तर होते हें खरें; पण सगळें कांही तेवढेंच असें मानून चालणें चुकीचें होतें. हजारों कोसांतील राज्यकर्त्यांची उपासना करण्याच्या भरांत आपण शेजारच्या भाईबंदांना विसरलों. आपल्या भारतांतील परिस्थितीच्या बैठकीवरून सर्व घटनांचें अवलोकन केलें म्हणजे त्या कांही निराळ्याच प्रकाशाने चमकूं लागतात, हें आपल्या ध्यानांत आलें नाही. अद्यापिहि आपलें जितकें जावयास पाहिजे तितकें लक्ष गेलेलें दिसत नाही.

आधुनिक मराठी गद्याचे निर्माते विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कामगिरीचें मूल्यमापन करतांना ॲडिसन, जॉन्सन, मेकॉले, या इंग्रज लेखकांचे त्यांच्यावर जे संस्कार झाले त्यांचें परीक्षण आपण करतों. हें तर करायला पाहिजेच. त्याच्या योगाने चिपळूणकरांच्या वाङ्मयकार्याचें यथार्थ ज्ञान आपणांस होईल. पण त्याच काळांत भारतांतील इतर भाषांमध्ये कोणकोण लेखक पुढे आले होते, त्यांच्या द्वारा कसकशी वाङ्मयनिर्मिति होऊं लागलेली होती याचें जर आपण तुलनेसाठी अवलोकन केलें तर महाराष्ट्रांतील त्यावेळच्या वाङ्मयीन हालचालींवर कांही एक निराळाच प्रकाश पडेल. उदाहरणच द्यायचें झालें तर हिंदी भाषेकडे आपणांस वळतां येईल. लल्लूलाल आणि सादल मित्र यांनी आधुनिक हिंदी वाङ्मयाचा पाया घातला ती परिस्थिति आणि त्यानंतर साधारणपणें चिपळूणकरांच्याच काळांत भारतेंदु हरिश्चंद्र यांनी आपल्या निबंधांनीं हिंदी गद्याची परंपरा सुरू केली तो प्रकार आपण जर तुलनेसाठी न्याहाळला तर चिपळूणकरांच्या वाङ्मयीन कार्यावर फार मोठा प्रकाश पडेल यांत कांही शंका नाही.

आपले महामान्य कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांची प्रेरणा व स्फूर्ति जेव्हा आपण तपासून पाहतों तेव्हा थॅकरे, डिकन्स, स्कॉट, झोला इत्यादि पाश्चात्य कादंबरीकारांच्या त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाची आपणांस जाणीव होते; कोणाकोणाचे संस्कार हरिभाऊंनी कसकसे घेतले त्याची छाननी आपण करतों. हें करूं नये असें माझें म्हणणें नाही. पण या छाननीचें जें महत्व आहे त्याला तिळमात्र उणेपणा न आणतांहि मी असें म्हणेन की त्या वेळच्या भारतीय भाषांतील वाङ्मयाची दखल घेणें या बाबतींत उपयुक्त ठरल्याखेरीज राहणार नाही. बंगाली कादंबरीचे जनक बंकिमचंद्र चतर्जी यांचा लेखन—संसार हरिभाऊंनी लेखनाला प्रारंभ करण्याच्यापूर्वी बहुतेक आटपला होता. त्यांनी हरिभाऊंप्रमाणेच सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या लिखाणाचा हरिभाऊंच्या लिखाणावर कसा आणि कितपत परिणाम झाला असावा याचें संशोधन करावयास नको काय? हरिभाऊ आपट्यांच्या स्फूर्तीचा उगम हजारों कोस दूर होऊन गेलेल्या वॉल्टर स्कॉटमध्ये शोधण्यापेक्षा तो बंकिमचंद्राच्या भावनापूर्ण देशभक्तिप्रधान कादंबऱ्यांमध्ये शोधल्यास फार महत्वाचे धागेदोरे

आपल्या हातीं लागण्याचा संभव आहे. बंकिमचंद्राच्या दुर्गेशनंदिनी नामक कादंबरीचा प्रारंभ आणि हरिभाऊंच्या उषःकाल कादंबरीचा प्रारंभ यांत कसें विलक्षण साम्य आहे हें मी स्वतःच पूर्वी एकदा दाखवून दिलें होतें.

भारतांतील निरनिराळ्या भाषा आणि आपली मराठी यांच्यामध्ये ही जी अशी देवाणघेवाण चालली आहे तिचें संशोधन करून संस्कार, प्रेरणा आणि अनुकरण यांचे उगम कोठेकोठे कसकसे दिसतात याचा नीट छडा लागल्याखेरीज मराठी वाङ्मयाचा अभ्यास पूर्ण झाला असें कदापि म्हणतां येणार नाही. हा अभ्यास अशा रीतीने करून अखिल भारताच्या वाङ्मयीन परिस्थितींचें सारग्राही अवलोकन केलें म्हणजेच मराठी वाङ्मयांतील प्रकारांचा, प्रवाहांचा व घटनांचा अन्वयार्थ नीट रीतीने लावण्याची भूमिका सिद्ध होईल. मराठी वाङ्मयाचा इतिहासकार होण्याची महत्वाकांक्षा जो बाळगीत असेल त्याने आपली ही सर्व पूर्वतयारी झालेली आहे की नाही याची मनांतल्यामनांत तरी तपासणी करून पहावी. इ. स. १८९० ते १९१० पर्यंत मराठींत जें देशभक्तिप्रचुर भावनाप्रधान वाङ्मय निर्माण झालें त्याचें मूल्यमापन त्याच काळांतील बंगाली वाङ्मयांचें तपशीलवार अवलोकन केल्याखेरीज करतां येणें शक्य नाही. कारण बंगाल्यांतहि त्या काळांत तसलेंच भावनांनी सळसळणारें लिखाण बाहेर पडत होतें. नंतर रवींद्रनाथांच्या गीतांजलीने गूढवादाचा गंभीर ध्वनी जो उमटविला त्याचे पडसाद महाराष्ट्रांत घनदाट रीतीने उमटल्याखेरीज राहिले नाहीत. मराठी वाङ्मयांतल्या या गूढवादाच्या लाटेचें समालोचन तत्कालीन वंगीय वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज परिपूर्ण होऊं शकेल, असें म्हणण्याचें धाष्टर्य कोण करील !

आणि हें केवळ आधुनिक वाङ्मयासंबंधानेच खरें आहे असें समजण्याचें कारण नाही. जुनें भक्तिप्रधान संतवाङ्मय पाहिलें तरी भाषेभाषेमधील जिव्हाळ्याचे धागेदोरे ठायींठायीं दिसून आल्याखेरीज राहात नाहीत. श्रीतुकारामांच्या गुरुपरंपरेचा धागा बंगाल्यांतील श्रीकृष्ण चैतन्यापर्यंत जाऊन पोंचत असावा असें वाटण्यास आधार आहेत. महाराष्ट्रांतील नामदेव, गुजरातेंतील नरसी मेहता इत्यादि अनेक संतांच्या कवनांचा प्रसार त्या त्या भाषेचीं कुंपणें ओलांडून फार दूरवर झाला होता, हें सत्य आहे. किंबहुना त्या काळांत सर्व भारतभर भागवत धर्माचें एकच पाणी खेळत होतें. या अखिल भारतभर वाहत असलेल्या पावन जीवनप्रवाहाची परिपूर्ण जाणीव करून घेतल्याशिवाय मराठीसारख्या कोणत्याहि एका भाषेचा इतिहास लिहिण्याची भूमिका कशी सिद्ध होऊं शकेल !

तेव्हा भारतांतील भिन्नभिन्न भाषांचें वाङ्मय आणि एकंदर भारतांतील वाङ्मयीन वातावरण यांचा चांगला व्यासंग करून आणि परस्पर संस्कारांचे धागेदोरे समजून घेऊन मगच मराठी वाङ्मयाचा सांगोपांग आणि सोपपत्तिक इतिहास लिहिण्याचें कार्य हातीं घ्यावें, तरच तें समाधानकारक होईल, हा सिद्धान्त अगदी पक्का. महाराष्ट्र साहित्य परिषदेने इतिहासलेखनाचा जो महान् प्रयत्न करण्याचें योजिलें आहे तो करतांना या संबंधांत योग्य ती खबरदारी तिजकडून घेतली जाईल अशी आपण आशा करूं या. *

---

* नागपूर नभोवाणीच्या सौजन्यानें.

मुकुंदराजाचा विवेकसिंधु : : मा. वि. किबे

पत्रिकेच्या, वर्ष २५, अंक १०५ (एप्रिल-मे-जून १९५३) च्या अंकांत मुकुन्द-राजासंबंधी दोन विद्वानांनी लिहिलेले लेख आले आहेत. परंतु त्या विद्वानांनी गुदस्त साली राजवाडे संशोधन मंडळ, धुळें ह्यांनी आपल्या " संशोधक " त्रैमासिकांत क्रमशः वयोवृद्ध विद्वान साहित्यसेवी, भुसावळचे श्री. गोपाळरावजी गोगटे, ह्यांनी अनेक लेखी प्रति मिळवून संशोधन करून, टीपा देऊन छापलेली विवेकसिन्धूची प्रत, जिला लोकनायक डॉ. मा. श्री. अणे ह्यांनी शोधपूर्वक पुरस्कार लिहिला आहे, तिची दखलगिरी कां घेतली नाही, हें कळत नाही. विशेष आश्चर्याची गोष्ट ही की त्या प्रतीची किंचित् उष्ण अशी, आलोचना, विद्वद्वर्य तात्यासाहेब करंदीकर ह्यांनी, थोड्या दिवसांपूर्वी केसरींत केली आहे. सदरहु प्रत विवेकसिंधूची सध्या उपलब्ध असलेल्या साधनांस धरून पूर्णपणें अधिकृत प्रत समजली पाहिजे. डॉ. अणे ह्यांनी कागदपत्र, पारंपरिक माहिती आणि रूढी ह्यांच्या आधारें मुकुन्दराजाचें स्थळ निश्चित केलें आहे. मुकुन्दराजाच्या कालासंबंधीं मात्र इतका स्पष्टपणें निर्णय झालेला दिसत नाही. ह्या संबंधांत विवेकसिंधूंतील पुढील ओवीकडे जसें लक्ष जावें, तसें गेल्याचें दिसत नाही.

" जैसे पुत्र विताळले । ते पितृधनास मुकले ॥
शुद्ध जालिया विभाग पावले । जयापरी " ॥ ८६ ॥ (पूर्वार्ध, प्र. १)

" विताळले " ह्यावर श्री. गोगटे ह्यांची पादटीप ' भ्रष्ट, म्लेंच्छ झाला. '

ह्या ओवींत परधर्मांत गेलेल्या इसमास परत हिंदुधर्मांत घेण्याच्या प्रथेचा स्पष्ट उल्लेख आहे. ही प्रथा केव्हा पडली, ह्यांचे दाखले जुन्या कागदपत्रांत सापडले तर मुकुन्दराजाचा अगदी पलीकडील काळ कोणता धरला पाहिजे, हें सिद्ध होईल. निदान अल्लाउद्दीनचा हल्ला दाक्षिणेंत इ. स. १२९४ मध्ये झाला, त्यानंतर वरील प्रथा पडण्याचें कारण उपस्थित झालें असावें, असें अनुमान करतां येईल.

परीक्षण

बिजलीः — (कवि—वसंत बापट. साधना प्रकाशन, आर्थर रोड, मुंबई ११
किंमत रु. २-८-०)

स्वातंत्र्योदयानंतर महाराष्ट्रांत जे कवि प्रसिद्धीस आले, त्यांत वसंतराव बापटांचें स्थान अेका तन्हेने वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळांत ते कवितालेखन करीत असले तरी, स्वातंत्र्योत्तर काळांतच ते कवि म्हणून रसिकांना अधिक परिचित झाले आणि त्याच वेळेपासून नव्या पिढींतील प्रभावी कवींत त्यांची गणना होऊं लागली. ह्याच अर्थाने मीं त्यांना स्वातंत्र्योदयानंतरचे कवि असें म्हटलें आहे.

त्यांच्या काव्यासंबंधी रसिकांची प्रतिक्रिया अगदी परस्परविरोधी स्वरूपाची आहे. कोणी त्यांना नव्या युगाचे गायक म्हणून गौरविलें आहे, तर कांहींनी प्रचारक, समाजवादी शाहीर म्हणून त्यांची संभावना केली आहे. स्वतः कवि आपल्या कवितेविषयी बोलतांना म्हणतो " माझी कविता फारशी लोकप्रिय झालेली नाही व ती कोणत्याहि अर्थाने युगप्रवर्तक, नवी, इत्यादि नाही; ती कविता असली म्हणजे पुरें असें मला वाटतें. " त्यांच्या बिजली या कवितेची लोकप्रियता बघितली, टाळ्या पिटीत, नाचत गाणाऱ्या लहान लहान मुलांच्या तोंडून ती ऐकिली म्हणजे वसंतरावांचे हे उद्गार विनयाचे आहेत असेंच वाटतें. या कवितेने वसंतरावांना लाभलेली लोकप्रियता कोणालाहि हेवा वाटेल अशीच आहे. असें असलें तरी आजच्या नवकवींत त्यांची गणना नाही; आणि तेहि नाविन्याच्या हव्यासापाठी आपल्या अनुभूतीचें इमान विकावयास तयार नाहीत, यांतच त्यांचें स्पृहणीय वैशिष्ट्य आहे. " आपल्या मनाला जडलेला बहुमोल छंद " असें ते आपल्या कवितेचें वर्णन करतात. आपली कविता, कविता असली म्हणजे पुरें असें त्यांना वाटतें. या ' वाटण्यांत ' त्यांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट झाली आहे. काव्यांत नाविन्य आवश्यक असलें तरी, नाविन्यांत काव्य निर्माण होतेंच असें नाही. क्षणाक्षणाला जें नवीन भासतें तें रमणीयतेचें स्वरूप असें अेका संस्कृत कवीने म्हटलें आहे. परंतु असे नवनवे भास निर्माण व्हायला मुळांतच कांही तरी रमणीय असावें लागतें. आणि हें ' रामण्यक ' मानवी भावनाविश्वाच्या आविष्कारावर अवलंबून आहे. या भावविश्वाचें ज्यांना आकलन झालें, त्यांच्या वाणींत आपोआपच नाविन्य अवतरतें. हें भावविश्व श्री. बापटांच्या कवितेंत कसें व किती अवतीर्ण झालें आहे ?

परंतु या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी प्रथम अेक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. ती गोष्ट म्हणजे कवीचा व काव्यरचनेचा काल. अशांतीचा, सर्वंकष संकटाचा काळ हा चांगला लेखनविषय होऊं शकत असला तरी प्रत्यक्ष लेखनाला तो तितकासा अनुकूल ठरत नाही असें अेका आंग्ल टीकाकाराने म्हटलें आहे, तें कांही अंशीं खरें आहे. त्या काळाचा लेखकाच्या सभोवतालच्या परिस्थितीवर, त्याच्या प्रतिभापिंडावर अेक प्रकारचा ताण पडतो. हा ताण लेखनांतहि प्रतीत होतो. विषयांची मर्यादा, कांही विशिष्ट प्रतिमा—प्रतीकांची निवड व पुनरुक्ति आणि विचारांचा आवर्त इत्यादि गोष्टी या ताणीच्या निदर्शक आहेत. कुसुमाग्रज

बारकर व बापट या कवींना काळाचे हे नफे तोटे भोगावे लागले आहेत, हें त्यांच्या रचने-वरून दिसून येईल.

१९४२ मध्ये महात्माजींनी स्वातंत्र्याचा जो संग्राम सुरू केला त्यांतून बापटांच्या प्रति-भेला प्रथमत: प्रेरणा मिळाली असावी, म्हणून त्यांना कवितेचें स्वरूप " अंगीं अग्निशिखा शिरावर तिच्या विद्युल्लतेचीं फुलें " असें ज्वालामय दिसलें; आणि तिच्या दर्शनाने ते ' अमृ-ताने पेटले.' दास्य, विषमता, स्थितिनिष्ठता यांचें भस्म करण्यासाठी त्यांनी विजलीचें ध्यान मांडलें. त्यांच्या काव्यांतल्या दाहकतेची ही जात कुसुमाग्रजांच्या प्रकाशपूजनापेक्षा निराळी नाही. बापटांच्या कवितेवर कुसुमाग्रजांची छाया आहे असें मला येथे सुचवायचें नाही. मला येवढेंच सांगायचें आहे कीं क्रांतीची या कवींनी मांडलेली कल्पना, प्रकाश, दहन, यज्ञ या ठराविक अद्‌भुतरम्य सौंदर्यवादी प्रतिमांच्या कक्षेतच फिरत राहिली आहे.

" आकाशांत निखारा फुलूं द्या
ज्वाळांत जळूं द्या नभ सारा
हा कांठोकाठ कटाह भरा '

या कुसुमाग्रजांच्या प्रकाशपूजनांत आणि

" बिजली नाचेल गगनांत
जंगल जाळील जोशांत "

या बापटांच्या बिजलीच्या ध्यानांत कांही फरक नाही. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या आत्म-यज्ञाच्या संदेशाने जो काळ प्रज्वलित झाला होता, त्या काळाचा हें साम्य एक परिणाम आहे. त्यामुळे देशाभिमानाच्या, क्रांतीच्या भावनेंतून स्फुरलेल्या या काळाच्या सर्व कवितांत प्रकाश, यज्ञ इत्यादि प्रतीकांचा सर्रास उपयोग झाला आहे. कुसुमाग्रजांपासून बापटापर्यंत कोणीहि कवि यांतून सुटला नाही. हा एकसारखेपणा या काळांतील कवींच्या प्रतिभेवर पड-लेला काळाचा ताणच दर्शवितो असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. क्रांतिगीतां-तून व्यक्त होणाऱ्या बापटांच्या व्यक्तिमत्वांत हा ताण अधिकच स्पष्ट दिसतो. त्यामुळे त्यांचीं क्रांति-गीतें पुष्कळदा उपदेशात्मक (Didactic) किंवा प्रचारकी वाटतात.

महात्मा गांधींच्या विभूतिमत्त्वावर बापटांची मोठी श्रद्धा आहे आणि ती त्यांच्या कवि-तेंत ठिकठिकाणीं प्रगट झाली आहे. बेचाळीस कवितांच्या त्यांच्या या संग्रहांत, ६।७ कविता महात्माजींवर आहेत. त्यांतल्या बऱ्याच कविता महात्माजींच्या महाप्रयाणाच्या प्रसंगावर आहेत. या कवितांतून व्यक्त झालेलें दुःख तीव्र आहे पण त्याचा आविष्कार उत्कट नाही. " साक्षात् ईश्वर " या कुसुमाग्रजांच्या चौदा ओळींच्या सुनीतांत जें कांही उत्कट आघात करून जातें, त्याचा स्पर्श यांत होत नाही.

देशभक्तीच्या गीतांत किंवा क्रांतीच्या आवाहन छंदांत बापटांच्या काव्यकलेचें निराळे-पण व्यक्त होत नाही. तिचें सामर्थ्य दुसऱ्याच ठिकाणीं प्रगट झालें आहे. शतकानंतर प्रगट झालेल्या पहाटेच्या प्रकाशाचें त्यांनी स्वागत केलें आहे. ते प्रतिभाशाली भाटाला शोभेसेंच आहे. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जें घडलें, जाणवलें त्याचें चित्रण करतांना मात्र बापटांच्या प्रतिभेच्या आविष्काराला क्षेत्र सापडलें आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळालें पण तें सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोंचूं शकलें नाही. देश मुक्त झाला पण खंडित होऊन. जातीय दंगलींत हजारों माणसें प्राणांस मुकलीं, लक्षावधि निर्वा-

सित झालीं. द्वेषानें आणि सूडभावनेनें सुलशांति पेटली. दैन्य, दारिद्र्य हीं पूर्वीसारखींच समाजाला वेढून बसलीं. जातीयता, विषमता यांचें पूर्वीसारखेंच थैमान चालूं राहिलें. समानता व स्वातंत्र्य पहिल्याइतकेंच दूर राहिलें. जनता मताची मालक बनली पण सत्तेची वाटेकरी बनूं शकली नाही. विफलतेच्या या नव्या जाणिवेनें समाजाला ग्रासलें. मनांतला मुक्तीचा आनंद अवघडला. एक कटु निराशा हृदयाला कातरूं लागली. समाजाचें मन द्विधा झालें, दुभंगलें. या दुभंगलेल्या अंतराचें, द्विधा सामाजिक व्यक्तित्वाचें गीत गातांना बापटांची काव्यशक्ति मोहरून आली आहे. 'पहाटेचें स्वप्न', 'स्वातंत्र्य, कुठें स्वातंत्र्य', 'झेलमचे अश्रु', 'पूर्णाहुतीचा दिवस', या कवितांतून आकारास आलेलें भावविश्व आत्मप्रत्ययानें रसरसलेलें आहे. मुक्तीच्या आनंदानें गदगदलेल्या, प्राचीन परंपरेच्या अभिमानानें मोहरलेल्या पण त्याच वेळीं एक प्रकारच्या 'वंचनेच्या' विफलतेच्या कल्पनेनें व्यथित झालेल्या हृदयाचें स्पंदन या कवितांतून त्यांनी कलात्मकतेनें स्पष्ट केलें आहे. 'पहाटेचें स्वप्न' या कवितेंत रेखाटलेलें भंगलेल्या भारताचें चित्र जितकें भव्य तितकेंच करुण आहेः—

"विंध्याअैशी अविंध्य छाती
आंत वाहती प्रीतीनिर्झर
सह्याद्रीच्या म्यानेमधुनी
कृष्णेची तलवार निघे वर...
हाय! काय हे! थरके राजा
भव्य असे जरि भारत मोठा
कुठे तयाचे बाहू दोन्ही
हा दोन्ही हातांनी थोटा"

'झेलमच्या अश्रूंत' भारताच्या विभक्तीकरणानंतर झालेल्या भीषण संहाराची करुण कहाणी झेलमच्या मुखानें वदवली आहे. जातीय विद्वेषांतून भडकलेल्या संहाराच्या या प्रसंगाला इतिहासांत अभूतपूर्व अशा या मानवी समाजाच्या उन्मूलनाच्या भीषण घटनेला झेलमच्या अद्‌भुतरम्य कथेची पार्श्वभूमी देण्यांत आली आहे. देवेंद्राच्या आज्ञेवरून, अमृतकुंभ घेऊन पृथ्वीवर अवतरलेली अप्सरा तिलोत्तमा, 'अमृतघटांचे क्षणि करतो विषकुंभ' अशा मानवाला बघून दुःखानें व उद्वेगानें परत फिरते. स्वर्गीय अद्‌भुत पार्श्वभूमीमुळे या दीर्घ काव्याला एक प्रकारच्या भव्यतेचा स्पर्श झाला आहे, हें खरें. परंतु इंद्र, हिमवान, गौळणी, गोकुळ या अद्‌भुत प्रतिमांची सांखळी पुढे तशीच चालूं ठेवल्यामुळे मानवी समाजाच्या उन्मूलनाच्या या भीषण प्रसंगांतील वास्तवतेचे रंग झाकळलेले, फिके व परिणामहीन झाले आहेत. त्यामुळे या करुणभीषण प्रसंगाच्या उत्कटतेसहि हानि पोचली आहे. वास्तवतेंतील प्रखरता या प्रकारें ढळल्यामुळे बऱ्याच ठिकाणीं रचनेंतहि शिथिलता आली असून कांही ठिकाणीं अनावश्यक रसहीन द्विरुक्ति (कडवें १९ व २७) घडली आहे, तर कुठे "नी खूपच केला मग झेलमने शोक" या सारख्या नीरस गद्य ओळी रचल्या गेल्या आहेत. हे क्षुद्र दोष सोडून दिले तर समाजाच्या एका नव्या व खोल जखमेंतील करुणा व आर्तता सहृदयतेनें व उत्कटतेनें या दीर्घ काव्यांत चित्रित करण्यांत आली आहे; आणि त्याबद्दल बापटांचें अभिनंदन केलें पाहिजे. 'झेलमच्या अश्रूंपेक्षा' 'पहाटेचें स्वप्न' अधिक अेकजिनसी व प्रभावी उतरलें आहे. 'स्वातंत्र्य कुठे स्वातंत्र्य' या काव्यांतला उपहास मोठा मर्मभेदी आहे. त्यांतला अनुभव

वास्तवांतील प्रखरता घेऊन उमटला आहे. स्वतंत्र होऊनहि गुलाम राहिलेल्या, आणि समानतेच्या घोषणा करीत करीत विषमतेने पिचणाऱ्या मनांतील त्वेषपूर्ण उद्‌गार काळजाला भिडतो—

" जरि निघून गेले परके अपुल्या देशीं
आम्हीच आमुचे गुलाम हिंदुस्थानीं "

तसेंच 'पूर्णाहुतीचा दिवस' या कवितेंतील, " पण पाण्यांत पेरलेल्या त्या राखेची फल-श्रुति काय " असा प्रश्न ऐकून, विफल व अगतिक वर्तमानाची जाणीव मनाला व्यथित करते. या साऱ्या कवितांतील आवेश व तळमळ प्रभावी आहे. द्विधा मनांतील व्यथेचा स्पर्श जेथे होतो तेथे बापटांची कविता उफाळून वर येते. दुभंगलेल्या हृदयांतील जखमांच्या डोळ्यांना डोळा भिडवून पाहण्याचें सामर्थ्य बापटांच्या प्रतिभेत आहे. या सामर्थ्याचा विकास झाल्यास सामाजिक आशयांतून प्रेरणा घेऊन उठणारी त्यांची कविता मराठी काव्याला नव्या जाणिवांनी संपन्न व विशाल बनवील, अशी आशा आहे.

सामाजिक आशयाच्या कवितांकडून, वैयक्तिक सुख-दुःखांचा अनुभूतींचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या कवितांतून परिणामकारक उत्कटता आणि चपळ नि तेजस्वी अशा कल्पनांचा मनोहर संगम झाला आहे असें दिसून येतें. प्रेमांतील सफलता नि विफलता, आशा-निराशा, मान व समर्पण या भावनांचें मोठें नाजुक व खेळकर चित्रणहि त्यांच्या प्रेमगीतांत दिसून येतें. सोनापूरच्या भिंतीवरील, नामया–तुकया–जयदेवाबरोबर शबनमची, श्रीरामाबरोबर एस्थेरचीं उत्तान चित्रें पाहून कवीच्या मनांत असा प्रश्न उठतो:—

" मरणाची झांकाया धास्ती । मानवतेची धडपड कां ही
काय वेदनाविश्वावर नर । पटल धुक्याचें ओढूनि घेई "

आणि मग तेथील सर्व प्रकृत–विकृत आकृति " जय जीवनपट जय शाश्वत नट " असा जीवनाचा जयजयकार करीत आहेत, असा भास होतो. मरणाच्या दारांतहि अनंग-रंगांत रंगणारा दुबळा मानव जीवनाच्या शाश्वत नटाचा अंश आहे आणि मरणाला जिंकू पाहात आहे हा प्रत्यय केवळ जीवनलक्षीच नाही तर सौंदर्यलक्षीहि आहे. सौंदर्यशोधक प्रतिभेचा हा उन्मेष " केवळ सौंदर्य केवळ आनंद " या कवितेंत मोठ्या मनोहरतेने आणि उत्कटत्वाने प्रगट झाला आहे. " आनंदरूपममृतम् यद्विभाति " अशा श्रद्धेने जगाकडे पाहणाऱ्या मनाच्या अेका कोपऱ्याचें दर्शन या कवितेंत घडतें. जीवन सौंदर्यमय आहे आनंदमय आहे या श्रद्धेने जीवनाचा वेध घेत फिरणाऱ्या या कविमनाचा हा आविष्कार फार सुंदर आहे. जीवनांतील विविध रसांचें हें वर्णन किती रसपूर्ण आहेः —

" गोड आंबटशा चिंचेची तो मिठी
ताज्या जांभळाची चव खट्टी मिठी
गोडी अविट ती दीर्घ चुंबनाची
किंवा ओझरत्या बालकपोलांची
लुटा रे लुटा हा मधुमकरंद "

बापट हे जीवनवादी असले तरी, बोधवादाच्या किंवा संप्रदायाच्या आहारीं जाऊन त्यांचें जीवनाचें आकलन सांचेबंद, ठोकळेबाज बनलेलें नाही, तसेंच दुःखनिराशेने त्यांचें मन विकल–विकृत झालें नाही, असें या कविता वाचतांना वाटतें.

"पांच राजहंस माझ्या पालखीला
उचलिती आनंदमयांत"

शब्द,–स्पर्श,–रस,–रूप,–गंधाच्या इंद्रियगोचर अनुभूतींच्या द्वारें आनंदाकडे सौंदर्याकडे जाणाऱ्या, बोधशून्य, तात्पर्यशून्य, परंतु सर्वस्पर्शी व सखोल अशा जीवनप्रवाहाच्या प्रेरणेवरील श्रद्धेचा प्रत्यय या कवितेंत मोठ्या सहजपणें आणि उत्कट शब्दांत प्रगट झाला आहे. 'जयकेतु' या कवितेंत हीच कल्पना त्यांनी

"मी अहेतुकाचा हेतु
मी अपार्थिवाचा सेतु"

या शब्दांत मांडली आहे. सहेतुक व अहेतुक, पार्थिव व अपार्थिव यांच्यांतलें अंतर सांधायला शब्दांचे पूल कितीहि उभारले तरी ते अपुरेच पडतील. काव्यांतील सामाजिक तत्वज्ञानाचा प्रश्न असाच आहे. "ग्रीष्मांतील वणव्याप्रमाणे स्वतःच्याच आवेगाने पुढे जाणारें" आणि "स्थितिनिष्ठेच्या जीर्ण गव्यांचें दहन करणारें सामाजिक सूत्र आजच्या युगधर्माची प्रमुख प्रेरणा आहे आणि या प्रेरणेचा सावेश हार्दिक पुरस्कार हें सत्काव्याचें अेक वैशिष्ट्य आहे असें कुसुमाग्रजांनी 'विजली' संग्रहाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. परंतु हें विधान अेकांगी होईल अशी भीति वाटते. ग्रीष्माच्या 'विदग्ध' सूत्राप्रमाणेच स्वतःच्या आवेगाने पुढे जाणारें वसंताचेहि अेक विकाससूत्र समाजांत 'अनुस्यूत' असतें आणि या सूत्राची जाणीवहि युगधर्माची प्रेरणा बनूं शकते. हा विकासाचा साक्षात्कार सृजनशील प्रवृत्तीला अधिक मोलाचा आहे. म्हणून कोणत्याहि अेका सामाजिक तत्त्वज्ञानापेक्षा, काव्यांत उमटणारी जीवनाची अनुभूति अधिक महत्त्वाची आहे. या अनुभूतीचें मूल्यांकन सामाजिक तत्त्वज्ञानाने करण्यापेक्षा, तीमधील सखोलतेने, व्यापकतेने व आन्तरिक सुसंगतीने करणेंच अधिक इष्ट व मूलगामी ठरेल. यादृष्टीने बापटांच्या काव्याचें मूल्यमापन त्यामधील सामाजिक विचाराच्या आधाराने न करतां त्यांत अवतरलेल्या भावविश्वाच्या आन्तरिक संगीत सौंदर्याच्या आधाराने करणेंच, योग्य होईल. सामाजिकतेपलीकडे जाऊन जेथे कवीची भावना केवळ अेक निखळ अनुभूति घेऊन आपल्या उत्कटतेने उसळून वर आली आहे, तेथेच बापटांची कविता अधिक मधुर, सुंदर व हृदयस्पर्शी झाली आहे.

बापटांची भाषा सुडौल, दाणेदार, नादमधुर, अर्थवाही आहे. नाट्यानुकूल शब्दरचना हें तिचें अेक मनोहर वैशिष्ट्य आहे. क्वचित् 'दक्षिण' व 'सव्य' हे अेकच अर्थाचे शब्द डावें उजवें या अर्थाने वापरण्यांत आले असले तरी त्यांची रचना बहुधा निर्दोष आहे. अर्थवाही सुंदर भाषा, तरल व चमकदार कल्पना आणि जीवनांतील विविध प्रकारचे अनुभव अचूकपणें ग्रहण करणारी संस्कारक्षम दृष्टि बापटांना लाभली आहे याचा साक्षात्कार, 'विजली' संग्रहांत, ठाइं ठाइं होतो आणि तोहि विजेच्या चमकाऱ्याप्रमाणे. ह्या कविता वाचून या 'अपवादाच्या यात्रिकाच्या' पुढील कृतीसाठी मन उत्सुक होतें यांत संशय नाही.

— वा. रा. कांत

६

मातृभाषेचें अध्यापनः—(लेखकः —प्रा. चंद्रकुमार डांगे; प्रकाशक—चित्रशाळा प्रकाशन, पुणें २; पृ. ३१६; किंमत ४ रुपये)

मातृभाषेच्या अध्यापनपद्धतीची सांगोपांग चर्चा करणारा हा ग्रंथ पुणें येथील टिळक कॉलेज ऑफ् एज्युकेशनमधील प्रा. डांगे यांनी लिहिलेला आहे. मातृभाषा म्हटली की अभ्यास-क्रम, पाठ्य-पुस्तकें, आणि गद्य, पद्य व व्याकरण, अध्यापन यांचा विचार करणें क्रमप्राप्त होतें. तद्वतच मातृभाषेच्या शिक्षकाबद्दल असणाऱ्या अपेक्षांचाहि विचार डोकावतो. परंतु लेखकाचा भर पाठ्यपुस्तकांवर फार दिसतो. म्हणूनच की काय जवळजवळ ४० पृष्ठें या प्रकरणाला खर्ची घातलेलीं आहेत. उपलब्ध मालांचें परीक्षण करीत असतांना खुद्द लेखकानेहि अतिव्याप्त विधानें केलेलीं आहेत. तर टीका करण्याच्या भरांत अनवधानामुळे राहिलेल्या किरकोळ बाबींचा अकारण उल्लेख करून आपल्या 'नवखेपणाचा' पुरावा उपलब्ध केलेला आहे. क्वचित् दोष म्हणून दाखविलेलीं स्थळेंहि त्या त्या संपादकांनी नव्या आवृत्तींत काढून टाकलेलीं आहेत. पण लेखकाने त्यांकडे सोयिस्कर दुर्लक्ष केलेलें आहे. हे दोष वगळले तर पाठ्यपुस्तकांच्या संपादकांना मार्गदर्शन करून विचारप्रवण करील अशी मूलगामी चर्चाहि केलेली आहे हें नमूद करावयास हवें. व्याकरणाचा पाठ नाही हें एक फार मोठें वैगुण्य आहे.

वाणी-विकास, लेखन आणि वाचन यांचा विचार मात्र सांगोपांग असून अध्यापकांना नवी दृष्टी देणारा आहे. प्रचलित परीक्षा-पद्धतींतील ठळक दोषांचें व नव्या परीक्षेंतील गुणांचें विवेचन चांगलें झालेलें आहे. समवाय पाठपद्धतीबद्दल घेतलेल्या शंका तज्ज्ञांनी विचार करण्यासारख्या आहेत. शास्त्रीय विषयाचें विवेचन करतांना देखील प्रा. डांगे यांनी आपल्या आकर्षक शैलीचा प्रत्यय सर्वत्र आणून दिलेला आहे. आपल्या अनुभवाचा फायदाहि त्यांना ह्या लेखनकार्यात सोबत करतांना आढळतो. मातृभाषेच्या अभ्यासकांनी आवर्जून अभ्यास करण्यासारखा हा ग्रंथ शिक्षणक्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण आहे यांत संशय नाही. शिक्षणक्षेत्रांत नव्याने लेखक म्हणून पदार्पण करणाऱ्या प्रा. डांगे यांच्याकडून उत्तमोत्तम ग्रंथांची अपेक्षा बाळगणाऱ्यांना, प्रस्तुतचा ग्रंथ चांगला विसार आहे हें निश्चित.

—म. ना. अदवंत

कला आणि कलास्वाद (लेखक : श्री. श्री. दा. भालेराव; प्रकाशक : मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट-मुंबई २८; किंमत : आठ रुपये; पृष्ठसंख्या ८०; चित्रावली : १८, त्यांतील ४ रंगीत.)

कला, कलामूल्यें, त्यांची चिकित्सा, कलाकृतींचा रसास्वाद यांविषयींचें वाङ्मय मराठी-मध्ये फार थोडें आहे. जें कांही थोडें वाङ्मय प्रकाशित होतें त्यांत साहित्य विषयाचाच परामर्श सर्वाधिक असतो. किंबहुना, सर्वसाधारण वाचकाची प्रायः अशी समजूतहि असते की, 'साहित्य म्हणजेच काय ती कला.' ही समजूत नुसती अयोग्यच नव्हे, तर अनिष्टहि आहे. परंतु ती पोसण्याला अनेक वाङ्मयीन लेखकांचा दृष्टिकोण आणि आपणा सर्वांचा वाङ्मयीन कलाकृतींवरील बेप्रमाण भर कारणीभूत झाला आहे. वस्तुतः वाङ्मय ही इतर अनेक कलांपैकीं एक कला आहे. वाङ्मयाशीं संगीत, नृत्य, चित्र, शिल्प, वास्तु या ललितकला सगोत्र आहेत. प्रसंगीं त्या आपल्याला वाङ्मयकलेइतकाच, किंबहुना कधीकधी तिच्याहूनहि अधिक आनंद

देतात. त्यांची चिकित्सा करतांनाहि असें आढळून येतें की, अनेकवेळां त्यांच्या कक्षा एकमेकींना छेदून जातात. एखादी महानदी अनेक मुखांनीं समुद्राला मिळते, आणि तिच्या प्रत्येक मुखाजवळचें स्वरूप आणि दृश्यदेखील वेगवेगळें असतें, परंतु ते सर्व उपप्रवाह ज्याप्रमाणे एकाच महाप्रवाहापासून निघालेले असतात, त्याप्रमाणे या ललितकला भिन्न स्वरूप असल्या तरी मूलतः एकच आहेत. त्यामुळे त्यांच्याविषयींचें साहित्य अशा सर्वंकष दृष्टीने निर्माण झालें पाहिजे; आणि तसें होण्यासाठी वाङ्मयव्यतिरिक्त इतरहि ललितकलांविषयी उमाप साहित्य प्रथम स्वतंत्रपणें उत्पन्न झालें पाहिजे. हीच अपेक्षा पुरी करण्याच्या निमित्ताने जळगांवचे चित्रकार श्री. श्री. दा. भालेराव यांनी ' कला आणि कलास्वाद ' हें पुस्तक लिहून फार चांगली सुरुवात केली आहे.

' कला आणि कलास्वाद ' या पुस्तकांतील विषय, चित्र, शिल्प आणि वास्तु या कलांच्या चर्चेला आणि आस्वादाला वाहिलेला आहे. या तिन्ही कला एकमेकींशीं संबद्ध आहेत,—कांहीं अंशीं पूरकहि आहेत. त्यांचा स्थूल परिचय लेखकाने पहिल्या चार प्रकरणांत करून दिला आहे आणि नंतर आपल्या विचारसरणीच्या समर्थनासाठी चित्र, शिल्प आणि स्थापत्य (वास्तु ?) यांच्या कांहीं श्रेष्ठ कलाकृतींचें रसपूर्ण असें दिग्दर्शन केलें आहे. ज्या कलाकृती त्यांनी निवडिल्या आहेत त्या श्रेष्ठ भारतीय परंपरेमधल्या असून कांही रेखाचित्रें, कांहीं रंगचित्रें आणि कांहीं शिल्पकृतींचीं आणि वास्तुकृतींचीं छायाचित्रें आहेत. प्रस्तुत पुस्तकाचा हा एक आकर्षक विशेष आहे.

एखादें चित्र रुचलें किंवा न रुचलें, हें सांगणें सोपें आहे, पण आपल्या रुचीची अथवा अरुचीची कारणमीमांसा करणें फार कठिण आहे; कारण त्यासाठी आपली विचारसरणी पायाशुद्ध रीतीने पारखलेल्या मूल्यांवर स्थिर व्हावी लागते. शिवाय त्या स्थिरतेमध्येंहि दिलदारी असावी लागते. एरवी, ती एकारण्याचा धोका फार नजीक असतो. श्रुतीवर संस्कार होणें हें संगीतश्रवणाला ज्याप्रमाणे अगत्याचें आहे, त्याप्रमाणे चित्रदर्शनालाहि नेत्रांना शिक्षण मिळणें फार महत्त्वाचें आहे. ही " दर्शन–शिक्षा " हा प्रस्तुत पुस्तकाचा एकमेव हेतु आहे; आणि तो साध्य करितांना वरील कलांविषयींच्या अनेक तत्त्वांचा, मूलगामी नसला तरी, चांगला उहापोह श्री. भालेरावांनी केला आहे. या ऊहापोहांत प्राधान्याने भारतीय कलापरंपरेचाच विचार समाविष्ट आहे. तींतील अनुस्यूत कल्पना, प्रतीकें, आकृतिसौष्ठव, भावसौंदर्य यांचें स्वरूपकथन लेखकाने जितकें सुगमपणें तितकेंच तें रसिकतेने आणि भावमयतेने केलें आहे. चित्रकलेंतील सार्वदेशीय तत्त्वें, त्यांचें स्वरूप, भावगम्य सत्य, तींतील विविध अलंकरणें, यथादर्शन, छायाप्रकाश, विरचना, रंगसंगति, तोल, पोत (texture) कलेचें षडंग स्वरूप, भारतीय चित्रपीठिकांचा धावता इतिहास व त्यांचीं वैशिष्ट्यें अशा किती तरी विशेषांनी हें पुस्तक नटलें आहे. या सर्वांचा पडताळा पटावा म्हणून उत्तरार्धांत चित्र, शिल्प व वास्तु यांचीं जीं विविध आस्वादनें दिलीं आहेत तीं अतिशय सरस आणि हृदयंगम आहेत. प्रतीकांनी भारतीय कलापरंपरेंत फार अर्थपूर्ण क्रीडा केली आहे. तिचा खुलासा लेखकाने वारंवार केला आहे. त्यामुळे त्या त्या कलाकृतींचें अंतरंगच उलगडल्यासारखें ठिकठिकाणीं वाटतें. या संदर्भात हें सांगावेंसें वाटतें की, घारापुरीच्या 'त्रिमूर्ती' चा, किंवा ' दोन बोकड ' या चित्राचा अथवा अजंठ्यांतील ' सर्वनाश ' या रेखाचित्राचा रसास्वाद अत्यंत वाचनीय उतरला आहे. हीं केवळ उदाहरणें म्हणून दिलीं. वास्तविक

पाहतां, बहुतेक सर्वच रसास्वाद भावपूर्ण आणि मार्मिक वठले आहेत. आणि याचें कारण लेखकाचा या कलाकृतींविषयीचा जिव्हाळा आणि त्यांची यथोचित समजूत. किंबहुना, श्री. भालेरावांची हीं आत्मनिष्ठ आस्वादनें वाचल्यावर त्या कलाकृतींचें कांही अभिनवच सौंदर्य प्रत्ययाला येतें. त्रिमूर्ति, मथुरेचा बुद्ध, तंजावरचा नटराज, सांचीचा स्तूप, ताजमहाल, पानी आया, सर्वनाश, दोन हत्तींची लढाई, शुकतप, दोन बोकड, अजंठ्याचा कलामंडप इत्यादि कलाकृति मुळांतच रमणीय व भावपूर्ण आहेत. त्यांत पुन्हा लेखकाच्या रसिकतेचा शिडकावा त्यांवर झाला म्हणजे त्या अंकुरून तरारून उठतात. त्यांमधलें तरल-गंभीर सौंदर्य वाचकांच्याहि मनापुढे नाचूं लागतें. आणि तीं चित्रें, शिल्पें, त्या वास्तु पुन्हा पुन्हा दृष्टींनी कुरवाळाव्या, अशी इच्छा होते. श्री. भालेरावांची निर्मळ भाषा या वेळीं विषयाशीं समरस होऊन खळखळ वाहूं लागते. त्यांनी तात्त्विक चर्चा अधिक प्रमाणाने समाविष्ट केली असती, तौलनिक मूल्यें चर्चिलीं असतीं, शिल्प व वास्तु यां विषयींचीं त्रुटित प्रकरणें भरघोस केलीं असतीं आणि नीतिकल्पनांची कलेमध्ये अधूनमधून होणारी लुडबूड काढून टाकली असती तर पुस्तकाला खचीत अधिक इष्ट असा वजनदारपणा लाभला असता. कला आणि नीति यांच्या परस्परसंबंधांविषयीच्या श्री. भालेराव यांच्या कल्पना घासून घेतलेल्या दिसत नाहीत, असें क्वचित् स्थळीं वाटल्यावांचून राहात नाही.

— अरविंद मंगरूळकर.

सितारा मंझिल–[ले. प्रो. ना. सी. फडके. अंजलि प्रकाशन लिमिटेड, किंमत रु. चार.]

प्रो. ना. सी. फडके यांची ही एकतिसावी कादंबरी. वाचकांना परिचित असलेल्या हैद्राबादमधील आंदोलनाचा पार्श्वभूमिदाखल उपयोग करून ही कादंबरी लिहिली आहे. त्यामुळे प्रचलित राजकीय वावटळींचें ज्यांना कौतुक वाटतें त्यांना ही कादंबरी ‘ वास्तव ’ म्हणून आकर्षक वाटण्याचा संभव आहे.

प्रतिभा ही मोठी लहरी तरुणी आहे. ती विद्वत्तेला वश होईलच असें नव्हे; त्याचप्रमाणे ती वाढत्या वयाचा धाक मानीलच याची खात्री नाही. ‘ विद्वान् ’ म्हणून प्रसिद्ध नसलेल्या जेन् ऑस्टिनने आपली ‘ प्राइड् अँड प्रेज्युडिस् ’ ही रम्य कलाकृति वयाच्या २१ व्या वर्षी लिहिली; तर हेन्री फील्डिंग् याने आपलें कादंबरीलेखन वयाची पन्नाशी उलटल्यानंतर सुरू केलें. प्रो. फडके यांनी आपलें कादंबरी-लेखन तरुणपणीं सुरू केलें व वयाला साठ वर्षे उलटून गेलीं असलीं तरी तें अव्याहत चालूं आहे. त्यांच्या लेखणीची ही ताकद खचित कौतुकास्पद म्हटली पाहिजे. पण लेखनवैपुल्यामुळे भाषेची सहजता वाढत जाते त्याप्रमाणे प्रतिभेचें तेजहि उत्तरोत्तर हमखास वृद्धिंगत होत जातें तर कोण बहार होती !

‘ सितारा मंझिल ’ ची भाषा सोपी व गोड असल्यामुळे पुस्तक कंटाळवाणें वाटत नाही, हें खरें; तथापि कलेच्या दृष्टीने ही कादंबरी निराशाजनकच म्हटली पाहिजे. रझाकारांचे मदतनीस व सितारा मंझिलचे मालक जाफरजंग यांचें स्वभावचित्र बरेंच उठावदार वाटतें; पण त्यांत प्रवासींतील पंजाबराव सरंजामे यांच्या स्वभावचित्रांतलें चैतन्य नाही. जुलियाचें चित्र वास्तविक केवढें हृदयंगम असावयास पाहिजे ! पण ज्या लेखणींतून निर्मला, इंदुमति, आशा, विद्या, मीना या उज्ज्वल मानसकन्यका निर्माण झाल्या ती आता मंदोत्साह स्थितींत वावरतांना दिसते. कादंबरीचा उत्तरार्ध तर केवळ वर्तमानपत्री पद्धतीच्या माहितीने भरलेला

असल्यामुळे कलेची शोभा त्यांत नाहीं. कथानकाचें तेज वाढत्या कमानीने प्रगट होत होत शेवटीं वाचक मंत्रमुग्ध व्हावयाला पाहिजे हें काय प्रो. फडके यांच्यासारख्या थोर लेखकास सांगावयास पाहिजे ?

जो उत्कृष्ट लेखक असतो तो आपला स्वतःचा वाचकवर्ग निर्माण करीत असतो; त्याचप्रमाणे कोणत्या दृष्टीकोणांतून व कोणत्या अपेक्षेने आपल्या वाङ्मयाचें रसग्रहण रसिकांनी करावें याबद्दल तो जणूं स्वतंत्र निकष त्यांच्या हवाली करीत असतो. प्रो. फडके यांनी दौलत, जादूगार व अटकेपार यांसारख्या निरतिशय सुंदर कलाकृति निर्माण करून रसिकांच्या अपेक्षा वाढविल्या. या रसिकांनी जर त्यांच्याकडून यापेक्षाहि जास्त मेजवानीची अपेक्षा केली तर तो दोष त्यांचा नव्हे. आणि जर सितारा मंझिल सारखी कादंबरी वांचतांना त्यांचें तोंड कडवट झालें तर त्याबद्दलहि त्यांना दोष लावतां येणार नाही. ज्याने त्यांना रमणीयतेची चटक लावली त्याचा फार तर तो ' दोष ' म्हणतां येईल.

डॉक्टर जॉनसन् याची एक मार्मिक हकीगत बॉसवेलने वर्णन केली आहे. एका लायब्ररींत त्याची व इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज् याची गाठ पडली असतांना राजाने विचारलें, " काय हो, हल्ली कांही लिहितां की नाहीं ? " जॉन्सन्ने उत्तर केलें,

" नाही, सरकार ! "

" कां बरें ? " राजाने प्रश्न केला. तेव्हा जॉनसन्ने उत्तर केलें, " माझ्याजवळ जें कांही सांगण्याजोगें होतें तें सांगून झालें. आता मला जरा थांबलें पाहिजे. नवीन वाचलें पाहिजे. चिंतन केलें पाहिजे ! " जॉनसन्चें हें उत्तर प्रत्येक कलावंताने लक्षांत ठेवण्याजोगें आहे. प्रतिभा-तेजाने रसरसल्याशिवाय जें लिखाण लिहिलें जाईल तें रसिकांना कसें मोह पाडणार ? नामांकित कादंबरी म्हणजे निवेदनाची पोथी नव्हे. तिच्यांत लेखक हा आपल्या काळजाला हात घालतो आहे असें वाटलें पाहिजे. लेखकाने बाह्य घडामोडींचा पसारा न माजवितां अंतःकरणांतील घडामोडींचा रहस्यमय विलास जास्त कसोशीने वर्णन केला पाहिजे. कथेसाठी जी पार्श्वभूमि वापरावयाची तिने कथानकावर कुरघोडी करतां कामा नये. निवेदनाचें जुजबी तंत्र न स्वीकारतां संवादाची सुंदर मदत घेऊन चित्रमय पद्धतीने एकंदर कथानकाची धावती मांडणी करावयास पाहिजे. ज्याने दौलतसारखी उज्ज्वल कलाकृति निर्माण केली, त्याची नवीन कादंबरी वाचतांना वाचकाला त्याच्या पूर्वीच्या पराक्रमांचीच उत्कटतेने आठवण व्हावी, यासारखी उद्वेगजनक गोष्ट दुसरी कोणती ?

—मा. का. देशपांडे

मराठीचिये नगरीं : संपादक

वि. सा. संघाचे नवे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने

एप्रिल १ पासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षासाठी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध संशोधक श्री. हरि नारायण नेने यांची विनाविरोध निवड झालेली वाचून अत्यंत आनंद वाटला. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतर्फे आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मध्यप्रदेश शाखेचे श्री. नेने हे अध्यक्ष आहेतच. त्यांचीच योजना वि. सा. संघाच्या अध्यक्षपदीं झालेली असल्यामुळे महाराष्ट्रांतील या दोन साहित्य संस्था अधिक निकट आल्याचा योग या घटनेमुळे अनायासे जुळून आला ही विशेष संतोषाची गोष्ट होय. महानुभावीय वाङ्मयाचे संशोधक म्हणून श्री. हरिभाऊ नेने यांची महाराष्ट्राला ओळख फार पूर्वीपासून आहे. इ. स. १९३१ मध्ये त्यांनी प्रसिद्ध पंडित कै. नी. व. भवाळकर यांच्या सहकार्याने 'श्रीचक्रधर सिद्धान्त सूत्रें' याचा पहिला भाग व्यवस्थित रीतीने संपादून प्रसिद्ध केला. सहा वर्षांनंतर याच दोन्ही विद्वानांनी मिळून 'दृष्टांत पाठ' प्रकाशांत आणला. या ग्रंथांचें संपादन पाहिलें म्हणजे श्री. भवाळकरांच्या बरोबरच श्री. नेने यांच्याहि व्यासंगाची व दीर्घ परिश्रमाची चांगली कल्पना येते. याशिवाय श्री. नेने यांनी स्वतंत्र रीतीने केलेलें संपादन कार्य म्हणजे 'लीलाचरित्र' या ग्रंथाचे सर्व भाग, लक्ष्मण रत्नाकर, चक्रधरोक्त सूत्रपाठ, नित्यदिनी लीळा, आचार स्थळ, महावाक्यप्रमेय इत्यादि ग्रंथ होत. यांपैकीं 'लीलाचरित्रा'चें प्रसिद्धीकरण म्हणजे एक फार महत्त्वाचें कार्य होय. मराठी भाषेतील हा अपूर्व गद्य ग्रंथ महत्प्रयासाने लिप्यंतरित करून आणि प्रकाशांत आणून श्री. नेने यांनी महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची महत्त्वाची सेवा केली आहे यांत शंका नाही. महानुभाव वाङ्मयाप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या अभ्यासांतहि ते तितकेच पारंगत आहेत. 'ज्ञानेश्वरदर्शनां'त ज्ञानेश्वरीच्या व्याकरणावर त्यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण लेखावरून याची कल्पना येईल. याशिवाय 'शिक्षणकला व मानसशास्त्र' या विषयावरहि त्यांनी एक महत्त्वाचा प्रबंध लिहिलेला आहे. अशा या व्यासंगी व अभ्यासू संशोधकाला अध्यक्षपदीं निवडून देऊन विदर्भ साहित्य संघाने स्वतःचाहि गौरव करून घेतला असें म्हणण्यास आम्हांला संकोच वाटत नाही. श्री. हरिभाऊ नेने यांच्या कारकीर्दीत विदर्भ साहित्य संघाकडून संशोधनपर असें कांही भरीव वाङ्मयीन कार्य झालें तर ती सार्थकीं लागली असें म्हणता येईल. आम्ही श्री. नेने यांचें पुन्हा अभिनंदन करतों व त्यांच्या कारकीर्दीला सुयश चिंतितों.

मध्यप्रदेश शासनसाहित्य परिषद

महाविदर्भांतील दुसऱ्याहि एका महत्वाच्या घटनेचा साभिनंदन निर्देश करणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. मध्यप्रदेश सरकारने गेल्या वर्षी मराठी व हिंदी साहित्याच्या उत्कर्षासाठी एक लक्ष रुपये काढून ठेवले होते. या वर्षीहि त्यांनी एक लक्ष रुपये या कार्यासाठी राखून ठेवलेले आहेत. यावरून दरवर्षी या कार्यासाठी एक लक्ष रुपयांचा विनियोग करण्याचा मध्य-

प्रदेश सरकारचा संकल्प असल्याचें दिसतें. त्यांनी दाखविलेल्या या साहित्यप्रेमाबद्दल कुणाहि साहित्यिकाच्या अंतःकरणांत कौतुकाचीच भावना निर्माण होईल. या एक लक्ष रुपयांपैकी निम्मी रक्कम म्हणजे पन्नास हजार रुपये मराठी साहित्याप्रीत्यर्थ खर्च व्हावयाचे आहेत. हा खर्च निरनिराळया साहित्यविषयक ग्रंथांना पुरस्कार देण्याच्या रूपाने होईल असें प्रसिद्ध झालेल्या योजनेवरून दिसतें. यांतील एक महत्त्वाचा भाग असा कीं या पन्नास हजारांतून दरवर्षी एक अखिल भारतीय स्वरूपाचा पुरस्कार मराठींतील एखाद्या विशिष्ट विषयावरील सर्वोत्कृष्ट ग्रंथाला मिळेल. या वर्षी ' वाङ्मयीन टीका ' हा विषय पुरस्कारासाठी निवडलेला आहे. मराठी साहित्यांतील प्रमुख प्रवाहांचा किंवा महत्वाच्या कृतींचा टीकात्मक अभ्यास ज्यांत अंतर्भूत झालेला आहे अशा ग्रंथाला या वर्षी हा पुरस्कार मिळेल. पुढील वर्षासाठी परिषदेने पुरस्कारासाठी ' वाङ्मयीन टीकाशास्त्र ' हा विषय जाहीर केला आहे. महाराष्ट्रांतीलच नव्हे तर भारतांतील सर्व मराठी साहित्यिकांनी इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आम्ही सूचना करतों. अशा प्रकारच्या अखिल भारतीय स्वरूपाच्या पुरस्काराची योजना केल्याबद्दल मध्य-प्रदेश शासन साहित्य परिषदेचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

नागपूर विद्यापीठांत मराठी हा आवश्यक विषय

जिचा सर्व मराठी भाषीयांना अभिमान वाटेल अशी आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे नागपूर विद्यापीठाच्या इंटर (आर्टस्) परीक्षेला मराठी—हिंदी या मातृभाषा आवश्यक करण्यांत आलेल्या आहेत. आतापर्यंत या परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपापल्या मातृभाषेंत केवळ निबंधाचा पेपर आवश्यक म्हणून लिहावा लागत असे. यापुढे या निबंधा-ऐवजी ज्यांची मातृभाषा मराठी आहे त्यांना मराठी हा ' विषय ' आवश्यक म्हणून घ्यावा लागेल. म्हणजे इंग्रजी बरोबर मराठी हा विषय अनिवार्य करण्यांत आलेला आहे. अर्थात् ज्यांची मातृभाषा हिंदी किंवा उर्दू असेल त्यांना हिंदी किंवा उर्दू विषय आवश्यक राहील हें सांगणें नकोच. नागपूर विद्यापीठाने उचललेलें हें पाऊल अत्यंत प्रगतिपर आहे यांत शंका नाही. आणि त्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें अवश्य आहे. मराठी व हिंदी माध्यम सुरू करण्याचें महत्त्वाचें कार्य केल्याबद्दल नागपूर विद्यापीठाचा गौरव सर्वांनी केलाच आहे. तितक्याच महत्त्वाचा किंबहुना त्याहूनहि अधिक महत्त्वाचा हा निर्णय आहे. सामान्यतः देशी भाषाकडे तुच्छतेने पाहण्याची वृत्ति, आणि विशेषतः इंग्रजीसमोर त्यांना हीन लेखण्याची वृत्ति आमच्या तथाकथित विद्वानांतून अद्यापि नाहीशी झालेली नाही. अशा स्थितींत मातृभाषांचें महत्त्व ओळखून त्यांना योग्य तें गौरवाचें स्थान देण्यांत नागपूर विद्यापीठाने जी स्वाभिमानी धडाडी दाखविली त्यामुळे सर्वांचें अंतःकरण भरून येईल. तथापि इंग्रजीप्रमाणेच मराठी विषय आवश्यक करून मराठीला इंग्रजीच्या अर्ध्यासनावर बसविण्याचेंच काय तें कार्य आता सिद्ध झालें आहे. या पुढची पायरी म्हणजे मराठी (अर्थात् मातृभाषा) हिला पहिलें स्थान देऊन इंग्रजी हा विषय आवश्यक न ठेवतां त्याचा अंतर्भाव ऐच्छिक विषयांत करणें ही होय. हें झाल्यांचून मराठीला तिचें योग्य स्थान मिळाल्याचा आनंद पूर्ण होणार नाही. नागपूर विद्यापीठ लौकरच याहि बाबतींत पुढाकार घेऊन योग्य तो बदल घडवून आणील अशी आशा करावयास कांहीच हरकत नाही.

इतिहास व वाङ्मय संशोधन मंडळ, हैदराबाद

संशोधनासंबंधी महाराष्ट्रांत दिवसेंदिवस अधिकाधिक आस्था निर्माण होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. भारत इतिहास संशोधक मंडळ, सत्कार्योत्तेजक सभा, राजवाडे संशोधन मंदिर, शारदाश्रम इत्यादि संशोधन संस्था अनेक वर्षांपासून फार महत्वाचें कार्य करीत आहेत. त्यांतच मुंबई मराठी संग्रहालयांतील 'मराठी संशोधन मंडळा'ची फार महत्वाची भर कांही वर्षांपूर्वी पडली आहे. प्रा. कृ. पां. कुलकर्णी हे या मंडळाचे आरंभीचे संचालक होते. त्यानंतर श्री. अ. का. प्रियोळकर यांच्याकडे ती कामगिरी आली. ती ते अत्यंत कुशलतेनें पार पाडीत आहेत. त्यांच्या व्यासंगपूर्ण मार्गदर्शकत्वाखाली त्या संस्थेंतील दोन विद्यार्थ्यांनी पीएच. डी. साठी प्रबंध लिहून त्यांत ते यशस्वी रीतीने उत्तीर्ण झाले. नुकतेच 'संशोधन' या नांवाचें एक त्रैमासिक या मंडळाने सुरू केलें आहे. त्यांतून विशेषतः पोर्च्युगीझ मिशनऱ्यांनी केलेल्या ग्रंथरचनेचें प्रकाशन होत असतें ही महत्त्वाची गोष्ट होय. संस्थेचें हे दिवसेंदिवस वाढत चाललेलें कार्य पाहून कोणाहि मराठी भाषाभिमान्याला आनंदच होईल. श्री. प्रियोळकर यांना आम्ही मनःपूर्वक धन्यवाद देतों.

अशाच प्रकारचें कार्य करण्यासाठी नांदेड येथे 'इतिहास व वाङ्मय संशोधन मंडळ, हैदराबाद' स्थापन झालेलें आहे. या संस्थेचा उद्घाटन समारंभ नांदेड येथेच म. म. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या नवीन संस्थेचें आम्ही अंतःकरणपूर्वक स्वागत करतों व तिच्या कार्याला सुयश चिंतितों. या संस्थेचीं सूत्रें मराठवाड्यांतील प्रसिद्ध व साक्षेपी संशोधक श्री. विनायक अंबादास कानोळे यांच्या हातांत असल्यामुळे तिचें कार्य जोमाने चालेल याविषयी आम्हांला शंका नाही. या संस्थेला मदत करण्यांत हैदराबाद सरकारने पुढाकार घेतला हीहि गोष्ट महत्त्वाची होय. त्याबद्दल हैदराबाद सरकारलाहि आम्ही धन्यवाद देतों.

महाराष्ट्र साहित्य परिषद्

१९५३–५४ चें इतिवृत्त.

सभासद संख्या :— वर्षअखेर सभासदांची संख्या एकूण १५९५ आहे. त्यांपैकी ११४७ साधारण, २ उपकर्ते, ४ आश्रयदाते, ९ साहाय्यक, ३० हितचिंतक व ४०३ तहहयात अशी वर्गवारी आहे.

आर्थिक स्थिति :— सोबत आयव्ययपत्रक, अंदाजपत्रक, ताळेबंद हीं पत्रकें जोडलीं आहेत. त्यांवरून परिषदेच्या आर्थिक स्थितीची कल्पना सभासदांना येईल.

स्मृतिदिन :— ज्ञानकोशकार कै. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १० एप्रिलला दोन कार्यक्रम झाले. सकाळीं ९ वाजतां कै. केतकरांच्या समाधीला पुष्पांजलि अर्पिण्यांत आली. यावेळीं प्रा. गोखले, श्री. पां. र. अंबिके, प्रा. अदवन्त, प्रा. निरंतर, श्री. ल. स. केळकर इत्यादि उपस्थित होते. संध्याकाळीं ६॥ वाजतां धुळ्याचे श्री. वि. ह. निजसुरे यांचें 'मीमांसेचीं व्यावहारिक उदाहरणें' या विषयावर व्याख्यान झालें. कै. वा. म. जोशी स्मृतिदिनीं (२० जुलै) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें 'संशय, श्रद्धा व साक्षात्कार' या विषयावर व्याख्यान झालें. २६–२७ ऑगस्ट रोजीं कै. खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त डॉ. के. ना. वाटवे यांचीं 'रसविषयक कांहीं नवीन समस्या' या विषयावर २ व्याख्यानें झालीं. रविवार दि. २९ नोव्हेंबरला कै. माधव जूलियन यांच्या स्मृतिदिनीं अमरावतीचे प्रा. भ. श्री पंडित यांचें 'प्रणयपंढरीचा वारकरी' या विषयावर व्याख्यान झालें.

व्याख्यानें–भेटी–चर्चा :— विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्या सौ. उषा कोलते व सौ. ताराबाई प्रधान या गडकरी–स्मारकासंबंधी विचारविनिमय करण्यासाठीं ११ मे रोजीं परिषदेंत आल्या होत्या. प्रा. मंगरूळकर, प्रा. निरंतर, प्रा. अदवन्त, डॉ. घारपुरे यांनी त्यांच्याशीं स्मारकासंबंधी चर्चा केली. प्रयोजन ('परपज' या इंग्रजी नाटकाचा अनुवाद) या नाटकाच्या वाचनाचा कार्यक्रम दि. १५ जूनला परिषद व आंतरभारती या संस्थांच्या वतीने झाला. वाचन श्री. के. नारायण काळे यांनी केलें. परिषदेच्या स्वाध्याय-मंडळाचे वतीने १६ ऑगस्टला प्रा. न. र. फाटक यांचें 'वाङ्मयाचा अभ्यास' या विषयावर व्याख्यान झालें. सुप्रसिद्ध फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ ज्युल् ब्लोक यांच्या निधनानिमित्त दि. २४ डिसेंबरला प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेने दुखवटा–सभा झाली. सभेंत डॉ. रा. ग. हर्षे, डॉ. प. ल. वैद्य व श्री. डिसकळकर यांचीं भाषणें झालीं. १७ जानेवारीला कॅलिफोर्निया येथील एक पत्रकार रॉबर्ट नॉर्थ यांनी परिषदेस भेट दिली. १२ फेब्रुवारी रोजीं प्रा. रा. शं. वाळिंबे यांचें 'गडकऱ्यांचे खलपुरुष' या विषयावर व्याख्यान झालें. याचप्रसंगीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभु या संस्थेने परिषदेला भेट म्हणून दिलेल्या कै. गडकरी यांच्या तैलचित्राचें अनावरण करण्यांत आलें. म. सा. परिषद् व पुणें तत्त्वज्ञान मंडळ या संस्थांच्या वतीने प्रा. प्र. रा. दामले यांचीं दि. २८ फेब्रुवारी ते ७ मार्च या अवधींत

अनुक्रमणिका

' नीतिशास्त्राची रूपरेषा ' व ' सत्ताशास्त्रा 'ची रूपरेषा ' या विषयांवर अनुक्रमें चार चार व्याख्यानें झालीं. रविवार दि. ७ मार्चला सकाळीं प्रा. श्री. म. माटे यांचें ' ऋग्वेदांतील उपमांवरून तत्कालीन समाजस्थिति ' या विषयावर श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या अध्यक्षतेने व्याख्यान झालें.

सत्कारसमारंभः— प्रा. चिं. त्रि. जोशी यांच्या षष्ठ्यब्दपूर्तिनिमित्त त्यांचा सत्कार २९ मे रोजीं करण्यांत आला. सभेचे अध्यक्ष प्रा. श्री. म. माटे होते. डॉ. वाटवे, प्रा. डांगे, श्री. तळवलकर, श्री. म. दा. साठे, श्री. नी. शं. नवरे, प्रा. सोमण यांनी सत्कारप्रसंगीं भाषणें केलीं. पुणें येथील स. प. कॉलेजमध्यें ' कौशिक–व्याख्यान–माले ' तर्फे डॉ. शं. दा. पेंडसे यांनी ज्ञानेश्वरीवर जीं चार व्याख्यानें दिलीं तीं अभ्यासकांना व सर्वसाधारण श्रोत्यांना फार उद्‌बोधक वाटलीं. डॉ. पेंडसे यांच्या या कार्याबद्दल व परिषदेशीं त्यांचा असणारा ऋणानुबंध लक्षांत घेऊन ३ सप्टेंबर रोजीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. प्रा. माटे व म. म. प्रा. पोतदार यांनीं या प्रसंगीं भाषणें केलीं. अहमदाबादच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. वि. द. घाटे यांचा पहिला प्रकट सत्कार परिषदेतर्फे २६ सप्टेंबरला प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेने करण्यांत आला. प्रा. माटे, श्री. तळवलकर, डॉ. सरोजिनी बाबर, श्री. के. नारायण काळे, म. म. प्रा. पोतदार, श्री. य. दि. पेंढरकर यांनी सत्कारप्रसंगीं भाषणें केलीं.

प्राज्ञ–विशारद वर्गः— दर वर्षाप्रमाणे प्राज्ञ–विशारद वर्ग जुलै ते डिसेंबर १७ पर्यंत चालू होते. यंदाच्या वर्गात प्रा. श्री. म. माटे, प्रा. अ. गं. मंगरूळकर, प्रा. गं. भा. निरंतर, प्रा. श्री. के. क्षीरसागर, श्री. गोपीनाथ तळवलकर, प्रा. वा. दा. गोखले, प्रा. रा. ना. गद्रे, डॉ. स. वि. सहस्रबुद्धे, प्रा. ग. प्र. प्रधान, डॉ. न. का. घारपुरे, डॉ. वा. मो. कानिटकर, श्री. प्र. न. जोशी, श्री. व. दि. कुलकर्णी, श्री. प्र. शं. जोशी, प्रा. चंद्रकुमार डांगे व श्री. ग. स. शुक्ल यांनी अध्यापन कार्य केलें.

वार्षिक वाङ्मय समालोचन मालाः— प्रतिवर्षाप्रमाणे प्रस्तुत माला ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या अवधींत गुंफण्यांत आली. यंदा काव्य (प्रा. भ. श्री. पंडित) कादंबरी (प्रा. अ. के. भागवत) नाटक (प्रा. माधव मनोहर) व टीका (प्रा. ग. प्र. प्रधान) या चार विषयांवर समालोचनपर व्याख्यानें झालीं.

३६ वें महाराष्ट्र साहित्य संमेलनः— या संमेलनाचें अधिवेशन ' महाराष्ट्र समाज ' या संस्थेतर्फे अहमदाबाद येथे दि. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या अवधींत श्री. वि. द. घाटे यांच्या अध्यक्षतेने ' लोकहितवादि-मंदिरांत ' त यशस्वीरीत्या पार पडलें. दि. ३१ ला सकाळीं प्रदर्शनाचें उद्‌घाटन श्री. विद्याधिन नीलकंठ यांच्या हस्तें करण्यांत आलें. संमेलनाचें उद्‌घाटन ना. दादासाहेब मावळंकर यांनी केलें. संमेलनाला जोडून ' संतवाङ्मय ' विषयक शाखासंमेलन डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या अध्यक्षतेने १ नोव्हेंबरला भरलें होतें. दि. २ ला ' बोलपट व कथावाङ्मय ' या विषयावर श्री. के. नारायण काळे यांच्या अध्यक्षतेने खुली चर्चा झाली. म. म. प्रा. द. वा. पोतदार यांचें ' मराठी साहित्याचा इतिहासावर झालेला परिणाम ' या विषयांवर व्याख्यान झालें. याशिवाय संतवाङ्मयावरील खुली चर्चा, गरबानृत्य, भावगीत, नाट्यप्रयोग (स्थानिक कलाप्रेमींनी केलेला सत्तेचे गुलाम, मुं. म. सा. संघ–नाट्यशाखेने केलेले झुंजारराव–मानापमान; मेना गुर्जरी), श्री. मृणालिनी सारा-

भाई यांचें नृत्य, काव्यगायन, भाषाभगिनी संमेलन इत्यादि कार्यक्रम झाले. संमेलन यशस्वी करण्याचे कामीं ना. दादासाहेब मावळंकर, डॉ. ग. वा. मोहिले [स्वागताध्यक्ष] श्री. वसंत हेबळे [कार्याध्यक्ष], श्री. गो. के. नागराज, श्री. मो. श्री. पंडित, श्री. प्र. मा. जांभेकर, श्री. श्री. स. शेवडे इत्यादि लहानथोर कार्यकर्त्यांनी खूप श्रम घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे अल्प आहेत.

परिषदेने केलेलें प्रतिनिधित्व :—१ पुणें विद्यापीठाचे वतीने २३ ते २५ मे रोजीं भरलेल्या 'भारतीय भाषा विकास परिषदें'त श्री. त्र्यं. गो. ढवळे (कार्यवाह, परिभाषा मंडळ) व प्रा. अ. गं. मंगरूळकर यांनी प्रतिनिधित्व केलें. श्री. ढवळे यांनीं 'परिभाषाकोषाची आयोजना आणि ती साधण्याचे मार्ग' या विषयावर परिषदेंत निबंध पाठविला होता. २ खानापूर येथे २४–२५ मे रोजीं संयुक्त महाराष्ट्र परिषद् श्री. हरीभाऊ पाटसकर यांच्या अध्यक्षतेने भरली होती. त्या परिषदेसाठी कार्यकारी मंडळाचे बेळगांवचे सदस्य श्री. बा. रं. सुंठणकर हे प्रतिनिधि म्हणून गेले होते. ३ कुमठा (उत्तर कॅनरा) येथे २६–२७–२८ डिसेंबरला भरलेल्या ३६ व्या कन्नड साहित्य संमेलनांत परिषदेतर्फे डॉ. वामनराव वाघ (कारवार), श्री. बा. रं. सुंठणकर व प्रा. अ. गं. मंगरूळकर, यांनी प्रतिनिधित्व केलें. भारत सरकारच्या शिक्षणखात्यातर्फे दिल्ली येथे ९ ते १४ जानेवारी या अवधींत 'इंडियन नॅशनल कमिशन (युनेस्को)' चें पहिलें अधिवेशन भरलें होतें. या अधिवेशनला परिषदेतर्फे प्रा. गं. भा. निरंतर उपस्थित होते.

शाखासभा वृत्तांत :—दक्षिण सातारा जिल्हा साहित्यसभेतर्फे सांगली येथे श्री. वि. स. पागे, श्री. रा. के. रानडे, श्री. वि. का. खाडिलकर यांचीं व्याख्यानें झालीं. दि. १५ फेब्रुवारी रोजीं परिषदेचे अध्यक्ष श्री. वि. द. घाटे यांचा सत्कार करण्यांत आला. सभेने परीक्षावर्ग घेण्याचें व वर्गणी गोळा करण्याचें कार्यहि दरवर्षीप्रमाणे केलें. श्री. धों. वा गद्रे यांच्या मार्गदर्शनाने शाखासभेचें कार्य समाधानकारकरीत्या चालू आहे. सातारा येथील शाखासभेने यंदा पुढील ठळक कार्यक्रम केले. प्राज्ञवर्ग चालविला, श्री. वि. द. घाटे यांचा सत्कार व व्याख्यान करविलें, प्रा. वि. म. कुलकर्णी यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला व पुणें विद्यापीठाच्या बहिःशाल व्याख्यानमालेशीं, श्री. मो. रा. वाळंबे व प्रा. रा. श्री. जोग यांचीं व्याख्यानें करवून, सहकार्य केलें. सभेचे कार्यवाह श्री. मो. रा. वाळंबे हे आता 'उत्तर सातारा जिल्हा साहित्य संमेलन' भरविण्याचा यत्न करीत आहेत. सोलापूर, शाखासभेच्या वतीने यंदा झालेलें महत्त्वाचें कार्य म्हणजे मोहोळ येथे २३–२४ जानेवारीला भरलेलें सोलापूर जिल्हा साहित्य संमेलन. अधिवेशनाचें उद्घाटन श्री वि. द. घाटे यांनी केलें. संमेलनाला जोडून महिला साहित्य संमेलन श्री. विद्युल्लता शहा यांच्या अध्यक्षतेने भरलें होतें. संमेलनाध्यक्ष प्रा. शं. के. कानेटकर (गिरीश) यांनी आपल्या भाषणांत पुढील कळकळीचे उद्‌गार काढले—'साहित्य ही कांही आता शहरांतील लोकांचीच मत्ता राहिली नाही. खेड्यांतील लोकांनीहि सृष्टींतलें व जीवनांतलें सत्य वेचलें व तें सुंदर रीतीने पुढे मांडलें तर तें हवेंच आहे. अनुभव, अनुभूति, कल्पना व कलात्मकता यांचा संगम करून साहित्य-सेवा करण्यास आज खेड्यांतील लेखकांनीहि पुढे आलें पाहिजे. अशा प्रकारच्या संमेलनांनी खेड्यांतील जनतेला साहित्यनिर्मितीची प्रेरक शक्ति यावी अशी अपेक्षा आहे.' संमेलनांत काव्यगायन, नाट्यप्रयोग, वाङ्मयीन चर्चा इत्यादि कार्यक्रमहि झाले. मध्यप्रांत (नागपूर)

अनुक्रमणिका

शाखासभेने यंदा म. सा. प.च्या वाङ्मयेतिहास योजनेसाठी सूचना पाठविल्या व श्री. वि. स. खांडेकर, श्री. भा. वि. वरेरकर, प्रा. न. र. फाटक, श्री. ह. ना. नेने इत्यादि साहित्यिकांचा सत्कार केला.

